साईलीला १९५८

शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक

## या अंकांत:—


- श्रीसाई वाक्सुधा
- प्रिय वाचक
- बाबांची लीला
- शबरीचीं बोरें
- नामाचा महिमा
- श्रीदासगणूमहाराज
- सुश्लोकगीता
- माझी देवभूमीची यात्रा
- श्रीज्ञानेश्वर जीवन
- शिरडीवृत्त

इ. इ.

# फुटो हें मस्तक । तुटो हें शरीर ॥


## तरीसुद्धां श्रीसाईबाबांच्या सेवेंत
## जरासुद्धां फरक पडतां कामा नये

म्हणून आपणास साईभक्तींत गोववून घेण्याकरितां
आज रामनवमीला आपल्या ऐपतीप्रमाणें
चांदीची सुबक मूर्ति खरेदी करा.

त्याचप्रमाणें साईबाबांच्या पूजनासाठीं पादुका, पूजेचीं भांडीं, पंचारती, निरांजनें, समई, उदबत्ती घरें, देव्हारे, कापूर-आरती, पंचामृत भांडीं, ताम्हनें, तबकें, गंधाची ताटली, पळ्या, फोटो फ्रेम, लॉकेट, आंगठ्या, वगैरे नेहमीं तयार मिळतात. तसेंच खरे व कल्चर्ड मोती मिळतात.

नवग्रहादि खडे तयार मिळतील.

ता. क. आपल्या सोन्याचे दागिने तयार करून दिले जातात.





स्थापना १९१६

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ,
ठाकुरद्वार, मुंबई २

सोनें चांदी व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी

# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

## माटुंगा क्लीनिंग वर्क्स

( स्थापना १९३४ ) मालक : एस्. व्ही. प्रधान

मोदी निवास, मुंबई १९


## श्रीसाईलीलेंतील जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धें ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| १/४ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १५ |
| १/८ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १० |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धें ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| १/४ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |
| १/८ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ३५ |

वि. सू.:—जाहिरात देतेवेळीं ५० टक्के आगाऊ रक्कम पाठविण्याची विनंती



# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३५ वें : अंक १ ला

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९५८

संपादक—

नागेश आत्माराम सावंत

रामचंद्र महादेव राणे


टे. नं. २६१२७४

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

## श्री साईवाक्सुधा



★

आल्या गेल्याचा आदर करीं ।
तृषिता जल भुकेल्या भाकरी ।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी ।
देतां श्रीहरि तुष्टेल ॥ १४२ ॥
कोणीहि बोल बोलो शंभर ।
स्वयें नेदीं कटु उत्तर ।
धरितां सहिष्णुता निरंतर ।
सुख अपार लाधेल ॥ १४४ ॥

—श्री साईसच्चरित अ. १९.



# अ नु क्र म णि का


| विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| श्रीसाई वाक्सुधा | | ३ |
| प्रिय वाचक | संपादक | ५ |
| बाबांची लीला | | ७ |
| शबरीचीं बोरें | ग. ल. रेमे | १० |
| नामाचा महिमा | | १७ |
| श्रीदासगणूमहाराज | ना. वा. गुणाजी | २९ |
| सुश्लोकगीता | वि. के. छत्रे | ४१ |
| माझी देवभूमीची यात्रा | बी. एन्. दातार | ४७ |
| श्रीज्ञानेश्वर जीवन | कै. खं. स. त्रिलोकेकर | ५२ |
| शिरडीवृत्त | | ६२ |




# प्रिय वाचक—

या अंकापासून श्रीसाईलीला त्रैमासिक पस्तिसाव्या वर्षांत पदार्पण करीत आहे. गेलीं कित्येक वर्षें या त्रैमासिकाच्या-द्वारें आमच्याकडून श्रीसाईबाबा भक्त-जनांची सेवा करवीत आहेत. अशीच सेवा यापुढेंहि उत्तरोत्तर अधिक प्रमाणांत बाबानीं आमच्याकडून करवून घ्यावी एवढीच आमची प्रार्थना आहे.

× × ×

प्रस्तुत अंक रामनवमीच्या वेळी प्रसिद्ध होत असल्यामुळें रामायणांतील कांहीं घटनांवर सखोल संशोधन असलेला श्री. ग. ल. रेगे यांचा लेख प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद होतो. अलीकडे कांहीं नियतकालिकांतून रामायण—महा-भारतांतील महान् विभूतीविषयीं बाष्कळ विवेचन असलेले अनेक उथळ लेख प्रसिद्ध होत आहेत. त्या दृष्टीने श्री. ग. ल. रेगे यांचा प्रस्तुत व्यासंगपूर्ण लेख त्या बाष्कळ लेखांतील विषयावर उतारा म्हणून उपयुक्त ठरण्यासारखा आहे. अशा स्वरू-पाचे अधिक लेख श्री. रेगे यांनीं लिहावे अशी आम्हीं त्यांना प्रेमाची विनंती करतों.

याच अंकीं हिमालयांतील कांहीं स्थळांचे आणि विभूतींचे ईषद्दर्शन घड-विणारा, केंद्रीय गृहखात्यांतील मंत्री श्री. बी. एन्. दातार यांचा लेख आम्हीं प्रसिद्ध करीत आहोंत. श्री. दातार यांची संपूर्ण लेखमाला पृष्ठमर्यादेमुळें आम्हांला घेतां आली नाहीं. त्या लेखमालेतील एकाच प्रकरणाचा गोषवारा आम्हीं देत आहोंत. या प्रकरणांत श्री. दातार यांनीं घड-विलेलें भारताच्या देवभूमीचें दर्शन वाचकांना मनोज्ञ आणि उद्बोधक वाटेल.

× × ×

आज सारें जग एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभें राहिलेलें आहे. पृथ्वीवरून बाहेर अंतराळांत उड्डाण करून अंतरिक्षांतील ग्रहगोलांवर स्वारी करण्याची मानवी महत्त्वाकांक्षा साकार होण्याची शक्यता दिसून येऊं लागली आहे. एका बाजूने बाह्य सृष्टीवर असे मोठे मोठे विजय मिळविण्यांत यशस्वी होत असलेली मानवी प्रज्ञा अंतःसृष्टीच्या ज्ञानाच्या आणि विजयाच्या बाबतींत मात्र अत्यंत मागस राहिलेली आहे. माणसाचें विज्ञानाचें क्षेत्र वाढेल पण अंतःकरणाचें औदार्य मात्र वाढलेलें नाहीं. स्वार्थ, मत्सर, हेवे-दावे इत्यादि वृत्तींवर विजय मिळविण्याच्या दृष्टीनें जेवढी कसोशी सुसंस्कृत मानवानें करायला हवी तेवढी ती त्याच्याकडून होत असल्याचें दिसून येत नाहीं. त्यामुळें विज्ञानानें प्राप्त झालेलें सामर्थ्य अखेर सबंध मानव जातीचा विध्वंस करून टाकण्यांत परिणत होईल कीं काय अशी साधार शंका आज जगांतील विचारी पुरुषांना भयव्याकुळ करून सोडीत आहे.

जगापुढील आजच्या समस्येवर एकच उपाय आहे तो म्हणजे भौतिक विज्ञानाच्या जोडीनें आध्यात्मिक ज्ञानाचीहि ओळख करून घेणें हाच होय.

—संपादक { ना. अ.
रा. म

# श्रीसाईलीला त्रैमासिक

## फॉर्म नं. ४ (नियम नं. ८)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्रकाशन स्थळ | — | मुंबई |
| (२) | प्रकाशनाचें स्वरूप | — | त्रैमासिक |
| (३) | मुद्रकाचें नांव | — | कृष्णाजी नारायण सापळे |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४. |
| (४) | प्रकाशकाचें नांव | — | (१) नागेश आत्माराम सावंत<br>(२) रामचंद्र महादेव राणे |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | (१) १४-ए भोईवाडा रोड, परळ, मुंबई १२.<br>(२) ९१-के कोळीवाडा, फणसवाडी, मुंबई २. |
| (५) | संपादकाचें नांव | — | (१) नागेश आत्माराम सावंत<br>(२) रामचंद्र महादेव राणे |
| | राष्ट्रीयत्व } पत्ता } | — | वर दिल्याप्रमाणें |
| (६) | वृत्तपत्राची मालकी | — | श्रीसाईबाबा संस्थान कमिटी, शिरडी.<br>सध्यांचे ट्रस्टी<br>(१) श्री. पी. के. सावंत<br>(२) श्री. एन्. ए. सावंत<br>(३) श्री. बी. टी. कोते पाटील<br>(४) श्री. डी. डी. रासने<br>(५) श्री. एस्. बी. देव |

आम्ही, नागेश आत्माराम सावंत आणि रामचंद्र महादेव राणे, वरील माहिती आमच्या माहितीप्रमाणें सत्याला स्मरून देत आहोंत.

प्रकाशकाची सही

ता. ३० मार्च १९५८

नागेश आत्माराम सावंत
रामचंद्र महादेव राणे

———

# बाबांची लीला



रावसाहेब हर्षद पी. मेहता यांनीं १९५२ सालीं श्रीसाईबाबांचें एक चरित्र इंग्रजींत लिहिलें आहे. या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणांत बाबांची अलौकिक लीला व्यक्त करणाऱ्या कांहीं स्वानुभवाच्या घटना त्यांनीं वर्णन केल्या आहेत. त्यापैकीं कांहीं गोष्टी पुढीलप्रमाणें:–

इंडियन पोलिटिकल डिपार्टमेंटचे एक सेवानिवृत्त अधिकारी श्री. के एफ्. मास्टर हे मूत्राशय आणि मूत्रपिंड यांच्या विकारानें अतिशय आजारी झाले. त्यांचा आजार अतिशय वाढला आणि त्यांना फारच यातना होऊं लागल्या. तेव्हां वैद्यकीय सल्ल्यानुसार त्यांना बडोद्याच्या स्टेट जनरल हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. तेथें त्यांच्यावर शस्त्रक्रिया करायची होती. परंतु त्यांची संपूर्ण शारीरिक तपासणी करतां त्यांना तीव्र मधुमेह असल्याचें आढळून आलें. अर्थातच शस्त्रक्रिया करण्याचा विचार सोडून द्यावा लागला. इतर उपचार चालू होते. पण श्री. मास्टर यांची परिस्थिति दिवसेंदिवस अधिकाधिक चिंताजनक होत गेली. आजाराचें प्रमाण भलत्याच थरावर जाऊन ते बेशुद्ध झाले. हॉस्पिटलमधील सर्जन एफ्. आर. सी. एस्. असून मोठे तज्ज्ञ व नाणावलेले डॉक्टर होते. श्री. मास्टर यांची एकंदर अवस्था पाहून आतां कोणताहि उपचार त्यांना वांचविण्यास समर्थ ठरणार नाहीं असें डॉक्टरना दिसलें आणि त्यांनीं मास्टरना घरीं घेऊन जाण्याची त्यांच्या कुटुंबीयांना परवानगी दिली.

श्री. मास्टर यांना घरीं नेण्याबद्दलच्या वाटाघाटी चालू असतांनाच मी आणि बडोद्याचे एक प्रसिद्ध डॉक्टर श्री. धीरजलाल शहा असे आम्ही दोघे हॉस्पिटलमध्यें गेलों. गेलीं कित्येक वर्षें मास्टर यांच्या घराण्याशीं माझा अत्यंत घरोब्याचा संबंध आहे. मास्टर यांच्या प्रकृतीसंबंधीं मी तेथील डॉक्टरांकडे चौकशी करतां त्यांनीं असें सांगितलें कीं मास्टर आतां जेमतेम पांचसहा तासांचे सोबती आहेत. श्री. धीरजलाल यांनीं स्वतः मास्टर यांची प्रकृती तपासली आणि त्यांनींहि हेंच मत व्यक्त केलें.

रात्रीं आठ वाजतां ॲम्ब्युलन्समधून मास्टरना घरीं आणलें. मास्टर यांचें सारें घराणें श्रीसाईबाबांची एकनिष्ठ भक्ति करणारें आहे. रात्रीं ९ वाजतां मी व श्री. धीरजलाल आमच्या बंगल्यावर बोलत बसलों असतां, मास्टर यांच्या घरांतून निरोप आला कीं अजून धुगधुगी आहे तोंवर कांहीं उपाय करतां आला तर करावा. परंतु वैद्यकीय ज्ञानानें आतां मास्टर यांच्या प्रकृतीबाबत कांहींहि करतां येणें अशक्य आहे, असें श्री. धीरजलाल यांचें

मत झालें असल्यामुळें, मास्टर यांचें भवितव्य श्रीसाईबाबांच्या हातीं सोंपवावें असा सल्ला त्यांनीं दिला. त्याप्रमाणें श्री. मास्टर यांच्या कपाळाला उदी लावण्यांत आली आणि घरांतल्या मंडळीनीं श्रीसाई-बाबांची मनोभावानें प्रार्थना केली.

दुसरा दिवस गुरुपौर्णिमेचा होता. सकाळीं मला समजलें कीं मास्टर अद्यापि हयात असून त्यांनीं डोळे उघडले आहेत! मला आश्चर्य वाटलें. त्याबरोबर असेंहि मनांत आलें कीं, ज्योत जाण्यापूर्वी मोठी होते तसाहि कदाचित् हा प्रकार असावा. पण तसा प्रकार नव्हता. संध्याकाळीं श्री. मास्टर चांगले बोलूं चालूं लागले! ते म्हणाले, 'मला असें दिसलें कीं माझ्या खाटेभोंवतीं पांचपन्नास घटिंगण जमले आहेत व ते मला उचलून नेणार आहेत. पण मला ते उचलणार इतक्यांत एकदम लख्ख प्रकाश पडला. खाटेभोंवतीं जमलेले सगळे घटिंगण भीतीनें पळून गेले. आणि मला आराम वाटूं लागला!'

या प्रसंगाला एक वर्ष उलटून गेलें असून श्री. मास्टर चांगले खडखडीत बरे झाले आहेत! ज्या विकारामुळें मास्टर मरणाच्या दारापर्यंत गेले होते आणि जो विकार असाध्य असल्याचें तज्ज डॉक्टरनीं मत दिलें होतें तो त्यांचा विकारहि साफ नाहींसा झाला आहे!

× × ×

## बन्सीलालची विलक्षण हकीकत

**श्री.** धीरजलाल शहा यांचा पस्तीस वर्षांचा मुलगा बन्सीलाल हा एकदां आजारी पडला. श्री. बन्सीलाल हा स्वतःहि डॉक्टर आहे. न्युमोनियानें तो आजार पडला तेव्हां अनेक नाणावलेल्या व तज्ज्ञ डॉक्टरांनीं त्याच्यावर उपचार केले. न्युमोनिया आटोक्यांत आला, पण बन्सीलालला येणारा ताप कांहीं केल्या जाईना. दोन महिने असे गेले. ताप नियमितपणें येई व तो हटण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसिन, क्लोरोमायसेटिन, ओरियोमायसिन आणि इतर सल्फा औषधें वगैरे सगळीं वापरून पाहाण्यांत आलीं, पण तापाला उतार पडेना. रक्त, लघ्वी यांची तपासणी झाली, क्ष–किरण फोटो घेण्यांत आले. पण विकाराचें निदान होईना आणि ताप कांहीं केल्या जाईना.

एका सकाळीं श्री. धीरजलाल हे नित्याप्रमाणें साईपूजेला बसलेले असतांना त्यांच्या दृष्टीसमोर एक विलक्षण दृश्य आलें. एक मानवी देह त्यांना दिसला व त्यांत एका ठिकाणीं पू जमा झाल्याचें त्यांच्या दृष्टीला दिसलें. बन्सीलाल याच्या दुखण्याशीं या दृश्याचा संबंध असला पाहिजे असें श्री. धीरजलाल यांच्या तावडतोब मनांत आलें. पण संपूर्ण वैद्यकीय तपासणी झालेली असतांना व त्या तपासणींत असें कांहीं आढळून आलें नसतांना, हें दृश्य कसें काय मानावें याचा धीरजलालांना मोठा प्रश्न पडला. पण लागोपाठ तीन वेळां जेव्हां हेंच दृश्य त्यांच्या नजरेसमोर आलें तेव्हां मात्र त्याचा शहानिशा करण्याचें त्यांनीं ठरवलें. एका प्रसिद्ध सर्जन या साहाय्यानें त्यांनीं बन्सीलालच्या संपूर्ण देहाची कसोशीनें तपासणी करून एक दुखरा भाग शोधून काढला. बन्सीलालवर शस्त्रक्रिया

करण्यांत आली आणि जवळ जवळ दोन पौंड पू काढून टाकण्यांत आला ! त्यानंतर बन्धीलाल लौकरच बरा झाला आणि त्याचा ताप साफ नाहींसा झाला !

× × ×

## बाबांनीं कृपा केली

माझा मुलगा अतुल हा १९४९ सालीं एका खडतर प्रकारच्या विषमज्वरानें आजारी पडला. अतुल तेव्हां सात वर्षांचा होता. वैद्यकीय सल्ल्यानुसार त्याला एका इस्पितळांत नेण्यांत आलें. त्याची परिस्थिति कठीण होती. जीवन मृत्यूच्या उंबरठ्यावर तो राहिलेला होता. डॉ. ठाकोरभाई पटेल आणि त्यांची पत्नी सौ. इंदुमती पटेल हीं दोघेंहि निष्णात डॉक्टर असून त्यांचे उपचार चालू होते. मी व माझी पत्नी मालती अशीं आम्ही दोघे सतत हॉस्पिटलमध्यें राहिलों होतों. अतुलची अवस्था किती कठीण आहे याची डॉक्टरांनीं आम्हांला कल्पना दिली होती. अतुलच्या मलोत्सर्गांत जर कधीं रक्त किंवा नुसती लाल छटा दिसली तर ताबडतोब क्षणाचा अवधि न लावतां आपल्याला वर्दी देण्यास डॉक्टरनीं सांगितलें होतें.

एका दिवशीं संध्याकाळीं आम्ही अतुलच्या शेजारीं बसलों असतांना अतुलनें केलेल्या मलोत्सर्गांत लालभडक रक्त आम्हांला आढळलें. त्याला ताप खूप चढला होता आणि वातहि झाला होता. त्याचें पोट कसें भलतेसें फुगलें होतें. डॉक्टरना ताबडतोब बोलावून आणण्यास नर्सनें सांगितलें. सौ.मालती धडधडत्या अंतःकरणानें पळतच समोरच्या वॉर्डांत फोन होता तेथें गेली आणि तिनें डॉक्टरांना फोन केला. पंधरा मिनिटांत डॉक्टर आले.

पण या पंधरा मिनिटांच्या अवधींत एक चमत्कार घडला होता. अतुलच्या प्रकृतींत एकदम सुधारणा दिसून येऊं लागली होती ! त्याचें फुगलेलें पोट पातळ होऊन स्वाभाविक आकाराचें झालें होतें. त्याचा वात गेला होता आणि तो ताजातवाना व उल्हसित दिसूं लागला होता. डॉक्टरनें त्याची प्रकृति पाहिली आणि हंसून त्यांनीं आम्हांला पुरें घाबरट ठरविलें. पण नर्सनें जेव्हां तें मळांतील रक्त दाखविलें तेव्हां मात्र डॉक्टरनें आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें. मृत्यूच्या जबड्यांत गेलेलें मूल परत कसें आलें याचा त्यांना उलगडा होईना.

माझ्या पत्नीनें नंतर एक विलक्षण गोष्ट सांगितली. ती फोन करण्यासाठीं जिवाच्या आकांतानें फोनकडे धांवत गेलीं तेव्हां तिला साईबाबांचें स्पष्ट स्पष्ट दर्शन झालें होतें. बाबा आपल्याबरोबरच जवळून चालत आहेत असें तिला दिसलें होतें. तिनें फोन केला तेव्हांहि ते जवळच उभे असल्याचें तिला दिसलें होतें. नंतर ते अंतर्धान पावले. त्यांच्या अंगांत मात्र पांढरी कफनी नसून केशरी रंगाची कफनी होती. पत्नीला दिसलेलें हें दृश्य खरेंखुरेंच आहे, याविषयीं मला शंका नाहीं. बाबांनींच येऊन आमच्या बाळाचें रक्षण केलें आणि असाध्य रोगांतून त्याला वांचविलें. या प्रसंगानंतर थोड्याच दिवसांत अतुल पूर्ण बरा झाला.

( वरील घटना १९५२ सालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतील आहेत. )

———

# शबरीचीं बोरें, लक्ष्मण-रेषा आणि छाया सीता

लेखक : ग. ल. रेगे बी. ए., पनवेल.

केवळ भारतासच नव्हे तर अखिल विश्वास ललामभूत अशा महाकाव्यांची गणना करावयाची झाल्यास त्यांत श्रीमद्वाल्मीकि रामायण व श्रीमद्व्यासरचित महाभारत यांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. ग्रीक लोकांनीं त्यांच्या 'इलियड'ला प्रथम स्थान देणें हें स्वाभाविक आहे. पण श्रीप्रभु रामचंद्रासारखा एकवचनी, एकपत्नी, उदार, धीरोदात्त, आणि प्रजानुरंजनपर असा साक्षात् होऊन गेलेला सम्राट् ज्या काव्याला नायक म्हणून लाभला आहे असें एकच एकच एक काव्य रामायण होय असें म्हटलें तर अतिशयोक्तीचा दोष येईल असें वाटत नाहीं. काव्यगुणांनीं सर्वतोपरी नटलेला पण त्याच बरोबर ऐतिहासिक सत्याच्या कोंदणांत बसविलेला हा अद्वितीय ग्रंथ आद्यकवि श्री वाल्मीकीनें हजारों वर्षांपूर्वी रचला आहे. अशा या भव्य, उदात्त व अति पुरातन काव्याची कथा वंशपरंपरा अनेक लोकांच्या तोंडीं घोळत असणें साहजिक आहे. कवींनीं त्यावर स्वतंत्र काव्यें रचिलीं आहेत. नाटककारांनीं नाटकें लिहिलीं आहेत व पौराणिकांनीं आपापल्या परीनें त्या कथा पुराणांत ग्रथित केल्या आहेत. त्यामुळें प्रत्यक्ष घडलेल्या व वाल्मीकीनें आपल्या रामायणांत वर्णन केलेल्या मूळकथांना हजारों वर्षांत थोडेसें विकृत स्वरूप आलें तर त्यांत कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. असे विकृत झालेले किंवा मुळांतच न घडलेले असे विकृत प्रसंग सांगतां येतील. कवीला शब्दसृष्टीचे ईश्वर असें म्हणतात. परंतु कवि कधीं कधीं शून्यापासून सृष्टि उत्पन्न करून प्रतिविश्वामित्र बनल्याचीं उदाहरणें थोडीं थोडकीं नाहींत. सीतास्वयंवराचा सामुदायिक समारंभ घडला आणि त्यांत राजे रजवाड्यांसमोर रावणाच्या अंगावर शिवधनुष्य उलटून भर दरबारांत रावण उताणा पडला असा प्रसंग रामायणांत नाहीं. पण हा अघटित प्रसंग वामन पंडितांनीं प्रत्यक्ष घडला असेंच धरून आपल्या गोड वाणीनें आणि किती बहारदार शैलीनें वर्णन केला आहे ?

रामायणांतील शबरीची गोष्ट कोणास ठाऊक नाहीं ? आठ दहा वर्षांच्या शाळकरी पोरापासून तो सत्तर ऐंशी वर्षांच्या जख्खड म्हातारीला, अशिक्षित खेडवळापासून तों सुशिक्षित नागरिकापर्यंत

बहुतेक सर्वांना शबरी आणि तिचीं बोरें ही गोष्ट माहीत आहे. प्रभु रामचंद्रासारखी शबरी ही अमर झाली आहे. आणि रामचंद्राबरोबर शबरीनें चाखून पाहिलेल्या गोड बोरांचा आस्वाद आज कैक पिढ्या मिटक्या मारून घेत आहेत. पण वाचकहो, हीं गोड बोरें रामचंद्रानें खाल्लीं नव्हतीं, आणि जीं तुम्ही आज मधून मधून चाखतां तीं शबरीनें चाखलेलीं नसून पद्मपुराणकर्त्यांच्या कपोलांतून उत्पन्न झालेलीं आहेत हें तुम्हांस सांगितलें तर तें खरें वाटेल का ? मूळकथा अशी आहे.

पित्याची आज्ञा घेऊन श्रीराम वनवासास निघाले. वाटेंत गांवांमागून गांव व सुगंधीं पुष्पांनीं भरलेलीं वनें मागें टाकीत ते भरद्वाज ऋषींच्या आश्रमाजवळ आले. भरद्वाज ऋषींनीं त्यांना गोळा केलेलीं नानाविध वन्य फळें व अन्नरस खावयास दिले. दुसरे दिवशीं ते यमुनेवर पार होऊन तेथून वीस कोस असलेल्या चित्रकूट पर्वतावर जाऊन राहिले. भरतभेट झाल्यावर राम तेथून दक्षिणेकडे निघाले. ते प्रथम अत्रि महर्षींच्या आश्रमास आले. महर्षींनीं त्यांचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. तेथें एक रात्र मुक्काम करून ते दंडकारण्यांत शिरले. दंडकारण्यांत ते सुतीक्ष्ण मुनीला भेटले. सुतीक्ष्णानें त्यांना तापसांना योग्य अशीं उत्तम उत्तम वन्य फळें खावयास दिलीं. सुतीक्ष्णाचा निरोप घेउन राम वनांतून जात असतांना त्यानें स्वतः जमा केलेल्या फळांनीं उपहार करीत असलेले ब्राह्मण पाहिलें. तेथून ते अगस्त्य ऋषींच्या भावाच्या आश्रमांत गेले. त्यानेंही त्यांचा कंदमुळें व फळें देऊन उत्तमप्रकारें सत्कार केला. दुसरे दिवशीं अगस्त्यांच्या भावाचा निरोप घेऊन ते अगस्त्य मुनींचे भेटीस गेलें. मुनीनें वन्य फुलें, फळें, पाणी इत्यादिकांनीं रामाची पूजा केली. जवळच असलेल्या पंचवटींत त्यांनीं बरींच वर्षें काढलीं. जवळ जवळ वनवासाची तेरा वर्षें गेल्यावर रामलक्ष्मणांस शूर्पणखा भेटली. तिनें रामलक्ष्मणाकडे प्रेमाची याचना केली. लक्ष्मणाला तिचें कृत्य न आवडल्यामुळें त्यानें तिचें नाक कान कापलें. तिनें रावणाकडे तक्रार केली. येथेंच रावणानें सीतेला चोरून नेलें.

सीतेचा शोध करीत करीत हे ऋष्यमूक पर्वताजवळ राहणाऱ्या सुग्रीव व मारुतीला भेटण्याकरितां निघाले. वाटेंत त्यांना पंपा सरोवर लागलें. सरोवरच्या पश्चिम तीरावर शबरीचा आश्रम होता. ते तेथें जातांच शबरी हात जोडून पुढें उभी राहिली व तिनें रामलक्ष्मणांच्या पायांवर मस्तक ठेविलें. नंतर त्या दोघांना तिनें उदक अर्घ्य देऊन वनांतील उत्तम उत्तम फळें त्यांजपुढें ठेविलीं. ती म्हणाली, ' तुम्ही चित्रकूटाला आलां तेव्हांच मला तुमची बातमी लागली. तेव्हांपासून मी तुमची वाट पहात आहें. तुमचें दर्शन घेऊन मग मी उत्तम लोकास जाईन. माझे गुरु मतंग ऋषि यांचा हा आश्रम आहे. ते अनेक तपें करून दिव्य लोकास गेले. त्यांनींच मला योगमार्गाचें शिक्षण देऊन माझ्यावर अनुग्रह केला. मी तुमच्यासाठीं पंपा सरोवराच्या कांठीं मिळणारीं नाना जातीचीं फळें गोळा केलीं आहेत ' असें म्हणून तिनें त्यांस सर्व आश्रम व तेथें मुनिगणाच्या घर्मबिंदूपासून उगवलेलीं व कधींहि न

कोमेजणारीं अशीं दिव्य फुलें दाखविलीं. मग शबरीनें स्वतः चिता तयार करून व ती पेटवून आपला देह तींत ठेविला. आणि अग्निप्रमाणें तेजस्वी देह धारण करून ती उत्तम लोकास गेली. नंतर राम व लक्ष्मण पंपा सरोवराच्या पूर्व तीरावर आले.

वाल्मिकीची मूळ कथा ही अशी आहे. जशी ती घडली तशी ती त्यांनीं सांगितली आहे. शबरी कित्येक वर्षें मतंग ऋषीच्या आश्रमांत परिचारिका म्हणून होती. वाल्मीकीनें वर्णिल्याप्रमाणें ती 'तापसी' 'सिद्धयोगा' आणि 'सिद्धसंमता' होती. म्हणजे मतंग ऋषीकडून तिला योगमार्गाची प्राप्ति झाली होती. ती रामाला म्हणते, 'तुला पाहिल्यावर माझ्या जन्माचें सार्थक झालें. माझें तप फळाला आलें. मी आतां स्वर्गाला जाईन. रामचंद्र तर तिला हे विज्ञाने' म्हणजे 'ब्रह्मविद्येंत निष्णात अशा स्त्रिये' म्हणून संबोधतात. अग्नीमध्यें देहार्पण करून ती आत्मसमाधीच्या बलानें पुण्यवान् लोकाला प्राप्त झाली होती. ती गार्गी मैत्रेयीसारखी ज्ञानी होती असें रामायणाचा एक टीकाकार म्हणतो. दंडकारण्यांत त्यावेळीं जनकासारखे राजे दरबार भरवित नसत व ज्ञानाचीं सत्रें उघडीत नसत इतकेंच. अशा सिद्ध शबरीचें सत्काराचें वर्णन पद्मपुराणाच्या लेखकानें पुढील प्रमाणें केलें आहे:—

फलानि च सुपक्वानि मूलानि मधुराणिच। स्वयमासाद्य माधुर्यं परीक्ष्य परिभक्ष्यच ॥ पश्चान्निवेदयामास राघवाभ्यां दृढव्रता। फलान्यास्वाद्य काकुत्स्थः तस्यै मुक्तिं परां ददौ ॥ स्वतः आणलेलीं पिकलेलीं फळें व मधुर कंदमूळें शबरीनें तपासून व खाऊन पाहून नंतर तीं रामलक्ष्मणांना अर्पण केलीं. रामानें तीं फळें खाल्ल्यावर तिला मुक्ति दिली. पुराणांचें अंधानुकरण करून आमच्या संतांनीं व कवींनीं कथेला उठावदारपणा आणण्यासाठीं त्यांत भक्ति रस कांठोकांठ ओतला आहे. कवि आनंद तनयानें शबरीच्या भेटीचें वर्णन पुढील गोड व प्रेमळ शब्दांत केलें आहे. शबरीवर अन्याय झाला, पण भक्तीचा महिमा अत्यंत सरस व हृदयस्पर्शी वाणीनें गाथिला आहे.

दाही दिशा देउनियां निरीक्षा। मार्गीं फळांची करिते परीक्षा॥ चाखी मुखें गोड कडू फळा यां। टोंचोनि दांतें रसही कळा या॥ कटूम्ल त्याचि रसहीन फळासि टाकी। लागे मधू सरस तें वसनात झांकी॥ आली वना निकट उत्तम भिल्लिणी ते। जेथें जगजनक लक्ष्मण जानकी ते॥ तुझ्या कारणें म्यां फळें गोड रामा। अगा आगिलीं सेविं सीताभिरामा॥ १२॥ सारीं क्षतांकित फळें निरखोनि डोळा। 'कां हो अशीं' तिस पुसे रघुराज भोळा॥ चंचूपुटेंचि बहु चोखिलिं पांखरांनीं। नेणों दिला प्रतिफळास नखांक रानीं॥१३॥ चंचूक्षतें हीं नव्हतीं कृपाळा। मीं कां तशीं आणिन हा कपाळा॥ म्यां आपुल्या चाखुनि शुद्ध-दांतें। चाखोनि दे, मी स्वकरें तुम्हांतें॥ मधुरतर फळांचीं पूर्ण घेऊनि गोडी। मग मज रघुनाथा ठेवितां होय खोडी॥ निरखुनि रघुरायें भाव त्या भिल्लिणीचा परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा॥

भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे, रामाकरीं तीं फळें। घाली नेणुनि शास्त्रसिद्ध पुरुषा

उच्छिष्ट देतां बळें ॥ प्रेमें प्रेमभरें प्रसन्न-हृदयें, भक्ता जनांचा सखा। आत्माराम रमापति निजमुखीं झाला फळें अर्पिता ॥

तुलसीदासांनीं आपल्या रामायणांतहि भक्तिरसालाच प्राधान्य दिलें आहे. त्यांची रामायणाची कथा वाल्मीकि रामायणांतील कथेहून क्वचित् क्वचित् भिन्न आहे. तरीपण आपल्या भक्तिप्रेमाची उत्कटता दाखवितांना त्यांनीं असा वेडगळपणा केलेला नाहीं. शबरीनें रामाकरितां गोळा केलेलीं कंदमूळ फळें रामानें मोठ्या प्रेमानें खाल्लीं असेंच म्हटलें आहे.

' कंद मूल फल सुरस अति दिए राम कहुं आखि प्रेमसहित प्रभु खाए बारंवार बरकबि '

रामानें फळें खाल्यावर तिच्याशीं नवविधा भक्तीसंबंधीं चर्चा केली व जानकीबद्दल तुला कांहीं बातमी मिळाली आहे का म्हणून विचारलें. शबरीनें त्याला सुग्रीवाला भेटण्याची सूचना केल्यावर राम तेथून ऋष्यमूक पर्वताकडे जाण्यास निघाले.

मूळ रामायणांत 'मया तु संचितं वन्यं विविधं पुरुषर्षभ। तवार्थे पुरुषव्याघ्र पंपाया स्तीर सभवं' एवढेंच विधान आहे. रामानें तीं फळें खाल्ल्याचाही कोठें उल्लेख नाहीं. भरद्वाज, सुतीक्ष्णासारख्या मुनींनीं रामचंद्राचा संचित फळांनींच सत्कार केल्याचें दिसून येईल. पण आमच्या पुराणकारांस आणि कवींस शबरी ही एक रानवट, अशिक्षित, साधी भोळी पण भक्तिभावानें भारलेली अशी भिल्लीण दिसली. जबलपूर कॉलेजांतील श्री. नावलेकर नांवाच्या प्राध्यापकांस तर ती फारच सुंदर व तरुण दिसते. त्यांनीं ' New Approach to Ramayan' नांवाचा एक प्रबंध हल्लींच प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या मतें राम हा मोठा कारस्थानी पुरुष होता. त्यानें एक मोठा कट रचून लक्ष्मणाकडून शूर्पणखेचे नाक कान कापविले. हेतु हा कीं शूर्पणखा आपल्या भावाकडे तक्रार करील आणि मग रावण आपल्या बायकोला—सीतेला पळवून नेण्यास येईल व रामाला लंकेवर स्वारी करण्यास कारण मिळेल. ' त्याचे अगोदर सीतेच्या सल्ल्यानेंच तिला आश्रमांत गुप्त ठेवायची व शबरीला कटांत घेऊन तिचा सीतेचा 'डबल' (प्रतिकृति) म्हणून उपयोग करावयाचा. रावण शबरीलाच सीता म्हणून समजून पळवून नेईल. युद्ध समाप्ती नंतर लोक सीतेच्या चारित्र्याबद्दल शंका घेतील, तेव्हां शबरी-खोटी सीता—अग्नींत देह समर्पण करील व आश्रमांत लपून असलेली खरी सीता त्यावेळीं प्रकट होईल ! ' त्यांच्या म्हणण्याप्रमाणें हा कट तंतोतंत यशस्वी झाला ! आणि लक्ष्मण कसा फसला ? तर त्यानें म्हणे सीतेच्या तोंडाकडे कधींच पाहिलें नव्हतें. आणि त्याला आधार ! ' नाहं जानामि केयूरं...जानामि नूपुरम्' ऋष्यमूक पर्वतावर टाकलेले सीतेचे दागिने ओळखायच्या वेळेस लक्ष्मण म्हणतो. 'मी सीतेचीं कर्णकुंडलें ओळखीत नाहीं. मीं सीतेच्या तोंडाकडे कधीं पाहिलेलें नाहीं. पायांना वंदन करतांना मीं तिचीं फक्त नुपुरें पाहिलीं आहेत.' शबरीचीं उष्टीं बोरें रामानें खाल्लीं हें पाहून लक्ष्मण संतापला. त्याला दिलेला बोरांचा द्रोण त्यानें फेंकून दिला (?) म्हणून या प्राध्यापकांना तो तापट आणि आततायी

दिसला, म्हणून रामानें त्याला शबरीच्या कपट नाटकांत घेतलें नाहीं. बिचारा लक्ष्मण ! जो घरदार सोडून, राजवैभवाचा त्याग करून, आपल्या पूज्य मातेला व प्रिय पत्नीला चिरविरहांत टाकून, केवळ निस्सीम भ्रातृप्रेमानें रामाबरोबर चौदा वर्षें राना-वनांत पहाऱ्यावर, आश्रमाच्या दारावर राहतो, तो प्राध्यापकांच्या दृष्टीनें आत-तायी ठरतो, हें त्या बिचाऱ्याचें केवढें दुर्दैव ! वाल्मीकि तर त्याला मितभाषी, मृदु स्वभावाचा व व्यवहारज्ञ म्हणतो. शबरीनें गोळा केलेलीं फळें पूजे-प्रमाणें मानून घेतलीं, एवढाच रामायणांत उल्लेख आहे. त्यानें तीं खाल्लीं असतील पण तीं उष्टीं नव्हतीं. उष्टीं बोरें देण्या-इतकी ती अजागळ रानटी नव्हती. अध्यात्म रामायणांत रामानें शबरीचीं बोरें खाल्लीं व नंतर तिच्याशीं भक्तीच्या विविध प्रकारांवर चर्चा केली. ती रामाशीं तादात्म्य पावली. झालें: तेवढ्यावर राव-णास फसविण्याच्या हेतूनें शबरी रामाची तोतयी पत्नी म्हणून राहण्यास कबूल झाली आणि सीतेनेंही त्या कृत्यास अनुमति दिली, असें प्राध्यापक श्री. नावलेकरांस वाटतें. बुद्धीची ही केवढी कोलांटी उडी ! तरी बरें, खरी सीता शेवटची भेट होण्यापूर्वींच राव-णानें दंडकारण्यांतून पळवून नेली होती. शबरीचीं हीं कल्पित बोरें खाल्ल्यामुळें किती लोकांचा बुद्धिभ्रंश झाला ! ज्ञानमार्गी शबरी रामाशीं भक्तिमार्गानें तादात्म्य पावल्यावर त्यालाही त्या तापसी वृद्ध जरितेशीं पतिभावानें वागण्याची इच्छा झाली ! मग इतरांची काय कथा ! श्रीयुत नावलेकरांचा रामायणाकडे पाहाण्याचा हा नवा दृष्टिकोण ! ऐकावें तेवढें थोडेंच. बिचाऱ्या शबरीच्या नशिबास भविष्यकाळांत नवनव संशो-धकांकडून आणखी कोणते धिंडवडे निघावयाचे आहेत देव जाणे !

## लक्ष्मण रेषा

लक्ष्मण-रेषा हीही अशीच कपोल-कल्पित आहे. शूर्पणखेनें आपले नाक-कान कापल्याची तक्रार रावणाकडे नेल्यानंतर रावणानें रामाचा सूड घेण्याचा बेत करावा ही गोष्ट अगदीं स्वाभाविक होती. शिवाय खर दूषणादि चौदा हजार राक्षसांना मारल्याबद्दलचा डंख त्याच्या मनांत होता. रामलक्ष्मण सीतेसह दंडकारण्यांत एकटे आल्याची आयती संधि त्याला मिळाली होती. राम लक्ष्मणावर हल्ला करून सीतेला पळविण्याचा बेत त्यानें आपला मामा मारीच ह्याला निवेदन केला. मारिचाला रामाचा पराक्रम ठाऊक होता. एकट्या रामानें आपल्या बाहुबलानें चौदा हजार राक्षसांना मारल्याचें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें होतें. रावणाला अशा दुष्कृत्यापासून परा-वृत्त करण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु रावणानें त्याचा धिक्कार केला. तेव्हां मारी-चानें नाइलाजास्तव त्याला एक उपाय सुचविला. मारिचानें सुवर्णमृगाचें रूप घेऊन सीतेच्या नजरेस पडावें. स्त्री स्वभावानुसार सीता आपल्या कंचुकीकरतां सुवर्णमृग मारून आणण्याचा रामाकडे हट्ट घेईल. राम मृगाच्या मागें लागला असतां मृगानें त्यास हुलकावण्या देऊन दूर न्यावें व 'मेलों मेलों, धांवा, धांवा' असा रामासारखा आवाज काढून सीतेला व लक्ष्मणाला फसवावें. सीतेच्या आग्रहा-

वरून लक्ष्मण रामाच्या मदतीला धांवून जाईल. सीता एकटी असतांना रावणानें तिला पळवून लंकेला न्यावें. रावणाला हा बेत पसंत पडला. मारीच सुवर्णमृगाचें रूप घेऊन सीतेच्या आश्रमाजवळ फिरकूं लागला. अर्थात् त्याच्या सुवर्णमय कातड्याचा सीतेला मोह पडला. व त्याला मारून आणण्याबद्दल तिनें रामाला गळ घातली. राम धनुष्यबाण घेऊन निघाले. ते हरणाच्या मागें दूर दूर गेले. हरणानें 'लक्ष्मणा धांव धांव' असा आवाज काढतांच सीता भयानें कांपू लागली व ती लक्ष्मणास रामाचे मदतीस जाण्यास आग्रह करूं लागली. लक्ष्मण म्हणाला, 'सीते असल्या आवाजानें भिण्याचें कारण नाहीं. राम त्रैलोक्याला अजिंक्य आहे. देव, दैत्य, राक्षस, पन्नगांनाही तो भारी आहे. असल्या क्षुल्लक हरणाला तो दवणारा नाहीं. खर, दूषणांना मारल्यापासून राक्षस आपल्या वैरावर आहेत. नाना तऱ्हेचे आवाज काढून ते आपणांस फसविण्यास कमी करणार नाहींत. अशा स्थितींत तुला आश्रमांत एकटी सोडून मला जाणें शक्य नाहीं. तशी मला रामाची आज्ञा नाहीं. राम येईपर्यंत त्यानें तुला 'न्यास' म्हणून माझ्या स्वाधीन केली आहे. या अरण्यांत राक्षस जागोजागीं दबा धरून राहिले आहेत.' लक्ष्मणाचें हें भाषण ऐकून सीतेचा राग अनावर झाला. ती म्हणाली, 'तूं दुष्ट आहेस, राम मरावेत अशी तुझी इच्छा आहे. त्याकरितांच भरतानें तुला पाठविलें आहे. माझेबद्दल तुला अभिलाषा आहे. लक्षांत ठेव. मी तुला तशी मिळणार नाहीं. मी जीव देईन. मी विष खाईन. तूं जा. मी एकटी असतांना कोणी आला तर मी अग्नींत उडी घेईन.' असें म्हणून ती छाती बडवूं लागली. लक्ष्मणानें उत्तर दिलें. 'सीते, हे तुझे शब्द मला कानांत तापलें तेल ओतल्याप्रमाणें ताप देत आहेत. तुला माणसाची परीक्षा नाहीं. स्त्री—स्वभावानुसार हें तूं बोलत आहेस. तुला रामाचा पराक्रम ठाऊक नाहीं. माझा नाइलाज आहे. हा मी चाललों. वनदेवतांनों, तुम्हीं हिचें रक्षण करा. गोदावरी माते, तूं हिचें रक्षण कर.' असें म्हणून लक्ष्मण धनुष्यबाण घेऊन रामाचे मदतीस निघून गेला.

रावण हें पहात जवळपास उभा होताच. लक्ष्मण दूर गेलासें पाहून रावण त्रिदंडी संन्यासाचा वेष घेऊन आश्रमाच्या दाराशींच येऊन 'भिक्षां देहि' म्हणून उभा राहिला. कांहीं प्रश्नोत्तरें झाल्यावर राम येईपर्यंत सीतेनें त्यास बसावयास सांगितलें. पण रावणास बसावयास वेळ कोठें होता ? त्यानें आपलें मूळचें रूप प्रगट केलें व सीतेस मागणी घातली. मागणी सीतेनें झिडकारतांच तिला उचलून त्यानें आपल्या रथांत घातली व आकाशमार्गें तो लंकेच्या रोखानें निघून गेला. मूळकथा ही अशी आहे. लक्ष्मण रेषेचा एथें कोठेंच उल्लेख नाहीं.

## छाया—सीता

रावणानें उग्ररूप धारण करतांच वनदेवता भीतीनें पळून गेल्या. गोदावरी संथ वाहूं लागली. सीतेला रावण लगट करायच्या अगोदर अग्निप्रवेश करायला

उसंतही मिळाली नाहीं. रावण इतका वेडगळ नव्हता. खऱ्या सीतेनें अग्निप्रवेश केला व मायामयी सीता रावणाच्या हातांत मिळाली असा एक अपसमज पुराणकारांनीं प्रसृत केला आहे. आणि त्याला आधार काय! तर उत्तरकांडांत युद्ध समाप्तीनंतर सीतेनें अग्निदिव्य केल्यावर ती अग्नींतून निर्वेध बाहेर पडली. म्हणजे छाया-सीता अग्नींत जळली व खरी सीता ही बाहेर आली. पण मुळांतच सीतेला अग्निप्रवेश करण्याची संधि रावणानें दिली नाहीं, हें आपण पहातों. आणि मायारूपी सीताच जर रावणाला मिळाली होती, तर पुढें होणाऱ्या शोकप्रसंगांची घटनाच घडण्याचें कारण नव्हतें. आश्रमांत परत आल्यावर राम-लक्ष्मणाला अग्निप्रवेशाचा देखावा दिसला असता. सीता-शोधाचा प्रयास नको होता. रावणाशीं युद्ध करण्याला सीताच पळवून न्यायला पाहिजे होती असें नाहीं. राक्षसांचा उपद्रव, माणसांचा संहार, यज्ञयागांत विघ्नें वगैरे अनेक कारणें पुरेशीं होती. परंतु वाल्मिकीला यथार्थ घटनाच वर्णन करायच्या होत्या. त्याला मीठमसाल्याची गरज नव्हती. त्याच्या वर्णनांत अद्‌भुत असे प्रसंग फारच थोडे आहेत. आश्रमाच्या बाहेर प्रतिबंधक रेषा ओढण्याची कल्पना लक्ष्मणाच्या मनांत आली नाहीं. तो आपली शक्ति जाणून होता. तो मतंग ऋषीसारखा सिद्ध तपस्वी नव्हता. वालीनें एका राक्षसाचें धड पायानें उड-विल्यामुळें कांहीं रक्ताचे थेंब मतंग ऋषीच्या आश्रम परिसरांत पडले होते. त्यामुळें वाली आश्रमांचे परिसरांत आल्यास मृत होऊन पडेल असा मतंग ऋषीनें त्यास शाप दिला होता. लक्ष्मणाची तशी परिस्थिति नव्हती. राम-लक्ष्मणाचें "देव चरितं चरेत्" हें ध्येय नव्हतें. त्यांना मानव-जीवनांचा परमोत्कर्ष बिंदु आच-रणांत आणावयाचा होता. श्री रामचंद्रांनीं "मी दशरथ राजाचा मुलगा आहे, मी देव नाहीं.' असें अनेकांना सांगितलें होतें. दंडकारण्यांतील ऋत्विजांना आपल्या पायां वर मस्तक ठेवण्याची त्यानें मनाई केली होती. तोच त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवीत असे. त्यानें देव म्हणून रावणाशीं एकाकी युद्ध केलें नाहीं. सुग्रीवाशीं मैत्री केली. वानराचें सहाय्य घेतलें. सीतेला पळवून नेल्यावर साध्या मानवासारखा वृक्षाला कवटाळून तो ढळढळां रडत होता. तिच्या शोधार्थ रानावनांतून हिंडत होता. प्रजानुरंजनाकरतां त्यानें आपल्या गरोदर प्रियपत्नीचा त्याग करण्यासही कमी केलें नाहीं. अशा ध्येयवादी 'पुरुषो-त्तमाच्या आयुष्यांत अततेला स्थान नाहीं. वाल्मकिनेंही राम-लक्ष्मण-सीतेला वास्तव स्वरूपांतच रंगविलें आहे. रामचंद्र पुरुषोत्तम असून कांहीं लोक त्याला मर्यादा-पुरुषोत्तम म्हणतात हें नवल आहे. श्री. रामचंद्राची कथा अत्यंत उत्साह जनक, आदर्शभूत, आणि लोक-प्रिय असल्यानें आज शेंकडों वर्षें ती भारतांत लक्षावधि लोकांच्या तोंडांत घोळत आहे. तिच्या मूळस्वरूपांत पौराणिकांकडून, नाटककारांकडून, कविकडून, सहेतुक, निर्हेतुक बदल होणें अपरिहार्य आहे. ज्ञानोपासकांत त्याचें सत्यस्वरूप कळावें या हेतूनें वरील विचार मांडले आहेत.

---

१८

# नामाचा महिमा



श्री गोंदवलेकर महाराज १९१३ सालच्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवाच्या वेळीं पंढरपूरला होते. त्या मुक्कामांत एक संस्मरणीय संवाद–प्रसंग घडला. तो असा.

तुकारामबुवा वलव्हणकर या नांवाचे एक मठपति त्यावेळीं पंढरपुरास नेहमीं येत असत. मनुष्य वेदान्तशास्त्रामध्यें निष्णात असून त्याची उपासना देखील कडक होती. मथुरा वृंदावनाकडील एक मोठे संन्यासी त्यांचे गुरु होते. त्यांनीं तुकारामबुवांना बालकृष्णाची उपासना दिली होती. पुष्कळ लोक तुकारामबुवांना गुरु मानीत असत. वेदन्तशास्त्र चांगलें जाणत असल्यामुळें त्यांचें कीर्तन किंवा प्रवचन फारच उत्तम वठत असे. ज्ञानेश्वरी सांगण्यामध्यें तर त्यांचा हातखंडा होता. पण त्यामध्यें एक विशेष होता तो हा कीं, भगवंताच्या नामापेक्षां त्याचें रूप श्रेष्ठ आहे' असें मोठ्या अट्टाहासानें ते प्रतिपादन करीत. श्रीमहाराजांचा आणि वलव्हणकरांचा चांगला स्नेह होता. दोघेहि यावेळीं पंढरपुरांत होते. आषाढी एकादशी झाल्यानंतर वलव्हणकरांचा एक शिष्य श्रीमहाराजांच्या दर्शनास आला. श्रीमहाराज सहज त्याला म्हणाले,

'भगवंताचें नाम घेत जावें. नामांत भगवंताचें सर्वस्व सांठविलें आहे.'

शिष्यानें आपल्या गुरुकडे जाऊन हें सांगितलें. त्याच दिवशीं वलव्हणकरांनीं संध्याकाळीं कीर्तन केलें आणि नामापेक्षां रूप श्रेष्ठ आहे, असें अनेक शास्त्राधार देऊन फार सुंदर प्रकारानें प्रतिपादन केलें. श्रीमहाराजांना त्यांनीं निरोप पाठविला कीं, 'उद्यां आपण भगवंताचें नाम श्रेष्ठ आहे हें सिद्ध करून द्यावें.' श्रीमहाराजांनीं उलट निरोप धाडला कीं, 'मी कोणी शास्त्री किंवा पंडित नाहीं. मी माणदेशचा अज्ञ रहिवासी असून रामाचें नाम तेवढें जाणतों. आपणच आपली सर्व मंडळी घेऊन इकडे राममंदिरांत यावें. आपण आपली बाजू मांडा व मी माझी बाजू मांडतों. आपल्या वादाचा निकाल आपोआपच लागेल.'

वलव्हणकरांनीं ही गोष्ट कबूल केली. ते येण्याच्या आदल्या दिवशीं अप्पासाहेब भडगांवकरांनीं श्रीमहाराजांना दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या वादाची आठवण दिली. तेव्हां महाराज म्हणाले, 'अप्पासाहेब! आपल्याला घाबरण्याचें काय कारण आहे! नाम हें स्वतःसिद्ध आहे. त्याच्यामध्यें खुद्द भगवंताची सत्ता जागृत असल्यानें त्याचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास इतर कोणाची जरूर आहे! जन्मभर मी नामाला चिकटून आहे. वलव्हणकरांच्या गळ्यांत माळ घालीन तेव्हांच पंढरपूर सोडीन!'

दुसऱ्या दिवशीं दुपारीं तीन वाजतां वलव्हणकर बरीच मंडळी बरोबर घेऊन श्रीमहाराजांच्याकडे आले. श्रीमहाराजांनीं त्यांना हात धरून मोठ्या आदरानें स्वतःच्या शेजारीं लोडाला टेंकून बसविलें. दोघेहि उच्चासनावर बसलेले असून समोर सर्व मंडळी बसली होती. पंढरपुरांतील कांहीं शास्त्री व पंडित देखील या सभेस हजर होते. आरंभीं सभच वातावरण जरा संशयग्रस्त होतें. कारण दोन्ही बाजूच्या मंडळींना सभेचा शेवट कसा होईल याची खात्री नव्हती. पण त्याबरोबरच आपली बाजू खरी ठरावी आणि बहुतेक ती खरी ठरेलच असेंहि प्रत्येकाला वाटत होतें कांहीं झाले तरी आपल्या गुरूचा अपमान न व्हावा ही प्रत्येकाची मनापासून इच्छा होती.

सर्वजण व्यवस्थितपणें बसल्यावर श्रीराममहाराजांनींच बोलण्यास आरंभ केला. ते म्हणाले, ' माझ्या विनंतीला मान देऊन आपण आपल्या मंडळींसह येथें आलांत याचा मला आनंद होत आहे. आपण आपलें म्हणणें अमदीं निःशंकपणें मांडावें. सर्वांनीं शांतपणें ऐकून घ्यावें.'

वलव्हणकरांनीं डोळे झांकून नमन केलें आणि स्पष्टपणें बोलण्यास सुरुवात केली.

**वलव्हणकर** : वादाच्या आरंभींच मी आपल्याला विचारतों कीं नुसत्या शास्त्रजनिक ज्ञानापेक्षां भक्ति श्रेष्ठ आहे.' हें आपण मानतां ना ?

**श्रीमहाराज** : मी देखील आरंभींच आपल्याला सांगतों कीं, हा आपला वाद नसून संवाद आहे. भक्ति श्रेष्ठ आहे असें मी मानतों.

**वल०** : भक्ति म्हणजे परमात्मस्वरूपाचें परमप्रेम होय. कर्म, ज्ञान व योग हीं साधनें असून भक्ति हें साध्य आहे. हें खरें ना ?

**श्री०** : होय, बरोबर आहे.

**वल** : कर्ममार्गामध्यें नुसतें कर्म बरोबर करण्याच्या हिशोबांत मन अडकून जातें म्हणून नुसता कर्ममार्गी कर्मठ व जड बनतो.

**श्री०** : होय, त्याला भगवंताचा विसर पडतो.

**वल०** : योगांमध्यें वृत्तींना आवरून धरण्याची खटपट करावी लागते. वृत्ति शांत झाल्या म्हणजे मन शून्याकार होणें. तेथें भगवंत कुठला ?

**श्री०** : होय, वृत्ति आवडणाऱ्याला भगवंताचें प्रेम असेच असेल सांगतां येत नाहीं.

**वल०** : ज्ञानमार्गामध्यें आत्मनात्म विचाराला प्राधान्य असल्यामुळें बुद्धीच्या सामर्थ्यावर फार भर असते. पण मायेचा जोर फार विलक्षण असल्यानें साधकाला ती केव्हां फसवील याचा नेम नसतो. ज्ञानमार्ग फार कठीण आहे.

**श्री०** : होय. ज्ञानमार्गी माणसाला अभिमानाची बाधा लवकर होते. माझें मतच तेवढें खरें असें तो धरून चालतो.

**वल०** : ज्ञानी मनुष्य जगताला 'माया कार्य ' मानतो. जगत् मिथ्या आहे असें तो समजतो. परमाला जर सर्वव्यापी आहे तर हें जगत् त्याच्यामध्येंच असलें

पाहिजे. म्हणून भक्त, या सृष्टीला मिथ्या न मानतां भगवंताची लीला समजतो. या सृष्टीमध्यें सर्व ठिकाणीं भगवंताचा महिमा, त्याचें विभूतिमत्व व त्याचा आनंद भरलेला दिसून येतो.

**श्री०** : भगवंताचें स्वरूप ज्याला समजलें त्याला असें दिसेल यांत शंका नाहीं.

**वल०** : इतकेंच नव्हे. माझें म्हणणें पुढें असें कीं, सृष्टीमधील सौंदर्य, माधुर्य, मनोहर भाव, पावित्र्य आणि प्रेम पाहून जीव मोहित होतो. सृष्टीमधील विभूतिरूपांची उपासना करून जीवाची तृप्ति होत नाहीं. कारण विभूति हे साक्षात् भाव नाहींत. म्हणून भगवंताच्या साक्षात् गुणांची व भावांची जरूर लागते. त्यांच्या प्राप्तीनें जीवाची तृप्ति होते. यासाठीं मी म्हणतों कीं, सौंदर्यानें आणि माधुर्यानें भरलेलें भगवंताचें रूप हेंच श्रेष्ठ आहे.

**श्री०** : वा, फार छान! आपलें म्हणणें मला पटलें. पण मला एक शंका अशी येते कीं, सौंदर्यानें व माधुर्यानें भरलेलें एखादें रूप भगवंताचेंच आहे हें समजण्यास त्याला भगवंताचें नाम देणें जरूर आहे ना? म्हणजे त्या रूपाला भगवंताचें नाम दिलेलें नसेल तर तें रूप मायावी राक्षसाचें देखील ठरेल.

**वल०** : अहो, कारणापासून कार्य भिन्न नाहीं हा तर वेदान्ताचा सिद्धान्त आहे. अर्थात जगत हें भगवंतापासून भिन्न नाहीं. जगतांत आढळणारीं सर्व रूपें भगवंताचींच आहेत. मग नामाची जरूर कोठें आहे?

**श्री०** : कुंभारानें एकाच मातीपासून अनेक भांडीं तयार केलीं. प्रत्येक भांड्यांत मातीशिवाय दुसरें कांहींच नाहीं. तरी प्रत्येक भांड्याचें नांव निराळें. असें कां? तुकारामबुवा एवढे मोठे संत बनले. पण भगवंत सर्व ठिकाणीं व्यापून आहे म्हणून ते विठोबाला राम म्हणाले नाहींत किंवा दत्ताला महादेव म्हणाले नाहींत. रूपाची ओळखण खऱ्या नामानेंच होते.

**वल०** : प्रत्येक वस्तूमध्यें तिचें मूळद्रव्य आणि तिचें रूप हीं अंगें दृष्टीस पडतात. पदार्थाला आकार आला तर त्याला नांव देतां येतें. आधीं आकार तयार होऊन मग त्याला नांव प्राप्त होतें. मूल जन्मण्याच्या आधीं कोणी त्याचें नांव ठेवीत नाहीं. आधीं नांव व मग रूप असा कांहीं कोणाचा अनुभव नाहीं.

**श्री०** : तुम्हीं म्हणतां तें खरें आहे. परंतु आपण सत्य कशाला म्हणतां?

**वल०** : देशकालाच्या पलीकडे जें कायम टिकतें तें सत्य होय.

**श्री०** : होय ना! मग प्रत्यक्ष आकाराला आलेलीं अनेक रूपें नाहींशीं झालीं तरी त्यांचें 'नांव' टिकून राहातें. म्हणजे 'नाम' हें देशकालाच्या मर्यादेपलीकडे असतें. तुमच्याच म्हणण्याप्रमाणें नाम हें रूपापेक्षां जास्त सत्य नव्हे काय? जें सत्य आहे तें श्रेष्ठ असलेंच पाहिजे.

**वश०** : एकाच प्रकारचीं रूपें असतील तर आपलें म्हणणें खरें ठरेल. पण पुस्तक, मंदिर, आंबा व माणूस हीं रूपें निराळीं आहेत. म्हणून त्यांचीं नांवें निराळीं. या रूपांच्यामध्यें एकच नाम कोठें आहे?

**श्री० :** कां बरें ? व्यवहारदृष्ट्या, पुस्तक, मंदिर आंबा यांचें मूलद्रव्य निरनिराळें आहे असें वाटतें. रोजच्या व्यवहारामध्यें तें योग्यच आहे. पण आपण आरंभींच सांगितल्याप्रमाणें जगतामध्यें परमात्माच भरलेला आहे

म्हणून जगांतील यच्चयावत् वस्तूंचें मूलद्रव्य एकच आहे. आणि अनेक रूपें आलीं वा गेलीं तरी तें मूलद्रव्य कायमच राहातें. म्हणून भगवंताचें नाम श्रेष्ठ आहे.

**वल० :** आपलें स्वाभाविक प्रेम रूपावर आहे. ज्याच्यावर आपलें प्रेम आहे त्याच्या रूपाचें ध्यान केलें असतां चंचल मन लवकर शांत होतें. शिवाय आपली ज्ञानक्रिया पाहिली तर हेंच आढळतें. पहिल्यानें पदार्थाचें रूप दृष्टीस पडतें व नंतर त्याचें नाम येतें. कदाचित नाम आधीं कळलें तरी 'रूप' पाहिल्याशिवाय पदार्थाची खरी ओळखण आपल्याला होत नाहीं. म्हणून रूपच श्रेष्ठ आहे.

**श्री० :** आपण थोडासा असा विचार करा कीं, आपण आपल्या इंद्रियांनीं 'रूप' आंत घेतों हें खरें. पण तें रूप अमक्याचें आहे हा जो विचार बुद्धीमध्यें उत्पन्न होतो त्याला रंग, वास, आवाज, चव आणि स्पर्श असतो का ? नसतो ना ? याचा अर्थ असा कीं रूप जरी जड असलें तरी त्या रूपाचें ज्ञान हें सूक्ष्म असतें. आपले सर्व विचार शब्दानें चालतात. शब्द हा ज्ञान सांठवतो. भगवंताचें नाम हा शब्दच आहे. म्हणून भगवंताच्या रूपांचें सर्व ज्ञान त्याच्या नामांत सांठविलेलें आहे. एक नाम घेतलें कीं त्यामध्यें भगवंताचें समग्र वर्णन येतें. उदाहरणार्थ, श्रीसमर्थ रंगानें गोरे होते, शरीरानें मजबूत होते, त्यांना दाढी होती, ते गुरू होते, ते भिक्षा मागत असत त्यांनीं दासबोध लिहिला, कल्याण त्यांचा शिष्य होता. इत्यादि सर्व गोष्टी 'रामदासस्वामी' या नांवामध्यें सांठविलेल्या आहेत. म्हणून नामाच्या मागें 'रूप' आपोआप येतें.

**वल० :** असें कसें होईल ? नुसतें नाम घेऊन भगवंताची प्राप्ति कशी होईल? नुसतें अग्नि म्हटल्यानें तोंड पोळत नाहीं. किंवा नुसतें पाणी म्हटल्यानें तहान भागत नाहीं.

**श्री० :** व्यवहाराच्या दृष्टीनें आपलें हें म्हणणें खरें आहे. परंतु भगवंत हा नुसता जडच नाहीं. तर तो अत्यंत सूक्ष्म आहे. जड वस्तुमध्यें तिचें रूप आणि नाम हीं निरनिराळीं असतात. पण भगवंताच्या बाबतींत हीं एकच आहेत. 'रूप' ही भगवंताची जड खूण आहे. पण 'नाम' ही त्याची सूक्ष्म खूण आहे.

**वल० :** प्रेम व्यक्त करण्यास रूपच पाहिजे. मनाला व्यक्ताशिवाय प्रेम करतां येणार नाहीं.

**श्री० :** व्यक्त हें एकदेशी व मर्यादित असतें. पण सर्व व्यक्ताचें पर्यवसान ज्या अव्यक्तामध्यें घडतें, त्याला घट्ट धरण्यास उपाय कोणता ? त्याला उपाय 'नाम' हाच आहे. कारण अनेक रूपांना व अनेक गुणांना अव्यक्त रुपानें सांठविणारें असें तें आहे.

**वल० :** रूपाशिवाय भगवंताच्या लीला होणार नाहींत. आणि लीलावर्णनाशिवाय त्याचें प्रेम येणार नाहीं. हें तरी खरें कीं नाहीं ?

श्री० : कोण नाहीं म्हणतों ? पण ज्याच्या लीला वर्णन करायच्या त्याचें 'नाम' त्यांत नसेल तर ? इतकेंच नव्हे तर लीला ऐकून त्याच्या नामावर प्रेम बसेल आणि त्याचें नाम घेतलें कीं, त्याच्या लीला आठवतील. किंबहुना नामामध्यें भगवंताच्या सर्व लीला सांठवलेल्या असतात. म्हणून त्याचें नाम उच्चारलें कीं, आपल्या भावना उचंबळून येतात.

वल : आपण कांहीं म्हणा ! पण भगवंताच्या रूपाचें दर्शन झाल्यावांचून मनाला खरें समाधान होत नाहीं.

श्री० : हें मला पूर्ण कबूल आहे. पण चोवीस तास दर्शन करीत राहाणें हें शक्य आहे कां ? त्याचें नाम मात्र चोवीस तास राहूं शकेल. शिवाय भगवंताचें रूप प्रत्यक्ष पाहात असतां त्याचें ध्यान करतां येणार नाहीं. पण त्याला पाहात असतां त्याचें नाम मात्र घेतां येईल. 'नाम' हें रूपापेक्षां जास्त व्यापक आहे.

वल० : आपण नामाला फार महत्त्व देतां. अहो ! रूप जर नसतें तर भगवंताचे गुण आपल्याला कळले असते कां, हें मला सांगा !

श्री० : रूपाशिवाय भगवंताचे गुण आपल्याला कळणार नाहींत ही गोष्ट खरी ठरली. पण त्याच्या अनेक रूपांना व्यापून टाकणारे गुण नामानेंच ओळखले जातात, त्यांचीं रूपें कितीहि आलीं आणि गेलीं तरी नामानें त्याचा बोध होत नसल्यानें त्याचे गुण मनासमोर येतात. भगवंताचीं रूपें जेथून येतात तेथें नामाचें वास्तव्य आहे.

'महाराज, मी आपल्याला नमस्कार करतों' असें म्हणून वलव्हणकरांनीं श्रीमहाराजांना नमस्कार केला आणि ते पुढें म्हणाले,

वल० : माझी खात्री झाली कीं नाम हें रूपापेक्षां श्रेष्ठ आहे, पण मला त्यावर कांहीं शंका येतात. त्या आपल्याला विचारूं का ? आपल्याशिवाय माझ्या शंका दुसरा कोणी निवारण करूं शकणार नाहीं.

श्री० : अवश्य विचाराव्यात. नामाच्या बाबतींत कोणींहि कोणतीहि शंका विचारावी. परंतु आधींच सुचवून ठेवतों कीं, नामाबद्दलच्या सर्व शंका 'नाम' घेत गेल्यानें आपोआप नाहींशा होतात. तरीहि मनांत आलेली शंका जरूर विचारावी.

वल० : महाराज ! रूपाला अस्तित्व कां आहे, हा खरा प्रश्न आहे. जर नाम हें श्रेष्ठ आहे तर तें आधीं असलें पाहिजे आणि जर आधीं असेल तर त्यांतून रूप कसें उत्पन्न होतें, हें समजाऊन सांगा.

श्री० : तुमचा प्रश्न मला फार आवडला. मी सांगतों तें नीट समजाऊन घेतलें तर तुम्ही नाम सोडणारच नाहीं. समजा मी तुम्हांला प्रश्न विचारला कीं, 'आनंद म्हणजे काय ?' एखाद्या आनंदी बोट दाखवून तुम्ही म्हणतां कीं, 'हें पहा, येथें आनंद आहे.' इतकेंच नव्हे तर याप्रमाणें आनंदानें खेळणारीं मांजराचीं पिलें, उड्या मारणारीं लहान वांसरें, हंसणाऱ्या स्त्रिया व पुरुष, फुलांनीं बहरलेल्या लता यांच्याकडे बोट दाखवून 'येथें आनंद आहे' असें तुम्हीं मला सांगाल. पण हें कांहीं माझ्या प्रश्नाचें खरें उत्तर नव्हे. आनंदी 'वस्तु' कोणत्या आहेत, हा माझा प्रश्न नसून

आनंद मला दाखवाल काय, असें मी विचारलें होतें.

**वल** : पण आनंद हा वस्तूंच्या बाहेर राहूं शकतो का ? आनंद कसा असतो हें समजण्यास आनंदी वस्तूंच्याकडेच आपल्याला जाणें जरूर आहे.

**श्री०** : खरें आहे. आनंदी वस्तूंमध्यें आनंद असतो म्हणून वस्तु हा कांहीं आनंद नव्हे. लहान मूल हेंच जर आनंद असेल तर मोठे स्त्रीपुरुष किंवा वासरें किंवा मांजरीचीं पिल्लें आनंदयुक्त असूं शकणार नाहींत. अर्थात आनंद हा एकच असला पाहिजे. कारण सर्व ठिकाणीं आढळणाऱ्या आनंदाला एकच शब्द आपण वापरतों.

**वल०** : आनंद हा शब्द एकच असला तरी प्रत्येक वस्तूचा आनंद निरनिराळा असूं शकेल.

**श्री०** : हें देखील मला कबूल आहे. आपण जो जो माणूस पाहतों तो तो निराळा असतो. एकाची ठेवण अगदीं पूर्णपणें दुसऱ्या सारखीं कधींच आढळत नाहीं. तरी सर्वांनीं आपण माणसेंच म्हणतों. तें कां ?

**वल०** : याचे कारण म्हणजे प्रत्येकजण निराळा असला तरी मनुष्यपणा हा सर्वांच्यामध्यें सारखाच असतो.

**श्री०** : हा मनुष्यपणा आपल्या इंद्रियांना दिसतो का ?

**वल०** : नाहीं. कारण तो मनामध्यें असतो.

**श्री०** : याचा अर्थ असा कीं, प्रत्येक माणसामध्यें मनुष्यपणा आहे तो आपल्या इंद्रियांना दिसत नसला तरी मनानें ओळखतां येतो. आणि त्याचें अस्तित्व 'मनुष्य' या शब्दानें सांगतां येतें.

**वल०** : होय महाराज. येथपर्यंत सर्व पटलें.

**श्री०** : आतां आपण एक पायरी पुढें जाऊं. अनेक माणसांना पाहून मनुष्यपणाची जी कल्पना आपण करतों ती केवळ आपल्याच मनाचा खेळ आहे, का 'मनुष्यपणा' म्हणून कांहीं वस्तु खरोखर आहे ? जर तो आपल्या मनाचाच खेळ असेल तर आपण त्याची कल्पना केली कीं मनुष्यपणा उत्पन्न होईल आणि आपली कल्पना मोडली कीं तो नाहींसा होईल. हें खरें आहे का ?

**वल०** : असें कसें होईल ? इतकेंच नव्हे तर आपण मरून गेलों तरी मनुष्यपणा आहे तसाच कायम राहतो.

**श्री०** : वा, शाबास ! 'मनुष्यपणा' हा शब्द आहे, हें नांव आहे.
म्हणून रूपाला अस्तित्व नामामुळें आहे. प्रत्येक माणूस हा माणूसपणामुळेंच माणूस बनतो, तसें प्रत्येक वस्तूचें बाह्य रूप तिच्या नामामुळें टिकतें. आतां या पुढचा प्रश्न असा कीं, नाम हें रूपाच्या आधीं असलें पाहिजे, त्यांतून रूप कसें उत्पन्न होतें याचें उत्तर सांपडण्यासाठीं आपल्याला नामाचा आणखी थोडा विचार केला पाहिजे.

**वल०** : महाराज, खरें सांगायचें म्हणचे आम्हांला आजपर्यंत 'नामा'चा अर्थच कळला नाहीं. खरोखर, आज मोठा भाग्याचा दिवस आहे.

**श्री०** : अहो, ज्या दिवशीं तुम्हीं नामांत रंगून जाल, त्या दिवशीं धन्य.

व्हाल. नामाचें माहात्म्य मोठमोठ्यांना कळत नाहीं. पण एखाद्या भाविक अडाणी माणसाला तें कळतें. असो. माणसें अनेक असलीं तरी त्यांच्यामध्यें राहाणारा मनुष्यपणा एकच असतो. म्हणून तर सर्व प्रकारच्या व्यक्तींना मनुष्य हें एकच नाम लागू पडतें. आनंदी वस्तू अनेक असल्या तरी त्यांच्यामध्यें राहाणारा 'आनंद' एकच असतो. म्हणजे एकच नव्हे तर अनेक रूपें आलीं व गेलीं तरी 'नाम' आपलें शिल्लक राहातें. थोडा विचार केला तर कोणालाहि हें सहज पटेल. आजपर्यंत या पृथ्वीच्या पाठीवर अगणित स्त्री व पुरुष जन्माला आले, जगले व मेले. तरी 'मनुष्यपणा' आहे तसाच आहे. हा नियम सर्वत्र लावला तर असें दिसेल कीं, चांगल्या वस्तू आल्या व गेल्या पण चांगलेपणा कायम आहे. सुंदर वस्तु आल्या व गेल्या, पण सौंदर्य कायम आहे, आनंदी वस्तू आल्या व गेल्या, पण आनंद कायम आहे. लाखों जीव आले व गेले पण जीवन कायम आहे.

**वल०** : महाराज, हें मला समजलें. पण हें जीवन, हा आनंद, हें सौंदर्य रूपाशिवाय राहातें कोठें ? समजा, सर्व रूपें नाहींशीं झाली तरी तें टिकेल का ?

**श्री०** : अर्थात ! कसें तें ऐका. रूपें अनेक असलीं तरी नाम एकच असतें. हें आपण पाहिलें. म्हणजे नाम हें अनेकत्वांत एकतत्वानें राहाणारें असतें. याचा अर्थ असा कीं, नाम हें रूपापेक्षां व्यापक असतें. व्यापक वस्तूचें क्षेत्र मोठें असल्यानें तिच्यामध्यें शक्ती देखील अधिक असते. जिच्यामध्यें शक्ति जास्त असते ती वस्तु अधिक स्वतंत्र असते. जी वस्तु अधिक स्वतंत्र असते तिला बंधनें किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हें रूपापेक्षां अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असतें. रूप हें जड व दृश्य असल्यामुळें उत्पत्ति, स्थिति व विनाश, वाढ होणें व घटणें, जागा व्यापणें व जागा बदलणें, कालमानानें फरक पडणें, इत्यादि बंधनें त्याला असतात. पण नाम हें दृश्याच्या पलीकडे व सूक्ष्म असल्यामुळें त्याला उत्पत्ति व विनाश, वाढ व घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेच विकार नाहींत. म्हणून नाम हें पूर्वी होतें, आज आहे आणि पुढेंहि पण तसेंच राहील. नाम हें सत् स्वरूप आहे.

**वल०** : मला येथें शंका येते. महाराज आज मी आपल्याला सर्व कांहीं विचारून घेणार.

**श्री०** : अहो असा विचारणारा भेटल्यावर मी मोठ्या आनंदानें सांगेन. काय शंका आहे, सांगा !

**वल०** : नाम हें रूपापेक्षां श्रेष्ठ आहे हें ठरलें पण जगामध्यें रूपांचे प्रकार किती आहेत हें जरा पाहा. नुसत्या रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या वस्तूंच्याकडे पाहिलें तरी पुरे. दगड, लाकूड, आंबा, पाणी, भात, गादी, झाड, आकाश, घड्याळ-किती सांगाव्यात ! या प्रत्येक वस्तूंच्या समुदायाकरीं एकेक नाम असतें. अनेक तऱ्हेच्या दगडांना 'दगड' हें नाम आहे. अनेक प्रकारचे आंबे 'आंबा' या एका नामांतच येतात. या रीतीनें या जड जगामध्यें जशी अशी अनेक रूपांची गर्दी आहे तशी सूक्ष्म जगामध्यें अनेक नामांची गर्दी असणार, नाहीं का ! माझ्या

शंकेचा मुद्दा असा कीं, नाम अनेकांतून एकाकडे नेतें असें आपण सांगतां, पण तसें नसून जड रूपांच्या अनेकपणांतून आपणच सूक्ष्म नामांच्या अनेकपणांत जात आहोंत कीं काय असें माझ्या मनांत येतें.

**श्री० :** बुवा! तुम्हीं खरोखरच विचारी आहांत. त्याशिवाय इतकी सूक्ष्म शंका सुचायचीच नाही. तुमच्या शंकेचें उत्तर सांगतों तें नीट ऐका. आपली ज्ञान क्रिया जी चालते तिचा विचार केला तर काय दिसते बरें? समजा, आपण आपण एका टेंकडीवर उभें राहून सृष्टि-सौंदर्य पाहिलें. त्या पाहाण्यांत कोणकोणत्या क्रिया होतात तें बघा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाशकिरणें आंत मेंदूपर्यंत गेलीं. बाह्य पदार्थांचें मनुष्यास ज्ञान होण्यास इंद्रियें हें पहिलें साधन आहे. इंद्रियांमधून आंत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तुस्वरूप देतें. वस्तुस्वरूप तयार झाल्यावर बुद्धि सारासार विचार करून त्या पदार्थांचें यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार येथेंच थांबत नाहीं. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असतां झाडें, वेली, घरें, बागा, माणसें, पक्षी, पाण्याचे तलाव इत्यादि सर्व वस्तूंचें ज्ञान झाल्यावर पुन्हां त्यांचें एकीकरण होऊन 'ही सृष्टीची शोभा आहे' असें ज्ञान आपल्याला होतें. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणें हेंच मानवी ज्ञानाचें लक्षण आहे. जगामध्यें कितीतरी वैचित्र्य आढळतें! नानातऱ्हेचे दगड, नानातऱ्हेचे किडे, नाना तऱ्हेचे पक्षी, नाना तऱ्हेचे प्राणी, असे किती प्रकार सांगावेत! या सर्वांचीं नांवें जरी भिन्न असलीं तरी त्या सर्वांच्यामध्यें व्यापून असणारा कोणता गुण आहे? सांगतां का?

**वल० :** महाराज आपण जे प्रकार सांगितलेत त्यांचे दोन मुख्य भेद करतां येतील. एक सजाव आणि एक निर्जीव.

**श्री० :** उत्तम! छान सांगितलें. सर्व प्राणी, किडे, मासे. पक्षी हे सजीव, आणि दगड, माती, हवा, पाणी हे सर्व निर्जीव. पण एक पाऊल आणखी पुढें जा. आणि या दोहोंना सामान्य असें काय असावें याचा विचार करा.

**वल० :** नाहीं बुवा! आपल्याला कांहीं सुचत नाहीं. महाराज, आपणच सांगा.

**श्री० :** यांत काय अवघड आहे? असें पहा, सजीव प्राणी झाला तरी तो आहे' आणि निर्जीव वस्तु झाली तरी तीहि 'आहे.' हा जो असणेपणाचा गुण हा यच्चयावत सर्व वस्तूंना लागू आहे कीं नाहीं याचा विचार करा.

**वल० :** असें आहे खरें. महाराज, आपल्या सांगण्यानें मनाला फार आनंद होत आहे.

**श्री० :** त्या आनंदाला सुद्धां आहे पणाचा गुण आहे. या असणें पणाच्या गुणाला 'नाम' असें म्हणतात. यालाच 'ओंकार' असेंहि म्हणतात.

**वल० :** आतां मला समजलें. ओंकारांतून सर्व सृष्टि उगम पावली, ओंकार हें परमात्म्याचें स्वरूप आहे, इत्यादि उपनिषदांतील वाक्यांचा अर्थ आज मला कळला.

**श्री० :** अर्थात् नाम म्हणजे सत् होय. म्हणून नाम हें सृष्टीच्या आरंभीं होतें. तें

तें सध्यां आहेच आणि सर्व सृष्टीचा लय झाला तरी तें शिल्लक उरेल. नाम म्हणजे ईश्वर होय. या नामांतून अनंत रूपें उत्पन्न होतात आणि अखेर त्याच्यामध्येंच तीं लीन होतात.

**वल०** : म्हणजे नाम हें रूपाहून निराळें राहात नाहींना, महाराज !

**श्री०** : असें नव्हे. रूप हें नामाहून निराळें राहूं शकत नाहीं. नाम हें रूपाला व्यापून पुन: शिल्लक उरतें.

**वल०** : महाराज आणखी एक विचारूं का ?

**श्री०** : जरूर विचारा. तुमचें पूर्ण समाधान झाल्याशिवाय आज आपण उठायचें नाहीं असा मी निश्चय केला आहे.

**वल०** : नाम हें जर इतकें पूर्ण आणि शुद्ध आहे, तर त्यापासून हीं सर्व रूपें उत्पन्न झालींच कां ? सर्व रूपें अपूर्ण, मर्यादित व अशुद्ध असतात.

**श्री०** : याचें उत्तर संवादाच्या आरंभींच, बुवा तुम्हींच नाहीं का दिलें ? हें जगत भगवंताची लीला आहे हीच गोष्ट खरी. आपल्याला दिलेल्या बुद्धीनें विचार करतां करतां शेवटीं इतकेंच ठरवितां येतें कीं, या संसारामध्यें नाम आणि रूप, व्यक्त आणि अव्यक्त, सूक्ष्म आणि जड, जोडीनें काम करतात. त्यामध्यें देखील जड किंवा रूप हें सूक्ष्मांतून किंवा नामांतून आकाराला येतें, नामाच्या सत्तेनेंच जगतें आणि शेवटीं नामांतच अंतर्धान् पावतें. नाम हें नुसतें सत् नाहीं. तें सत् म्हणजे नेहमीं असणारें, म्हणजे कधीं न नसणारें, म्हणजे ज्यांमध्यें कधींहि फरक न होणारें असें आहे. यामुळें तें शांत आहे, तें समाधान-रूप आहे. समाधान-रूप असल्यामुळें त्याला अमुक हवें आहे असें नाहीं; म्हणून तें पूर्ण आहे. तें पूर्ण आहे म्हणून, तेथें दु:खाचा लवलेश नाहीं, यासाठीं तें आनंद-रूप आहे. आनंद हा केव्हांहि जड असूं शकत नाहीं. म्हणून नाम चिन्मय आहे.


**स्थापना : विजयादशमी १९४२**

**— सुवर्ण संधि —**

ज्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास असतो, त्यांचं जीवन नेहमीं जगण्यासारखं असतं. पण केव्हां ? जीवनांतील खांचखळग्यांची पूर्वसूचना मिळून योग्य मार्गदर्शन होईल तेव्हां ! माफक खर्चात योग्य सल्ला व अचूक मार्गदर्शन आगाऊ सूचनेनुसार भेटा.

# जी. एम्. भिवणकर

**हस्तसामुद्रिक व ज्योतिषी**

प्लॅाट नंबर ३७४, आऊट हाऊस, १ ला रस्ता, पॉवर हाऊसजवळ, खार मुंबई २१

भेटण्याच्या वेळा : शनिवारीं ३ ते ५–३० पर्यंत व रविवारीं नि बँकेला सुटी असेल त्या दिवशीं सकाळीं ९ ते १२ व दुपारीं ३–३० ते ५–३० पर्यंत.

आगाऊ भेटीसाठीं पत्रव्यवहार करावयाचा असल्यास मंगळवारपर्यंत करावा.

**वल०** : वा वा ! नाम हें सच्चिदानंद स्वरूप आहे, असेंच ना ?

**श्री०** : होय. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदीं जवळजवळ कोणी असेल तर तें फक्त नामच होय. नाम हें चिन्मय असल्यामुळें त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टि तयार होते. अनेक रूपें घडविणें, तीं मोडणें आणि नवीन तयार करणें, पण आपण मूळ स्वरूपानें राहणें ही केवढी विलक्षण लीला आहे !

**वल०** : महाराज ! महाराज ! माझें पूर्ण समाधान झालें आहे. पण आपलें बोलणें ऐकून माझी तृप्ति होत नाहीं. म्हणून नामाविषयीं आणखी पुष्कळ सांगा. नाहीं म्हणूं नका.

**श्री०** : बुवा ! तुम्हांला मी काय सांगूं ! मी बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत सहासष्ट वष मी नामाबद्दलच बोलत आहें. अजून नामाचें माहात्म्य संपत नाहीं. नामाचें माहात्म्य सांगून संपलें तर भगवंताचें भगवंतपण लटकें झालें असें समजावें. जो नामांत मीपणानें नाहींसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरुष नामाविषयीं मौन तरी धरील; कारण त्याचें माहात्म्य कोणा-सच सांगतां येणार नाहीं. अगर शेवटच्या श्वासापर्यंत नामाचें माहात्म्य सांगत राहील. कारण तें कितीहि सांगितलें तरी संपणार नाहीं.

**वल०** : महाराज, आजपासून माझें जीवन मी नामाला वाहून घेणार; पण माझ्यामागें इतके लोक आहेत कीं, त्यांना नामाचें महात्म्य मी कसें समजावून सांगू ? त्यांना वेदान्त कळणार नाहीं आणि त्यांना त्याची जरूर पण नाहीं.

**श्री०** : मला खरें आवडतें तें हेंच. साध्या माणसानें विशेष खोलांत न शिरतां सांगितल्याप्रमाणें 'नाम' घ्यावें. त्याचें कल्याण झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

**वल०** : महाराज ! मी लिहून घेतों. आपण सावकाश सांगा.

**श्री०** : नामानें सर्व पापें नाहींशीं होतात.

**वल०** : आपण हें विस्तारानें समजा-वून सांगा.

**श्री०** : असें कां ! ऐका—भगवंताला विसरणें हें सर्वांत मोठें पाप आहे. नामानें भगवंताचें स्मरण होतें. म्हणून नामानें पाप नाहींसें होईल. नाम हें वेदांपेक्षां श्रेष्ठ आहे. वेदाध्ययनापासून फायदा होण्यास चारहि वेदांचा अभ्यास जरूर आहे. यासाठीं पुष्कळ वेळ व श्रम लाग-तात. नामाला श्रम नाहींत. शिवाय, सर्व लोकांना वेदाचा अधिकार नाहीं. नाम कोणीहि घ्यावें. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ओंकारानेंच होतो. म्हणून वेदारंभीं नामच आहे. नाम हें यात्रेपेक्षां श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्यें बदल होण्यासाठीं यात्रा करावयाची असते. पण त्याला श्रम, पैसा व प्रकृति वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हें घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देतें.

**वल०** : आम्ही पंढरपूरला उगीच आलों.

**श्री०** : असें नव्हे. एथें येऊन नाम घेण्याचें जर न शिकलां, तर येणें व्यर्थ गेलें म्हणावें. नाम घ्यावें अशी बुद्धि होण्यासाठीं येथें येणें जरूर आहे. तुम्ही येथें आला नसतां तर आपली गांठ न पडती व आपला संवाद

न घडतां. खरें कीं नाहीं ? असो. नाम हें सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत. त्याच्याकडे नेणारें जें कर्म तेंच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणानें भगवंताकडे नेतात. नाम हें साक्षात् भगवंताकडे पोंचवितें. नामानें भवरोग नाहींसा होतो. भव म्हणजे विषय होय. विषयाची आसक्ति असणें हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्यानें भगवंताकडे प्रेम लागतें व इतर ठिकाणची आसक्ति सुटते. नामानें सर्व दुःखें नाहींशीं होतात. उघडच आहे. दुःखें तीन प्रकारचीं असतात. पण या सर्वांचें मूळ विषयांच्या आसक्तीमध्यें आहे. नामानें ती आपोआप सुटते म्हणून दुःख नाहींसें होतें. शिवाय भगवंत हा आनंदरूप असल्यानें त्याला नामानें घट्ट धरला कीं दुःख त्या ठिकाणीं कसें राहूं शकेल ?

**वल०** : महाराज ! नामाचा वासनेवर काय परिणाम होतो तें सांगा.

**श्री०** : हें तुम्हीं चांगलें विचारलें. ज्या ठिकाणीं देहबुद्धि असते तेथेंच वासना उत्पन्न होते. देह मीच आहे, या भावनेनें वागणाऱ्या माणसाचें मन सारखें इंद्रियांतून बाहेर धांवत असतें. त्याच्या मनाची कधींच तृप्ति होत नाहीं. पण जो नाम घेऊं लागला त्याचें मन हळूहळू बाहेर धांवण्याचें कमी होतें. बाहेरची धांव कमी झाली कीं, वासनेचा जोर आपोआप कमी होतो. पुढें तेंच मन नामामध्यें रंगूं लागतें. ज्या मनानें वासना भोगायची तेंच मन दुसरीकडे रंगूं लागल्यावर वासना आपोआप क्षीण होते. कांहीं दिवसांनीं ती मरून जाते. वासना सूक्ष्म आहे म्हणून तिचा कांटा काढण्यास सूक्ष्मच अस्त्र पाहिजे. तें म्हणजे ‘ नाम ’ हें होय.

**वल०** : मला हें फार आवडलें.


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,
श्री भूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४



॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी ( बेळगांव )

**सोन्या–चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे, मोत्यांचे, सेटिंगचे, आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

श्री० : नामानें पापी माणसें पुण्यवान् बनतात. देहबुद्धि कमी होणें हेंच पुण्य होय. तें नामानें प्राप्त होतें. नामानें कलीची सत्ता नाहींशी होते. वाइट किंवा विषयाच्या वासनेनें बुद्धि भ्रष्ट करणें हेंच कलीचें मुख्य लक्षण आहे. त्याच्या मुळावर घाव घालण्याचें काम नाम घेतल्यानें होतें. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाहीं. नामानें पुण्यशरीर बनतें, ज्याच्या अंतरंगांत नाम असतें तेथें भगवंताला यावें लागल्यानें त्याच्या शरीरांत सत्वगुणाची वाढ होतें. तो पुण्यवान् बनतो.

वल० : महाराज ! नामाचा प्रारब्धाशीं कसा संबंध आहे ?

श्री० : हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण बहुतेक लोक प्रारब्ध टळावें म्हणून नाम घेतात. देहाचें सुखदुःख हें माझेंच सुखदुःख आहे किंबहुना देह सुखी तर मी सुखी आणि देह दुःखी दुःखी तर मी दुःखी, अशी सामान्य मनुष्याची अवस्था असते. बरें ! प्रारब्धाचे भोग हे आजवर कोणालाहि चुकले नाहींत. मग कसें करावें ? येथें असें लक्षांत ठेवावें कीं, प्रारब्धाची गति फक्त देहापुरती असते. म्हणून ज्याची देहबुद्धि कमी झाली तो देहाच्या सुखदुःखानें सुखी किंवा दुःखी होत नाहीं. नामानें देहबुद्धि कमी होते. म्हणून प्रारब्धाचे भोग भोगीत देखील नामांत राहणारा मनुष्य आनंदी असतो. नामाच्या आनंदापुढें त्याला प्रारब्धाची किंमत राहात नाहीं. नामाचें सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी घडलेले अपराध नाम नाहींसें करतें. वांया गेलेल्या माणसांनाहि नाम तारतें. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा, पूजेचा राजा आहे. नामानें आनंदमय अशा भगवंताचें सान्निध्य लाभल्यानें त्याची कृपा होण्यास वेळ लागत नाहीं. किंबहुना ज्याच्यावर भगवंताची कृपा होते, त्याच्याच मुखांत नाम येतें. सर्व काळीं, सर्व ठिकाणीं, सर्व अवस्थांमध्यें कोणालाहि करतां येण्यासारखें नाम हेंच एक साधन आहे. नामाला उपाधि अत्यंत कमी असल्यासें निरुपाधिक भगवंताशीं नातें जोडण्यास नामासारखें साधन नाहीं. किती प्रकारांनीं सांगूं तुम्हांला, बुवा ! अखंड नामांत राहाणें यालाच मोक्ष म्हणतात. अखंड नामांत जगणें यालाच पराभक्ति म्हणतात. अखंड नामांत गुंतणें हेंच संतपण. शेवटीं एवढेंच सांगतों कीं नामांत प्रेम येणें हीच संतांची खरी खूण आहे. माझें एवढें ऐका. नामाला विसरूं नका. प्रारब्धाच्या भोगांना न कंटाळतां, भगवंतानें ज्या स्थितींत आपल्याला ठेवलें असेल, त्यामध्यें समाधान मानावें; पण केव्हांहि त्याच्या नामाला विसरूं नये. असें जो करील त्याचा भगवंत ऋणी होऊन राहील.

हे शब्द बोलत असतांना श्रीमहाराजांच्या तोंडावर इतकें विलक्षण तेज आलें होतें कीं, बुवांसकट सर्व सभा नुसती तटस्थ बसली होती. बुवांच्या डोळ्यांना तर अश्रुधारा लागल्या. ते श्रीमहाराजांच्या पायां पडले. तेव्हां श्रीमहाराजांनीं प्रेमानें त्यांना उचललें आणि आपल्या गळ्यांतली तुळशीची माळ त्यांच्या गळ्यांत घातली. सर्व मंडळी प्रसाद घेऊन नंतर घरीं गेली.

[ प्रा. के. वि. बेलसरे कृत श्रीगोंदवलेकर महाराज यांच्या चरित्रावरून ]

———

# अर्वाचीन महीपति

# श्रीदासगणूमहाराज

लेखक—ना. वा. गुणाजी

## (मागील अंकावरून चालू)

## दासगणू महाराजांचें बाबांविषयीं अनुभवकथन—पुढें चालू

**पुरीची यात्रा आणि श्री. टेंबे स्वामी.** मी एकदां पुरीच्या यात्रेस गेलों होतों. वाटेंत गोदातटाकीं राजमहेंद्री शहरीं सुप्रसिद्ध महाथोर अंतर्ज्ञानी आणि कर्ममार्गाचे कट्टे अभिमानी श्रीवासुदेवानंद सरस्वती ऊर्फ श्री. टेंबे स्वामी यांची गांठ पडली. त्यांच्या दर्शनास गेल्यावेळीं आमच्या अनेक गोष्टी झाल्या आणि मी शिर्डीस जाणार आहें काय अशी श्रीस्वामींनीं पृच्छा केली. 'होय, पण आतांच नाहीं, कांहीं थोड्या महिन्यांनीं जाईन' असें मी उत्तर दिलें. तेव्हां त्यांनीं मजपाशीं एक श्रीफळ (नारळ) देऊन मला सांगितलें कीं, श्रीसाईबाबांना हें माझें श्रीफळ अर्पण करा. मी तें घेऊन माझ्या पिशवींत ठेवून दिलें. पुढें प्रवास करीत असतां माझ्या कांहीं मित्रांनीं तें घेऊन खाऊन टाकिलें. नंतर जेव्हां मी शिर्डीस जाऊन श्री· बाबांच्या दर्शनास गेलों, तेव्हां ते म्हणाले, 'हा पहा चोर, माझ्या बंधूनीं दिलेलें श्रीफळ कुठें आहे?'

ही कथा थोडीशी निराळी पण विस्तृत अशी श्रीसाईसच्चरित, अध्याय ५१, ओव्या १२४–१८१ येथें दिलेली आहे. तेथें दासगणू महाराजांचें नांव नसून श्री. टेंबे स्वामींनीं नांदेडचे वकील पुंडलिकराव यांचेकडे राजमहेंद्रींत श्रीबाबांना अर्पण करण्यासाठीं नारळ दिला आणि त्यांनीं तो वाटेंत मित्रांसमवेत मनमाडावर तिखट चिवड्याबरोबर खाऊन टाकला इत्यादि वर्णन आहे आणि त्यापासून काय बोध घ्यावा हें सांगितलें आहे. तें थोडक्यांत असें—पुंडलिकराव वकिलांनीं दुश्चित्त होऊन नारळाची हकीगत सांगितली आणि आणि दुसरा नारळ देतों, स्वीकार करावा असें सांगितलें. तेव्हां बाबा म्हणाले,

"घ्यावा कशास नारळ हातांत।<br>
ठेवणें व्यवस्थित जरी नव्हतें ॥१७२॥<br>
आणि म्हणाले,<br>
त्या फळाची योग्यता<br>
येईना इतर कितीही देतां ॥<br>
घडावयाचें घडलें आतां।<br>
व्यर्थ दुश्चित्तता किमर्थ ॥ १७५ ॥

स्वामींनीं तुज दिधला नारळ ।
तोही माझाच संकल्प केवळ ॥
माझ्याच संकल्पें फुटलें तें फळ ॥
अभिमान निर्फळ कां धरिसी ॥१७६॥

अहंकाराची धरिशी बुद्धि ।
तेणें आपणां मानिसी अपराधी ।
एवढें **निरहंकर्तृत्व** साधी ।
अवघी उपाधी चुकेल ॥ १७७ ॥

पुण्याचाचि काय अभिमान ।
पापाचा का नाहीं अभिमान ॥
प्रताप दोंहींचा समसमान ।
म्हणूनि **निरभिमान** वर्तें तूं ॥१७८॥

एका मित्रानें अगदीं थोडी किंमत घेऊन मला कांहीं जमिनी दिल्या. त्यांचे उत्पन्नांतून माझा उदरनिर्वाह चालतो. भक्तिसारामृतांत सांगितलेली, दरवडेखोरीपासून बचाव झालेल्या **बेरे** यांच्या टांग्याची कथा मला स्वतः माहीत आहे. **बेरे** यांचेंबरोबर मी त्या टांग्यांत होतों.

**माझी अपरिग्रह कीर्तनपद्धतिः** माझ्या कीर्तनाकरितां मी कांहीं पैसे घेत नाहीं. आणि पूर्वी कधींहि घेतले नाहींत. कीर्तनापूर्वी किंवा नंतर मदतीसाठीं केव्हांहि ताट फिरविलें जात नाहीं. देशांतील कांहीं भागांतून माझे भक्त मला पत्रें लिहून आमंत्रण देतात. मी त्यांचेकडे जाऊन राहतों आणि कीर्तनें करितों आणि सवडीप्रमाणें ग्रंथलेखनहि करितों. माझे स्वतःचे कुटुंबांतील कोणी मंडळी नसून मी एकटाच आहें आणि माझ्या गरजा फार थोड्या आहेत. इतरांप्रमाणें बाबांकडून मला पैसा मिळत नसे. ज्यांना बाबांकडून रोज कांहीं रक्कम मिळत असे त्यांचेवर उत्पन्नाचा करहि लागू झाला. लोकमान्य **टिळक** शिरडीस आल्यावर (१९-५-१९१७) इनकमटॅक्स खात्याची नजर शिरडी संस्थानाकडे वळली. त्या खात्यांतील एक ऑफिसर शिरडीस आला आणि रोज ( दक्षिणाद्वारा ) उत्पन्न किती येतें तें पाहूं लागला. प्रथम साईबाबांवर कर बसवावा असें त्याचे मनांत होतें. पण बाबांपाशीं शिलक असें कांहींच रहात नाहीं हें पाहून बाबा रोज ज्यांना रुपये देत असत, त्या म्हणजे तात्या पाटील, बडेबाबा, बागीया आणि बयाजी पाटील इत्यादि लोकांवर हा कर बसला. मला व विरक्त भक्त म्हाळसापति यांना पैसा व त्याविषयींची काळजी यापासून त्रास पोंचू नये म्हणून बाबांनीं योग्य ती दक्षता ठेविली. धनाहून अत्यंत श्रेष्ठ अशी माझी आध्यात्मिक उन्नति करून बाबांनीं माझा फायदा करून दिला आहे. त्यांनीं माझ्या ठायीं श्रद्धा उत्पन्न केली आणि ती अनेक तऱ्हांनीं दृढ केली. त्यांनीं मला महत्त्वाचे धडे शिकविले आणि सुंदर अमोलिक अनुभव प्राप्त करून दिले.

**गंगास्नान आणि तीर्थप्रसाद ग्रहणः** एकदां मी शिवरात्रीस शिरडीस होतों. तेव्हां तेथून तीन मैल असलेल्या सिंगबा येथील गोदावरी गंगेंत स्नान करावें असें माझ्या मनांत आलें. मेघाभक्तहि याच ठिकाणाहून बाबांना अभिषेक करण्यासाठीं गंगा आणीत असे. पण बाबा मला तेथें जाऊं देईनात. ते म्हणाले—गंगा तर माझ्या चरणापाशीं आहे, तूं जाऊं नको. माझें मन थोडें उद्विग्न झालें. साईबाबा हे ईश्वर—नारायण आहेत आणि नारायणाच्या चरणांपासून गंगा वाहते ही उपपत्ति मला माहीत होती. पण प्रत्यक्ष गंगास्नानापासून

जें कांहीं सुख होईल तें या उपपत्तीपासून मिळेल असें माझ्या अंधश्रद्धाळु मनास वाटेना. बाबांनीं माझें मन जाणलें. ते म्हणाले कीं— 'आपल्या पायापाशीं ये आणि ओंजळ पुढें कर.' मी तसें करतांच बाबांच्या दोन्हीं चरणांपासून पाणी वाहूं लागलें. ते घामासारखे कांहीं बिंदु नव्हते, तर ते सावकाश सतत लहान धारेनें येऊं लागले. थोड्याच मिनिटांत माझी ओंजळ भरली. ती प्रत्यक्ष गंगा पाहून मला फार आनंद झाला. मी ती माझ्या मस्तकावर प्रोक्षण करून माझें गंगास्नान आटपून घेतलें. मी तें पाणी प्यालों नाहीं. बाबांच्या आरतीच्या वेळींहि मी त्याचें प्राशन करीत नसे. एकदां याबाबत श्री. जोगांना बाबांकडे तक्रार केली. तेव्हां बाबा म्हणाले—मी माझ्या समजुतीप्रमाणें व सांप्रदायाप्रमाणें वागावें आणि जोगांनीं याविषयीं मला कांहीं त्रास देऊं नये.

**आचारधर्म आणि पलांडुसेवन :** सोंवळेंओंवळें, भक्ष्याभक्ष्य, स्नानसंध्या पूजाअर्चा इत्यादि आचारधर्माला बाबा विशेष मान देत नसत. विशेषतः कांहीं जुन्या चालीरीति ते पाळत नसत, उलट त्याविरुद्धहि वागत असत. जुन्या रीतीरिवाजाप्रमाणें मी कोणत्याहि रूपांत कांदा खात नाहीं; पण बाबांना कांदा आवडत असे आणि कांद्याशिवाय ते क्वचित् जेवीत असत. एकदां त्यांनीं मला कांद्याचें पिठलें करण्यास आणि त्यांतलें थोडें मी खावें व थोडें आपणास आणून द्यावें असें सांगितलें. त्याप्रमाणें मी तें तयार करून बाबांपाशीं नेलें. मी तें घरीं खाल्लें काय़ँ असें त्यांनीं मला विचारतां 'होय' असें मी उत्तर दिलें. पण खरोखर घरीं मी असें केलें कीं, त्या पिठल्याला माझ्या बोटाच्या अग्रानें स्पर्श केला आणि नंतर त्यानें हनुवटीला स्पर्श केला आणि तेथून खालच्या ओंठापर्यंत एक रेषा काढली अशा रीतीनें पिठलें खाल्लें. नंतर हात व तोंड धुतलें. मी काय खुबी केली हें बाबांनीं बरोबर जाणलें (आणि त्यांना अवगत नाहीं असें काय आहे?) आणि मी काय खुबी केली हें त्यांनीं लोकांस सप्रयोग दाखविलें. ते म्हणाले, '—हा खाल्ल्याचें नुसतें सोंग आणून बहाणा करितो, पण खरोखर तें न खातां नुसतें पिठल्याला बोट लावून तें हनुवटीस लावतो' असें म्हणून मी काय प्रकार केला तो त्यांनीं हुबेहुब करून दाखविला. नंतर मी खरोखर कांदा खावा असें त्यांनीं मला सांगितलें. जुन्या चालीरीतींना कांदा पसंत नसला तरी **कांदा नित्य** भोजनाच्या वस्तूंत असावा असें त्यांचें मत होतें. कांद्याला दुर्गंध येतो आणि तो कामोत्तेजक आहे म्हणून जुन्या चालीरीतीप्रमाणें कांदा निषिद्ध मानण्यांत येतो; पण बाबा असें म्हणत असत कीं— 'पचविण्याचा जोम असावा । तयानें कांदा खुशाल खावा ॥ (श्रीसाईसच्चरित अ० २३-१८) म्हणून शिरडीस असतांना बाबांच्या हयातींत एकादशी खेरीजकरून मी कांदा सेवन करीत असें.

**पंढरीची वारी :** बाबा कधीं कधीं पंढरपूरसारख्या क्षेत्रीं जाण्याचे माझे कार्यक्रम पार पडूं देत नसत. भाद्रपद व आश्विन महिन्यांत विशेषतः आश्विन एकादशीस पंढरपुरास जाण्यास मी फार उत्सुक असें. १९१६ सालीं नानासाहेब

चांदोरकर मला मनमाडास भेटले. भाद्रपद महिना लागणार होता तेव्हां मी पंढरपुरास जाणार असें मी त्यांना सांगितलें, पण त्यांनीं मला शिरडीस नेलें. तेथें बाबांनीं मला एक आठवडा नामसप्ताह व कीर्तन करण्यास लाविलें. नानासाहेबांच्या सांगण्यावरून शिरडी संस्थानांतून उत्तम पोषाख मागून घेऊन व तो अंगावर घालून मी कीर्तन करीत असें. पण वर सांगितल्याप्रमाणें बाबांनीं माझा नवरदेवाचा पोषाख खालीं उतरविला आणि नारदीय पद्धतीनें कीर्तन करण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें मी कीर्तन करीत एक महिना शिरडींत राहिलों. भाद्रपद महिना संपत आला आणि आश्विनमास डोकावूं लागला. आश्विनांतहि मला पंढरीस जातां येणार नाहीं (नानासाहेबांच्या मनांत मला शिरडींत आश्विनांत ठेवून घेण्याचें होतें) म्हणून मी थोडासा उद्विग्न झालों, आणि मनांत म्हणालों— सद्‌गुरु बाबा हे, माझ्या देवास म्हणजे पंढरीस जाण्याचा मार्ग कसा बंद करितात! बाबांनीं माझ्या मनांत काय होतें तें जाणलें आणि मला पंढरीस जाण्यास आणि नानासाहेबांना मला न अडविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी मोठ्या आनंदानें पंढरीस गेलों.

**साक्षात्कार :** माझ्या कांहीं आध्यात्मिक प्रार्थना बाबांनीं पुऱ्या केल्या नाहींत. नामदेव व इतर संत यांचेप्रमाणें मलाहि माझ्या इष्ट देवतेचा साक्षात्कार व्हावा म्हणून मी बाबाकडे पुष्कळदां जाऊन प्रार्थना केली. पण प्रत्येक खेपेस 'जरा थांब, सबूर' असें बाबा उत्तर देत. शेवटीं, १९१६ च्या सुमारास मी बाबांना विचारलें—बाबा माझी विनंती सफल न करतां तुम्हीं ती पुढें ढकलीत आहां, तुम्हीं मला साक्षात्कार केव्हां करून देणार?

त्यावर ते म्हणाले—'**तूं मला पाहतोस,हाच साक्षात्कार होय,मी परमेश्वर आहें.**' मी सांगितलें कीं, 'आपलें उत्तर असें येणार अशी माझी अपेक्षा होती, आणि त्याप्रमाणें झालें; यानें माझें समाधान झालें नाहीं.' माझ्या नशिबांत हा साक्षात्काराचा योग नाहीं आणि संतांनाहि नशीब फिरवितां येत नाहीं असें मानून मी माझें समाधान करून घेतलें.

**नामदेवाची आख्यायिका:** साक्षात्काराचा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. तो गहन, समजण्यास कठीण आहे असें पुष्कळजण समजतात, पण तो योग्य रीतीनें समजून घेतल्यास सोपा आहे. दासगणू महाराजांनीं वर आपल्या स्वानुभवकथनांत नामदेवाचा उल्लेख केला आहे. आणि नामदेवामध्यें आणि त्यांचेमध्यें बरेंच साम्य असल्यामुळें याविषयीं विवेचन करणें अप्रासंगिक होणार नाहीं. तेव्हां प्रथम नामदेवाच्या साक्षात्काराविषयींचा विचार करूं.

**संत नामदेव आणि त्यांची आख्यायिका :** आम्हां सर्वांना माहीत आहे—लहानपणीं त्यांनीं विठोबाकडून—(विठोबाच्या मूर्तीकडून) नैवेद्य खावविला आणि पुढें तो आपल्या इष्ट देवतेच्या सान्निध्यांत राहणारा, 'देव आपणाशीं बोलतो चालतो' असा तो त्याचा लाडका भक्त बनला हें सर्वांना

परिचित आहे. एकदां निवृत्ति–ज्ञानदेवादी भावंडें पंढरीस पांडुरंग दर्शनास गेलीं असतां, देवाजवळ बसलेल्या नामदेवासहि त्यांनीं प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. तेव्हां नामदेव मोठ्या अभिमानानें म्हणाला, 'मी नेहमीं पांडुरंगाजवळ असतों. हे जसे देवभक्त, तसा मीहि देवभक्त. परंतु मला जसें विठ्ठलाचें सान्निध्य आहे, तसें यांना कोठें आहे ? तेव्हां यांनीं मला नमस्कार करावा हें योग्यच आहे; कारण तसा माझा अधिकारच आहे.' नामदेवाचें हें औद्धत्य पाहून मुक्ताबाईस थोडासा राग आला आणि 'अखंड जयाला देवाचा शेजार। कां रे अहंकार नाहीं गेला' असें ती नामदेवास म्हणाली. अशा रीतीनें त्याची कानउघाडणी करून पुढेंही ती त्याला म्हणाली कीं–पंढरीस येणारे सर्व संत, माझे बंधूही, यांनीं तुलाहि देवाबरोबर नमस्कार केला, परंतु मी मात्र तुझा हा अहंकार गेल्याशिवाय तुला नमस्कार करणार नाहीं. पुढें सर्व संतांनीं असें ठरविलें कीं, आळंदी येथें ज्ञानदेवाच्या गुंफेंत सर्व संतांची एक सभा भरवावी, आणि त्या सभेंत जमलेल्या सर्व संतांची गोरोबा कुंभाराकडून परीक्षा करवावी. त्याप्रमाणें सर्व संत जमले. त्यांची परीक्षा कपाळावर जोरानें टिचकी ( कोणी म्हणतात थापटणें ) मारून गोरोबानें केली. टिचकीचा आघात नामदेवाशिवाय इतर सर्व संतांनीं निमूटपणें सहन केला. नामदेवाची पाळी येतांच टिचकी मारली गेल्याबरोबर नामदेव चिडून रागानें म्हणाला–काका, हा काय पोरकटपणा तुम्हीं चालविला आहे ! लोकांस आपल्या घरीं बोलावून त्यांच्या कपाळावर जोरानें टिचक्या मारावयाच्या, हा कोणत्या गांवचा आदरसत्कार ! हें रागाचें भाषण ऐकून सर्व संत हंसले आणि गोरोबांनीं नामदेवाकडे बोट दाखवून म्हटलें कीं, हा एवढा घट मात्र थोडासा कच्चा आहे. तेव्हां मुक्ताबाई गोरोबास म्हणाली;–तुमची परीक्षा अगदीं बरोबर आहे. हें ऐकून सर्व संत हांसले व त्यामुळें नामदेव मनांत फार ओशाळे झाले. तेथून नामदेव पंढरीस आला आणि राउळांत जाऊन संतसभेंत घडलेली आपल्या अपमानाची सर्व हकीगत त्यांनीं पांडुरंगास सांगितली. ती ऐकून देव म्हणाले 'नाम्या, गोरोबाची परीक्षा अगदीं बरोबर आहे. कारण, सद्‌गुरूला शरण जाऊन ज्यानें आत्मज्ञान मिळविलें नाहीं, तो कसाहि विद्वान् आणि भक्तिमान् असला तरी तो कच्चाच आहे असें समजावें' हें ऐकून नामदेव अगदीं विरघळून गेला. शेवटीं देवाच्या शिफारसीप्रमाणें नामदेव आंवढ्या नागनाथ येथें विसोबा खेचर यांना शरण गेला आणि त्यांचेकडून गुरुपदेश घेऊन कृतार्थ झाला ! विसोबानीं नामदेवास जो अध्यात्मोपदेश केला तो नामदेवी गाथ्यांत १७ अभंगांत ग्रथित केला आहे. त्याचा अगदीं थोडक्यांत सारांश असा आहे कीं

'जेथें नाहीं देव, तेथें ठेवी पाय।
सर्वज्ञ सदैव तूंचि अससी।
'मीपणें भुललों मज नकळेची कांहीं।
देव नसे ते ठायीं पाय ठेवी॥'

( लिंगावर पाय ठेवून निद्रित अशा विसोबाला पाहून पाय दुसरीकडे ठेवण्यास

केलेल्या नामदेवाच्या सूचनेस उत्तर जिकडे पाय उचलून ठेविले तिकडे खालीं लिंग आढळून आलें ) अभंग १३२

तुझें निजसुख तुजपाशी आहे ।
विचारूनी पाहे मनामाजीं ॥
विवेक वैराग्य शोधुनियां पाहे ।
तेणें तुज होय ब्रह्मप्राप्ती ॥ ( १३८ )

जरी, म्हणसी देव देखिला ।
तरी हा बोल भला नव्हे नाम्या ॥
**जोंवरी मी माझें न तुटे ।**
**तव आत्माराम कैसेनी भेटे ॥ (१३९)**

शेवटीं नामदेव म्हणतात :—
द्वादशीचे गांवीं जाहला उपदेश ।
देवावीण ओस स्थळ नाहीं ॥
तो देव नामया हृदयीं दाविला ।
खेचरानें केला उपकार हा ॥ ५ ॥

**सुदर्शन** (खरा साक्षात्कार). श्रीरमण भगवानांनीं चाळीस श्लोकांचा एक अत्युत्तम व श्रेष्ठ प्रबंध (ग्रंथ) रचला आहे. हे सर्वच श्लोक मनन आणि निदिध्यासन करण्याजोगे असून साधकांनीं त्यांचा योग्य अभ्यास केला पाहिजे. येथें फक्त दोनच श्लोक देत आहें. एकांत सद्दर्शन म्हणजे काय आणि दुसऱ्यांत सद्दर्शनाची परीक्षा किंवा कसोटी—हे सांगितलें आहे. ते श्लोक असे :—

( १ ) ( सद्वस्तुच्या ठिकाणीं तादात्म्‌-निष्ठा हेंच सद्दर्शन. )

( ८ ) श्रवन्तु सद्दर्शन साधनानि
परस्य नामाकृतिभिः सपर्याः ।
सद्वस्तुनि प्राप्त तदात्मभावा ॥
निष्ठैव सद्दर्शनमित्यवेहि ॥

अर्थ—परमात्म्याची नामरूपादिकांनीं पुजा करणें ही सद्वस्तूच्या ( परमात्म्याच्या) साक्षात्काराचीं साधनें असल्यास होवोत. पण सद्वस्तूच्या ठिकाणीं तद्रूप होऊन तेथेंच निष्ठा ( निरंतर स्थिति ) ठेवण हेंच खरें सद्दशन होय हें ध्यानांत ठेवावें.

( २ )—आत्मज्ञान म्हणजे आत्मनिष्ठा स्वरूपस्थिति )

( २० )—यदीशितुर्वीक्षणमीक्षितारं
अवीक्ष्य तन्मानसिकेक्षणं स्यात् ॥
न द्रष्टुरन्यः परमोहि तस्य
वीक्षा स्वमूले प्रविलीय निष्ठा ॥

अर्थ—द्रष्ट्याला ( आपणा स्वतःला ) पाहिल्याशिवाय ईश्वराचा साक्षात्कार म्हणजे ( तें निज—खरें दर्शन नसून ) मानसिक दर्शन होय, कारण परमात्मा हा द्रष्ट्याहून भिन्न नाहीं. म्हणून स्वतःच्या मूलाच्या ठिकाणीं निष्ठा म्हणजेच खरा साक्षात्कार ( निजदर्शन ) होय :—

'आत्मबोधंविना नेश्वरबोधः' म्हणजे आत्मज्ञान झाल्याशिवाय ईश्वरज्ञान ईश्वराचा साक्षात्कार नाहीं हा सिद्धान्त आहे.

वराह उपनिषदामध्यें खरा साक्षात्कार म्हणजे काय हें थोडक्यांत स्पष्ट सांगितलें आहे. तें असें की :—

'अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्ष ज्ञानमेव तत् !

अहंब्रह्मेति चेद्वेद साक्षात्कारस्स उच्यते ॥

अर्थ—ब्रह्म ( परमेश्वर ) आहे असें जाणणें म्हणजे तें परोक्ष अप्रत्यक्ष ज्ञान होय. आणि मी ब्रह्म आहें ( अहंब्रह्मास्मि ) असें जाणणें " अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान किंवा साक्षात्कार होय.

**एक विरक्त योगी ब्रह्मचारी.** पांडुरंगांनीं सद्गुरु विसोबा खेचर यांची

शिफारस करून नामदेवाला त्याचेकडे पाठविलें आणि त्याला आत्मज्ञान प्राप्त करून देविलें. तसें नामदेव–सदृश दासगणू महाराज यांना दुसऱ्या कोणा सद्गुरूची शिफारस करून त्याचे-कडे पाठविण्याची शिफारस करून त्यांचे-कडे पाठविण्याची जरुरी साईबाबांना भासली नाही. कारण दासगणू महाराज हे एका सद्गुरूचे शिष्य होते. शिवाय बाबा हे सद्गुरु आणि परमेश्वर असल्या-मुळें त्यांनीं त्याला तसें सांगितलेंहि; पण त्या सांगण्यानें दासगणू महाराजांचें समाधान झालें नाहीं. तरी पण बाबांनीं अशी घटना करून ठेवलेली दिसून आली कीं, त्यांचे महा‌समाधीनंतर दासगणू महाराजांना एका विरक्त योगी ब्रह्मचाऱ्याच्या भेटीचा योग जमून आला. ती हकीगत दासगणू महाराज आपल्या स्वानुभव कथनांत अशी सांगतात कीं—बाबांनीं समाधि घेतल्या-नंतर मी कांहीं संतांचें दर्शन घेत आहे, पण त्यांपैकीं कोणाकडूनहि माझें समाधान झालें नाहीं. त्यांतल्या त्यांत एका अपूर्व व्यक्तीचा माझेवर चांगला परि-णाम झाला. नांदेडजवळ १९१९ च्या सुमारास एका खडकावर एक विरक्त योगी ब्रह्मचारी राहत होता. तो अपरिग्रही असून कोणाची पर्वा करीत नसे. मला दर्शन देण्याचे त्यानें दोन–तीन खेपा टाळलें. पण मी पाठविलेल्या अन्नाचा मात्र स्वीकार केला. तेव्हां मी पुनः त्याचे-कडे गेलों आणि दर्शन देऊन नमस्कार कां करूं देत नाहीं असें विचारलें.

तो म्हणाला–तुम्हीं स्वतःला कीर्तनकार म्हणवितां, पण तुम्हीं अहंकार सोडला आहे काय ?

मी : मला तो कसा सोडतां येईल ? प्रत्येकाला अहंकार असतोच.

तो—अन्न पाठवितांना मी हें अन्न पाठवीत आहें असा अहंकार तुम्हांला वाटला कीं नाहीं ?

मी : अहंकार, सात्विक, राजस व तामस असा तीन प्रकारचा असतो. वाईट ( तामस ) अहंकाराचा त्याग केला पाहिजे. माझें हें विधान त्याला पसंत नव्हतें. माझा अहंकार समूळ नाहींसा करावा असें त्याचें मत दिसलें. त्यानें माझे मनांतील सर्व कांहीं जाणलें आणि आपल्या सामर्थ्याचीं कांहीं उदाहरणें दिलीं. तीं अशीं—

तो : तुम्हीं संतचरित्रें लिहीत आहांना ?

मी : होय,

नंतर त्यांनीं मी सहा दिवसापूर्वी रचिलेलीं पदें ( अद्याप अप्रकाशित ) म्हणून दाखविलीं. त्यांचें हें अंतर्यामित्व पाहून मी चकित झालों.

तो : साईबाबांच्या चरणापासून तुम्हाला गंगा मिळाली कीं नाहीं ?

मी : होय, मिळाली.

तो : तुम्हीं तिचें काय केलें ?

मी : तिचें मस्तकावर मार्जन करून घेतलें.

तो : आणि तुम्हीं तें प्राशन केलें नाहीं; कारण आपण ब्राह्मण आहों आणि तें प्याल्यानें भ्रष्ट होऊं असें तुम्हांला वाटलें. काय तुमचा अहंकार पहा !

* टीप [ श्रीज्ञानेश्वर महाराज याविषयीं म्हणतात कीं—

‘ विचारूनि अहंकार सांडिजे ।
मग असतीच वस्तु होईजे ’ ॥

( ज्ञानेश्वरी ६–७१ )

आणि 'तेवींचि अहंभाव जाये ।
तरी ऐक्य तें आधींच आहे ॥
(ज्ञानेश्वरी ८–४५)

यानंतर मी त्यांचेकडे रोज रात्रौ जाऊं लागलों आणि कांहीं तास त्यांचेबरोबर घालवूं लागलों. याविषयीं गांवांत बरी वाईट चर्चा सुरू झाली. गांवांतील एक अश्रद्ध टवाळखोर / गृहस्थ माझेबरोबर त्यांचेपाशीं आला. त्यांचेशीं त्याची बरीच प्रश्नोत्तरें झालीं. त्यांत त्यांनीं त्या टवाळखोर गृहस्थाचीं सर्व अनैतिक बिंगें बाहेर काढिलीं आणि त्याची खात्री पटवून दिली. (याविषयीं विस्तृत हकीगत देणेचें कारण नाहीं) यानंतर गांवांत त्याची बरीच प्रसिद्धि झाली. तें त्यांना न आवडून तेथून लवकरच कायमचा पोबारा केला—

साईबाबांविषयीं लिहिलेले ग्रंथ येणेंप्रमाणें—

(१) '**संतकथामृत**' मीं नोकरींत असतां बाबा व इतर संत याविषयीं हा ग्रंथ क्रमशः लिहून १९०३ सालीं प्रसिद्ध केला. बाबांनीं या माझ्या प्रयत्नाला आशीर्वाद दिला. यांतील कांहीं भाग बाबांना वाचून दाखविण्यांत आला नाहीं किंवा यासंबंधीं माहिती देण्यासाठीं बाबांना विचारलें नाहीं. त्यांनीं बोलतांना जें कांहीं सांगितलें तें मी टिपून ठेविलें. 'सेलु' विषयीं बाबांनीं जें कांहीं सांगितलें होतें, त्याविषयीं सेलू गांवीं जाऊन मीं चौकशी केली. प्रत्येक भाग बाबांचे हातीं देतांच 'ठीक आहे' असें ते म्हणाले. बाबांना लिहितां वाचतां किंवा सही करितां येत होती कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. (२) नंतर '**भक्तिलीलामृत**' हा ग्रंथ बाबांच्या हयातींत १९०६ सालीं प्रसिद्ध झाला. (३) शेवटीं '**भक्तिसारामृत**' तयार झाला. यांतील ५२–५३ अध्याय (बाबांविषयींचे) बाबांच्या हातीं देतांच 'ठीक आहे' असें ते म्हणाले. इतर अध्याय सवडीप्रमाणें १९१८ च्या पुढें तयार होऊन सबंध ग्रंथ १९२५ सालीं प्रसिद्ध झाला.

अध्याय २८ यांत बाबांविषयीं जी माहिती आहे, ती कांहीं अंशीं बाबांच्या सांगण्यावरून आणि कांहीं अंशीं सेलूच्या सांगण्यावरून दिलेली आहे. आपण सेलूहून आलों एवढेंच बाबांनीं मला सांगितलें. त्यावरून मी सेलुगांवीं गेलों आणि तेथें चौकशी केली; ३५ वर्षांपूर्वीं ही चौकशी केलेली असल्यामुळें कोणी खेडुतानें काय सांगितलें हें नक्की सांगतां येत नाहीं. त्यांनीं असें सांगितलें कीं, एक म्हातारा साधु होता व तो एका तरुण फकिराला शिक्षण देऊन तयार करीत होता. कांहीं लोक त्या साधूवर चिडून त्यांनीं त्याला दगड मारून ठार केलें. पण तो तरूण फकीर पळून गेल्यामुळें बचावला. हें वर्तमान अजमासें शंभर वर्षांपूर्वीं घडलें. साइबाबांनीं नानासाहेब चांदोरकरांसमक्ष मला असें सांगितलें कीं, जी वीट आपण उशासारखी वापरीत होतों, ती आपल्या **वेंकुशाहा** गुरूनें आपणास दिलेली होती. चांदोरकरांना हें सांगितलें म्हणून ग्रंथांत मी लिहिलेलें आहे, तें माझें नांव वारवार ग्रंथांत प्रमुखपणें येऊं नये एवढ्यासाठीं होय ५३ व्या अध्यायांत चांदोरकराविषयीं जें लिहिलेलें आहे तें त्यांनीं मला सांगितलें नाहीं. त्यांना आलेल्या अनुभवाची डायरी

किंवा नोंद त्यांनीं ठेविली होती कीं नाहीं हें मला माहीत नाहीं.


**रतनजीची कथा**—नांदेडला रतनजी शापुरजी नांवाचे एक मिल कॉन्ट्रॅक्टर होते. ते एकदां शिरडीस साईबाबांच्या दर्शनास गेले. बाबा तेव्हां त्यांना म्हणाले, कीं, तूं पूर्वीं दिलेली दक्षिणा रु. ३–१२ मला पोंचली आहे आणि आतां तुला द्यावयाची ती दे. दक्षिणा देऊन उदीचा प्रसाद व आशिर्वाद घेऊन रतनजी परत नांदेडास आले. आपण पूर्वीं कधीं बाबाच्या दर्शनास गेलों नाहीं, तरी पूर्वींची दक्षिणा ( रु. ३–१२–० ) मला पोचली असें बाबा कसें सांगतात याचें त्याला आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं याबाबत मला खुलासा विचारला. तेव्हां विचार करतां करतां मला एक मागील प्रसंग आठवला. रतनजी शेटजीनीं मौलीसाहेब नांवाच्या एका पीराचें फलपान, ( बदाम पिस्ते वगैरे ) सुमनहार देऊन स्वागत केलें होतें. त्यासंबंधीं जमाखर्च काढून पहातां त्या कामीं रु. ३–१२–० इतकाच खर्च झाला होता हें पाहून रतनजी शेटजीस व इतरांना आश्चर्य वाटलें. ( याविषयीं सविस्तर कथा श्रीसाईसच्चरित अध्याय १४ यांत पहावी ).

**बाबांच्या गुरूची समाधि**—निंबवृक्षाखालची ही समाधि आम्हीं प्रथम पाहिली तेव्हां ती दिसण्यासारखी नव्हती. कारण ती जमिनीच्या खालीं होती. रावबहादूर हरि विनायक साठे यांनीं पायऱ्या व पार बांधला आणि गुरूच्या पूजेसाठीं कोनाड्याची व्यवस्था केली.

**बाबा व कट्टर मुसलमान :** बाबांचीं कृत्यें व मतें शिरडीच्या मुसलमानांशीं जुळतीं नसल्यामुळें त्यांचा बाबांशीं केव्हां केव्हां बेबनाव होत असे. बडेबाबा व इतर मुसलमान यांनीं कुतब्याच्या प्रार्थनेसाठीं बाबांस गांवाबाहेर बोलाविलें होतें. बाबांनीं प्रथम कबूल केलें. पण ती मंडळी बाबांना बाहेर नेण्यास आली, तेव्हां बाबांनीं नकार दिला दुसऱ्या खेपेस ती मंडळी मशिदींत येऊन प्रार्थना म्हणूं लागली; पण बाबा त्यांच्या


दिव्य दृष्टीसाठीं ! GRAM:–DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.–DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथे डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.

सामुदायिक प्रार्थनेंत सामील झाले नाहींत. एकदां मोहरमच्या उत्सवांत कांही स्थानिक मुसलमानांनीं मशिदींत ताजिया (तावूत) आणतों म्हणून सांगितलें आणि एक तावूत करून मोहरमच्या पांचव्या दिवशीं त्यांनीं तो मशिदींत आणून ठेविला. बाबांनीं तो एक दोन दिवस तेथें राहूं दिला. नंतर तो त्यांनीं ओढून अग्निवर ठेवून या मशिदींत मला प्रेत नको म्हणून जाळून टाकिला. समर्थ बाबांविरुद्ध ते कांहीं करूं शकले नाहींत. एका कट्टर मुसलमानानें एकसरा विशिष्ट तऱ्हेची फुलांची माळ आणली आणि ती मशिदींत कमानींत घालण्यीचा परवानगी मागितली. बाबांनीं सांगितलें कीं, ती माळ घेऊन जा आणि हनुमान मूर्तीवर घाल. मी मुसलमान असल्यामुळें हिंदूच्या मूर्तीवर घालीत नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. बाबांनीं त्याला खूप रागें भरून हनुमान आणि अल्ला एकच आहेत असें सांगित· त्यावर तो ती माळ घेऊन गेला.

**हनुमानाविषयीं बाबाचा आदर:** चावडीच्या एका वरील भागांत ओट्यांत कोपऱ्यांत हनुमानाची एक लहानशी मूर्ति होती. बाबा खालच्या भागांत बसत असत. तेथें एकदां पावसाचे थेंब पडूं लागले तेव्हां वर जाऊन ओट्यांत बसण्यास कोणी एकानें बाबांस सांगितलें. **देवाबरोबर आम्ही कसें बसावें**' असें म्हणून बाबानीं तें नाकारलें.

फकीर बाबा ऊर्फ बडे बाबा यांनीं एकदां एक हिंदु नुकताच मुसलमान धर्मांत बाटलेला असा मशिदींत आणला. **'तूं आपला बाप बदललेला आहेस**' असें म्हणून बाबांनीं त्याच्या एक श्रीमुखांत दिली, पण कांहीं विशिष्ट अवस्थांमध्यें बाबा, अल्ला व तसेंच देवता याविषयीं अशिष्ट (अनुदार) उद्गार काढीत असत. पंढरपुरास जाण्याची कोणी परवानगी मागितली तर कांहीं शिव्याशाप देऊन बाबा त्याला 'जा' म्हणून सांगत. पण ज्ञानदेव किंवा तुकाराम यांची आरति चालली म्हणजे ते अदबीनें हात जोडून बसत असत.

अद्वैताबद्दल बाबांचे मत काय होतें हें सांगणें कठीण आहे. प्रत्यक्ष ते याबद्दल बोलत नसत; चुकून केव्हां तरी तसा (अद्वैत) ध्वनि ते काढीत असत. 'अहं ब्रह्मास्मि, सर्वं खल्विदं ब्रह्म' (मी परमेश्वर आहे, हें सर्व खरोखर परमेश्वर आहे असें ते म्हणत ते प्रत्यक्ष किंवा साक्षात् अद्वैत (एकमेवाद्वितीय) होते. कांहींहि होवो ते आपले स्वस्थ (निर्विकार) असत. ते नेहमीं पूर्ण विरक्त व स्वात्मानंदीं मग्न असत.

एकदां एका भक्तानें विचारलें—बाबा, ब्रह्म (परमात्मा) कसा आहे? बाबानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. पण बागचंद मारवाड्याकडून शंभर रुपये आणण्यास एकाला पाठविलें. त्यानें शंभर रुपये न पाठवितां बाबाला आपला नमस्कार पाठविला. दुसऱ्या एका इसमाकडे शंभर रुपयासाठीं पुनः एक इसम पाठविण्यांत आला. पण तेथेंहि नकारच मिळाला. नंतर बाबांनीं नानासाहेब चांदोरकरांना बोलाविलें आणि त्यांचेपाशीं शंभर रुपये मागितले. नानासाहेबांनीं त्या बागचंद मारवाड्याला चिठी लिहिली,

तोंच त्यानें लगेच शंभर रुपये पाठविले. तेव्हां बाबा एवढेंच बोलले कीं—'या जगांत सर्व व्यवहार असा चालतो.' नंतर त्या प्रश्न करणाऱ्या भक्तानें मला खासगी बैठकींत बाबानें आपल्या प्रश्नाचें उत्तर कां दिलें नाहीं असें विचारलें. मी सांगितलें कीं, शंभर रुपये (दक्षिणा) याचना आणि त्यावर मिळालेलीं उत्तरें हेंच तुझ्या प्रश्नाचें उत्तर होय. दुसऱ्यांनी पैशाची याचना केली, तो आला नाहीं, पण नाना-साहेबांनीं मागतांच तो आला. तसें ब्रह्म नुसतें जाणण्याची इच्छा करणाऱ्याला तें मिळत नाहीं. अधिकारसंपन्नालाच तें मिळतें. ब्रह्माची अपेक्षा करण्याच्या आधीं तुम्हीं लायक व्हा.

बाबांचे **चमत्कार** मीं क्वचितच पाहिले आहेत. १८९८ सालीं ते जमिनी-पासून ७/८ फुट उंच टांगलेल्या एका लहान फळीवर निजत असलेले मीं पाहिलें आहे. शिर्डीशिवाय ते त्या फळीवर कसे जात असत आणि तेथून ते कसे खालीं येत असत हा एक अजब चमत्कार आहे. ते वर कसे झोके घेऊन जात व उतरत असत हें कोणीहि पाहिलें नाहीं. फळी टांगलेल्या चिंध्या फार ढिल्या व कमकुवत होत्या आणि तिचेवर पण त्या तशाच ठेविल्या होत्या. कोणी वर चढला तर त्या पडण्याजोग्या होत्या. त्या फळीवर निजलेल्या बाबांना मी जेव्हां पाहण्यास गेलों, तेव्हां ते माझेवर फार रागावले आणि त्यांनीं तेथून मला हांकलून लाविलें.

केव्हां केव्हां बाबा दुपारीं १ ते २ च्या दरम्यान एकटेच असतांना पडद्यामागें कांहीं विचित्र क्रिया करीत असत. एका पिशवींतून पैसा, ढब्बू पैसा, आणेली, चवली, पावली अधेली व रुपया अशीं नाणीं काढून आपल्या बोटांच्या अग्रानीं तीं सावकाश घांसीत असत. त्यावेळीं ते कांहीं मंत्र म्हणत असत किंवा नाहीं हें माहित नाहीं. तीं नाणीं घर्षणामुळें साफ गुळगुळीत झालीं होतीं. तीं घांसत असतां हें नानाचें, हें बापूचें, हें काकाचें असें ते म्हणत असत. कोणी जवळ


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४

आल्यास तीं नाणीं गोळा करून पिशवींत घालून लपवून ठेवीत असत.

बाबा हजारों गोष्टी सांगत असत. त्या पैकीं कांहीं थोड्या ( मासल्या करितां ) सांगतों. एकदां बाबा म्हणाले—मी पुणातांब्यास असतांना दोन पक्षांमध्यें भांडण झालें. कां झालें याचें मला आश्चर्य वाटलें. जवळच नाण्यांनीं भरलेलें भांडें होतें. त्यामुळें झुंपले असावें. मी सावकाश तेथें गेलों आणि तें भांडें लांबविलें. आपलें धन गेलें असें समजून ते लोक शोक करूं लागले. मी मनांत म्हणूं लागलों—'मी कोण ? हें धन काय आहे ? व कोणाचें आहे ? याकरितां काय हा घोटाळा आणि भांडण ? तें भांडें माझें आणि मी त्या भांड्याचा.'

बाबा एकदां असें बोलले, आपणाला पुत्र ( मी ) झालों म्हणून माझी आई फार आनंदांत होती. तिच्या या वर्तनाबद्दल मी आश्चर्य करीत होतों. तिला मी केव्हां झालों ? मी जन्मलों तरी काय ? मी प्रथमपासून अस्तित्वांत नव्हतों कीं काय ? याबद्दल ती आनंदांत कां आहे ?

एकदां शिरडींत कोणी एकानें सांजा किंवा शिरा तयार केला होता. मला तो शिरा दिला कीं नाहीं असें बाबांनीं विचारतांच, त्या व्यक्तीचें व माझें बरें नाहीं म्हणून मला शिरा मिळाला नाहीं असें मी सांगितलें. तेव्हां बाबांनीं असा उपदेश केला कीं,—'कोण कोणाला व काय ? हा शिरा काय आहे ? तो कोण खातो ? कोणी आपला वैरी आहे, असें म्हणूं नको. कोण कोणाचा वैरी आहे ? कोणाविषयींहि मनांत वाईट भाव बाळगूं नका. सर्वजण एकच व सम ( सारखे ) आहेत. हा उपदेश ( विचार ) माझ्या अमृतानुभवावरील टीकेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं दिलेला आहे.

ज्ञानेश्वरीच्या अमृतानुभवावर मी ओवीबद्ध टीका लिहिणार होतों. सातारचे दादामहाराजानीं मला सांगितलें कीं, सदरहू ग्रंथ फार कठीण आहे. आमचेजवळ राहून तो समजून घ्या आणि नंतर टीका लिहा. मी म्हटलें कीं—'मी टीका लिहावी अशी बाबांची इच्छा असेल तर तेच मला बुद्धियोग देतील, दुसऱ्याजवळ मी शिकावयास जाणार नाहीं. दादामहाराजांस हें माझें म्हणणें पटलें नाहीं. पुढें टीका तयार झाल्यावर ती दादामहाराजांनीं पाहिली. आणि ती पाहून दादामहाराज सद्गदित झाले व म्हणाले. कीं, बाबा खरे समर्थ आहेत, त्यांची तुमचेवर कृपा आहे, म्हणूनच अशी टीका तुमचे हातून तयार झाली. तुम्हांला दुसऱ्याच्या मेहनतीची जरूर नाहीं.

तसेंच दासगणूमहाराज 'ईशावास्य उपनिषदावर टीका लिहीत असतांना त्यांतील कांहीं प्रमुख मंत्राच्या अर्थांविषयीं त्यांना शंका उत्पन्न झाली होती. त्या शंकेचें निवारण बाबांनीं काकासाहेब दीक्षिताच्या तरुण मोलकरणीकडून करविलें, या विषयींची मनोरंजक व उद्बोधक कथा श्रीसाईसच्चरित्र अध्याय २० येथें जिज्ञासूंनीं पहावी.

श्रीदासगणू महाराज श्रीकृपेनें अद्याप हयात आहेत. बाबा त्यांना आणखी उदंड आयुष्य देवोत आणि त्यांचेकडून अधिक लोकोपयुक्त वाङ्मयकार्य करून घेवोत.

**ॐ समर्थ साईनाथाय नमः ।**

———

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास
× × ×
गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता-प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

## अध्याय १३ वा

श्रीभगवान् म्हणाले—

पार्था, या शरिरास शेत म्हणती, ज्या ज्ञान त्याचें पुरें
त्याला शेतकरी असें म्हणति बा, जे तत्त्ववेत्ते खरे ।
जो आहे भरला जगांत सगळ्या शेतांत, तो मीच रे
शेती-शेतकरी यथार्थ कळणें तें ज्ञान माझें खरें ॥१,२॥

आहे शेत कसें नि काय तरि तें, दे पीक तें कोणतें ?
कोठूनी, नि विकार काय वडुनी त्यामाजि येतात तें
येथें शेतकरी असे कवण तो, सामर्थ्य त्याचें तसें
संक्षेपें करितों तुला कथन मी, तूं ऐकबा नीटसें ॥३॥

तें गाइलें मुनीनीं बहुपरि नीं वेगवेगळे वेदीं
तैसें हेतु विनिश्चित दाखवुनी विविध ब्रह्मसूत्रपदीं ॥४॥

पंचमहाभूतें हीं बुद्धि, अहंकार आणि प्रकृति मन
ज्ञानेंद्रिय-कर्मेंद्रिय दशक, विषय पांच आणि धैर्यगुण ॥५॥

चैतन्य, दुःख, सुख नी इच्छा विद्वेष तत्त्व संघात
संक्षेपें सविकार क्षेत्र असे या परीस म्हणतात ॥६॥

न दम्भ हिंसा नच गर्व-नांव
आचार्य-सेवा सरल स्वभाव ।

क्षमा, मनःसंयम नी स्थिरत्व ।
देहीं मनीं वाणितही शुचित्व ॥७॥
विरक्ति, पार्था, विषयीं स्वभावें
चित्तीं अहंता वसणें अभावें ।
व्याधी, जरा, जन्म नि मृत्यु दुःख
यांतील दोषांविषयीं विवेक ॥८॥
कर्मीं अनासक्ति नि पुत्र–वित्तीं
कलत्रि वा लंपटता न चित्तीं ।
विरुद्ध किंवा अनुकूल गोष्ट
घडो, न होणें समवृत्ति नष्ट ॥९॥
अनन्य योगें मजठायिं भक्ति
चळेचिना जी कधिंही किरीटी ।
एकान्तवासीं रति ती नितान्त
रुची बसाया न परि सभेंत ॥१०॥
सदैव अध्यात्म विचार चित्तीं
मोक्षाकडे आंतर नित्य दृष्टि ।
या ‘ज्ञान’ पार्था म्हणतात कीं रे
अज्ञान तें होय विरुद्ध सारें ॥११॥

जें जाणतां अमरता लाभे जीवा, न ‘होय’ ‘नाहीं’ हीं
आद्यंतरहित कथितों ज्ञेय परब्रह्म तें अतां पाहीं ॥१२॥
जिकडे तिकडे त्याचे कर चरण, नि नेत्र कर्ण शिर, वदन
सर्वत्र व्यापूनी राहे हें, कांहिंही न यावीण ॥१३॥
इंद्रिय रहित असें तें, इंद्रियगुण भासती जरी त्यांत
निर्गुण, गुण, भोगीही सर्वां पोषी निरक्षि, ना सक्त ॥१४॥
स्थिर तैसें चरही तें भूतांच्या आंत आणि बाहेर
सूक्ष्म म्हणुनि जाणाया कठिण असे तें समीप नी दूर ॥१५॥
अविभक्तहि तें नानाभूतांमाजी विभक्तसें पार्था
उत्पन्न करी पाळी, पोषी नाशीहि शेवटीं भूतां ॥१६॥
ज्योतींची तें ज्योती, अंधारापार जाणण्या उचित
ज्ञान, ज्ञानें कळतें, सर्वांतर्यामिं तें असे वसत ॥१७॥

ऐसें क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय तुला साररूप मी कथिलें
हें जाणुनी माझ्या रूपालागी मदीयभक्त मिळे ॥१८॥
प्रकृतीला पुरुषाला नाहीं आरंभ अंत वा समज
सर्व विकार–गुणांची प्रकृतीपासूनि होतसे निपज ॥१९॥
देहेन्द्रिय कर्तृत्वाविषयीं प्रकृती निमित्त हें परिस
सुखदुःखाच्या भोगाविषयीं राहे निमित्त परि पुरुष ॥२०॥
प्रकृतींत पुरुषराहुनि तो भोगी प्रकृतिजन्य विविध गुण
गुण–संगानें पावे उच्च अधम वा कुळांत तो जनन ॥२१॥
साक्षी नी अनुमोदक, पोषक, भोक्ता महेश परमात्मा
परम पुरुष या देहीं तो पावतो अशा नामा ॥२२॥
पुरुष असा निर्गुण नी प्रकृति गुणांसह असें जया कळलें
वागो कैसाही, त्या जन्मा येणें पुन्हां असे टळलें ॥२३॥
ध्यानें साधक कांहीं पाहति आपणाचि आपणांस मनीं
कित्येक सांख्य–योगें, इतरे जन कर्मयोग आचरुनी ॥२४॥
असमर्थ आत्मदर्शनि या परि ईश्वरास जे भजती
श्रद्धेनें ऐकूनी अन्यांचें, तेहि मृत्युला तरती ॥२५॥
स्थावर अथवा जंगम जी जी बा वस्तु होय निर्माण
प्रकृति–पुरुष–संयोगें ती ती, हे भारता, असे जाण ॥२६॥
ही नाशवंत भूतें सारीं जो त्यांत सारखा राहे
अविनाशी परमेश्वर, त्यापाहे, तो खरोखरी पाहे ॥२७॥
समभावानें ईश्वर सर्वत्र वसे असे दिसे ज्याला
तो आत्मघात न करी, उत्तमगति सत्यर्थें मिळे त्याला ॥२८॥
प्रकृतीच करी कर्में सारीं, आत्मा न कांहि एक करी
हें जाणिलें जयानें झाली तत्त्वानुभूति त्यास खरी ॥२९॥
भूतीं भेद दिसे परि एकचि आधार त्यास जो पाहे
त्यापासुनि विस्तारही हा सारा ब्रह्मभाव तो लाहे ॥३०॥
निर्गुण अनादि म्हणुनी परमात्मा हा कदा न होय उणा
राहूनही देहीं निष्क्रिय तो कर्म त्यास बाधींना ॥३१॥
सर्वत्र गगन भरलें सूक्ष्मत्वें जें विलेप ना घेई
देहीं भरला आत्मा लिप्त न होई तसा कशानेंही ॥३२॥

उजळी जसें स्वतेजें जग हें अवघेंहि एकटा सविता
तैसें करी प्रकाशित, क्षेत्रज्ञ, क्षेत्र सर्व, पंडुसुता ॥३३॥

क्षेत्र–क्षेत्रज्ञातिल भेद असा
ज्ञान–चक्षुनें विदित ।
युक्ति प्रकृतीपासुनि मुक्तीची
श्रेष्ठ त्या गती खचित ॥३४॥

---

# अध्याय १४ वा

**श्रीभगवान् म्हणाले—**

ज्ञान उत्तम ज्ञानामाची कथितों आतां तुज फिरुनी ।
जाणुनि जें मुनि सकल पावले सिद्धिपरम तनुच्या पतनीं ॥१॥
या ज्ञानाचा आश्रय धरुनी मिळुनी गेले माझ्यांत ।
ते न जन्मती सृष्टि उपजतां व्यथित न होती प्रलयांत ॥२॥
मदीय योनि प्रकृति असे, मी गर्भ ठेवितो तिजठायीं ।
भूतांची उत्पत्ति, भारता, सारी तिजपासुनि होई ॥३॥
साऱ्या योनींत विविध मूर्ति ज्या जन्मा येती पंडुसुता ।
माझ्या प्रकृतीपासुन त्या त्या बीज पेरिता मीच पिता ॥४॥
प्रकृतिपासुनी सत्व रज तम त्रिगुण असे हे उपजूनी ।
निर्विकार आत्म्यास शरीरीं टाकिति, पार्था, बांधूनी ॥५॥
त्यांतिल निर्मल, प्रकाशदायी निर्दोष असा सत्वगुण ।
सुख–ज्ञान–संगानें जीवा टाकि, अर्जुना, बांधून ॥६॥
स्नेह पूर्ण त्या रजोगुणांतुनि उपजति तृष्णा आसक्ति ।
कर्मांच्या संगानें जीवा बद्धकरी तो, धरि चित्तीं ॥७॥
अज्ञानांतुनि उपजुनि जीवां मोह घालि तो तमोगुण ।
प्रमाद, निद्रा, आळस यांनीं टाकि त्यांस तो बांधून ॥८॥
सुखीं सत्वगुण, कर्मिं रजोगुण आसक्ति करी निर्माण ।
प्रमादिं ती निर्मितो तमोगुण ज्ञान, भारता, झांकून ॥९॥

रज तम यांचा करुनि पराजय विजयी होतो सत्वगुण ।
सत्व–तमातें जिंकुनि रज तो सत्व–रजातें तमोगुण ॥१०॥
सकल इंद्रियीं या देहांत प्रसन्नता आणि ज्ञान ।
उपजे तेव्हां समजावें कीं वृद्धि पावला सत्वगुण ॥११॥
लोभ, प्रवृत्ति कर्मी, नी त्यांचा आरंभ, भारता ।
आतृप्ति इच्छा हीं येती जन्मातें, 'रज' वाढतां ॥१२॥
निरुत्साह नि काळोखी मोह, कर्तव्य–विस्मृति ।
तमोगुण यदा वाढे तदा हे जन्म पावती ॥१३॥
यदा सत्वगुणोत्कर्षी प्राणी मरण पावतो ।
सुनिर्मल अशा तेव्हां देवलोकांस पोंचतो ॥१४॥
कर्मासक्त जनीं जन्मे रजोवृद्धींत जें मरे ।
तमः प्रभावीं मरतां जन्म पश्वादि घे बरें ॥१५॥
फल तों पुण्यकर्माचें मिळे सात्विक निर्मल ।
राजसाचें–तामसाचें दुःख–अज्ञान हें फल ॥१६॥
ज्ञान सत्वगुणें होतें लोभ जन्म रजोगुणें ।
प्रमाद मोह अज्ञानासह होती तमोगुणें ॥१७॥
सात्विकां उन्नती लाभे; मध्यें राजस राहती ।
कनिष्ठगुण वृत्तीच्या तामसातें अधोगति ॥१८॥
त्रिगुणावीण ना कर्ता दुजा, मी साक्षि, हें कळे ।
जाणे तत्त्व गुणातीत मत्स्वरूपास तो मिळे ॥१९॥
देही टाकूनि मागें या त्रिगुणा देह कारणा ।
अमरत्व भोगितो, जन्म–मृत्यु–वार्धक्य–दुःख ना ॥२०॥

**अर्जुन म्हणाला—**

ओलांडी त्रिगुणा या जो, त्याचीं हो काय लक्षणें ? ।
कसा वागे ? करी, देवा, त्यासाठीं काय साधनें ? ॥२१॥

**श्रीभगवान् म्हणाले—**

प्रकाश–मोह–प्रवृत्तिरूपी त्रिगुण लाभतां न द्वेषी ।
जावोतहि ते खुशाल निघुनी, त्यां तें न पुन्हां अभिलाषी ॥२२॥

उदासीनसम, चाळवावया न शकति ज्यालागी गुण हे ।
स्वकार्य करिती गुण हें जाणुनि निर्विकार नी स्थिर राहे ।।२३।।
सुख–दुःख, प्रिय–अप्रिय सोनें–शिला मान नी अवमान ।
निंदा–स्तुति अरि–मित्र द्वंद्वे ऐशीं मानूनि समान ।।२४।।
अपुल्या ठायीं स्वस्थ, धीर जो सकाम कर्मे त्यजि सारीं ।
'गुणातीत तो पुरुष जहाला म्हणती, पार्था अवधारीं ।।२५।।
एकनिष्ठ भक्तीनें माझी सेवा जो करि, त्रिगुणा या ।
टाकुनि मागें समर्थ होतो ब्रह्मभाव तो मिळवाया ।।२६।।
कारण मीच स्थान अर्जुना अमृत नि अव्यय ब्रह्माचें ।
शाश्वत धर्माचें, शेवटच्या परमावधिच्या सौख्याचें ।।२७।।

---


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–०–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १०–०–० |
| (७) | श्रीसाई–लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ,, | ०–१–० |
| (९) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | ,, | १–८–० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०–१२–० |
| (११) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | ,, | २–०–० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०–२–० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४–८–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील :—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

# माझी देवभूमीची यात्रा

केंद्रीय मंत्री श्री. बी. एन्. दातार

केंद्रीय गृहखात्यांतील मंत्री श्री. बी. एन्. दातार यांनीं 'माझी देवभूमीची यात्रा' या मथळ्याखालीं एक लेखमाला लिहिली असून, हिमालयांतील आपल्या तीर्थयात्रेचें वर्णन केलें आहे. लेखमालेचें पहिलें प्रकरण प्रास्ताविक स्वरूपाचें आहे. दुसऱ्या प्रकरणांत तीर्थयात्रांचें महत्त्व आणि उपयुक्तता यांचें विवेचन आहे. तिसऱ्या प्रकरणांत नगाधिराज हिमालय, त्याचीं उत्तुंग शिखरें आणि या पर्वत मालेंतून वाहाणाऱ्या नद्या यांची माहिती आहे. चवथ्या प्रकरणांत हरिद्वार ते बद्रीनाथ आणि वसुधारा या यात्रेचें वर्णन आहे. अखेरच्या प्रकरणांत यात्रेंतील कांहीं विशेष अनुभव आणि समारोपात्मक विचार सांगितलेले आहेत. या प्रकरणाचा गोषवारा पुढें दिला आहे:—

माझ्या या पदयात्रेंत कांहीं योगी आणि अध्यात्ममार्गांतील अधिकारी महात्मे यांचें दर्शन घेण्याचा आणि त्यांच्याशीं संभाषण करण्याचा सुयोग मला लाभला. हे महात्मे आत्मचिंतनांत इतके निमग्न झालेले असत, कीं आपण चालत असल्याचेंहि त्यांना भान नसे. मोठ्या कष्टानें ते सांसारिक गोष्टींपर्यंत मन खालीं आणीत आणि अशावेळीं ते जें कांहीं बोलत अथवा उघड करून सांगत त्याला चिरस्थायी मूल्य असे. त्यांचीं वचनें पचवून आत्मसात् करतां आलीं तर माणसाचें अवघें जीवन आमूलाग्र बदलून जाईल. अशा महात्म्यांचे सहजोद्‌गार देखील अत्यंत अर्थगर्भ असतात. **येषां स्वैरकथालापा उपदेशा भवन्ति हि** । असें जें शुक्राचार्य म्हणतात तें अगदीं यथार्थ आहे.

सभोंवारच्या निसर्गाचें गांभीर्य आणि भव्यत्व यांचा ठसा मनावर उमटून आणि अंतरंगांत ज्ञानाचा प्रकाश फांकून कांहीं महात्म्यांचा आनंद ओसंडूं लागे आणि ईश्वराबद्दलच्या कृतज्ञ भावनेनें त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर लोटे. माझ्या सरकारी आयुष्यक्रमांतील माझा हुद्दा आणि अहंकार विसरून, एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें मी पायीं यात्रा करीत आहें हें पाहून एका योग्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि माझ्यावर

परमेश्वराचा सदैव वरदहस्त असावा अशी त्यानें प्रार्थना केली. त्याच्याशीं आणखी कांहीं मी बोलणार तोंवर तो पुढें चालूंहि लागला होता. त्यानें पुन्हा मागें वळूनहि पाहिलें नाहीं.

बाल वा वृद्ध, दुर्बळ वा पंगु असे लोकहि तक्रारीचा एक शब्द मुखावाटे न काढतां यात्रेचे सगळे कष्ट निमूटपणें कसे सहन करतात, हें पाहण्याचें भाग्य मला लाभलें. 'जय बदरी विशाल की जय' या जयजयकाराच्या नादानें वातावरण निनादून जात असे. या घोषानें यात्रेकरूंमध्यें आत्मिक आनंदाची लाट पसरे आणि ते आपला मार्ग अधिक अवसानानें, सोशिकपणानें आणि प्रसन्नतेनें चोखाळूं लागत.

## एका वृद्ध स्त्रीची स्फूर्तिदायक ईश्वरनिष्ठा

माझ्या या यात्रेंत मला आपल्या महान् सनातन धर्माचें रसरशीत चैतन्य आणि स्फूर्तिदायकत्व यांचा साक्षात्कार सारखा होत होता. उच्च ध्येयांच्या मागें लागलेलीं माणसें इंद्रियांचीं क्षुद्रसुखें संतोषानें आणि स्वखुषीनें कशीं सोडून देतात, याचें मला सानंद दर्शन झालें. आयुष्याच्या निरनिराळ्या टप्प्यांवर असलेलीं माणसें कोणाची मदत न घेतां पायीं चालतात, कधीं एकाकी प्रवास करतात, पायांना फोड आले अथवा सूज आली तरी तिकडे दुर्लक्ष करतात, प्रखर ऊन किंवा झोंबणारी थंडी यांचा कडाका प्रसन्न मुद्रेनें सहन करतात, बर्फासारख्या थंडगार पाण्यांत स्नान करतात, अलकनंदासारख्या नद्यांच्या वेगवान् प्रवाहांतील धोके पत्करतात आणि प्रतिकूल हवापाण्याची पर्वा न करतां सदैव जप अथवा ध्यान यांत मग्न होऊन राहातात, याचा एरवीं अर्थ कसा लावणार? आपल्या निर्माणकर्त्यांवर दृढ श्रद्धा ठेवली तरच हे कष्ट आणि तपस्या हातून घडणें शक्य आहे. वाटेंत आपल्या उदरनिर्वाहासाठीं कांहीं मिळेल कीं नाहीं याचीहि किंयेकांना चिंता नसे. मी परत येत असतांना गुलाबकोटीनजीक मला नागपूरची एक वृद्ध महाराष्ट्रीय विधवा स्त्री भेटली. तिनें एका महिनाभरांत हिमालयांतील चारी धामांची यात्रा पुरी केली होती. एवढी यात्रा म्हणजे सहाशें एक मैलांचा प्रवास कांहीं बसनें, पण बहुतांशीं पायीं चालून तिनें उल्हासानें केला होता. एका गरीब मध्यमवर्गीय कुटुंबांतील ही स्त्री. तिच्या बरोबर फक्त एक लहानसें बोचकें होतें. कोणाकडून एक पैचीहि मदत तिनें घेतली नाहीं. देवाची कृपा होईल आणि या अथवा भावी जन्मांत आपल्याला चिरमुक्ति प्राप्त होईल या आशेनें अंगीकारलेलें दृढ स्वावलंबन, ईश्वरनिष्ठा आणि सर्व प्रकारच्या हालांतून आणि त्रासांतून जाण्याची हंसतमुख तयारी यांचें मूर्तरूप मला त्या वृद्ध स्त्रींत आढळलें.

## १२५ वर्षांचा योगी

ज्योतिर्मठानजीक असलेल्या जोशीमठांत सव्वाशें वर्षांच्या एका वृद्ध योग्याचें मला दर्शन झालें. १८५७–५८ सालच्या घटनांचे त्यानें ठळक शैलींत वर्णन करून सांगितलें. इतका वृद्ध असूनहि तो शरीरानें धडधाकट होता आणि धार्मिक बाबतींत परिणामकारक उपदेश करूं

शकत होता. येथील प्राचीन मठ भक्कम पायावर उभा करावा अशी त्यानें कळकळीची प्रार्थना केली. हें पीठ तेराशें वर्षांइतकें प्राचीन असून सर्व भाविक हिंदूंनीं त्याला मान दिला पाहिजे असें त्या योग्याचे म्हणणें होतें; या प्राचीन मठाचें भवितव्य ज्यांच्या हातीं आहे, त्यांनीं या योग्याच्या प्रार्थनेकडे दुर्लक्ष करूं नये असें मला वाटतें. हिंदुधर्माच्या तत्त्वांबद्दल आमच्या लोकांमध्यें वाढत असलेलें औदासीन्य जाऊन त्यांचें तिकडे लक्ष लागण्याच्या दृष्टीनें अशा प्राचीन संस्थांची जोपासना करणें अगत्याचें आहे.

## अवधूत बाबा

खुद्द बद्रीनाथ येथें अलकनंदा नदीच्या पलीकडच्या तीरावर मला दोन योगी भेटले. हे योगी गुहांमध्यें एकाकी राहात होते. एकाला अवधूत बाबा म्हणतात. त्याला पहून मला भगवान दत्तात्रयाच्या जीवनाचें आणि तसेंच भागवतांतील प्रसिद्ध ऋषभदेव याचें स्मरण झालें. आम्ही अवधूत बाबांच्या दर्शनास गेलों तेव्हां ते बाहेर उघड्यावर उन्हांत बसलेले होते. आमच्याशीं ते दोन तास बोलले. त्यांच्या वाणीचा अस्खलित प्रवाह चालू असतां किती वेळ गेला याचें आम्हांला भानहि राहिलें नाहीं. हिंदुधर्माचीं तत्त्वें—विशेषतः आध्यात्मिक दृष्टीनें असलेलीं धर्मतत्त्वें त्यांनीं अत्यंत साध्या भाषेंत आम्हांला विशद करून सांगितलीं. गुहेबाहेर बर्फाचा दाट थर सर्वत्र पसरला आणि बाकीचे सर्व लोक हा भाग सोडून निघून गेले तरी अवधूत बाबा आपल्या गुहेंतच राहातात.

## गोधडी बाबा

दुसरे साधु मला जे भेटले त्यांना गोधडी—बाबा म्हणतात. त्यांच्या अंगावर एकच एक लोंकरी गोधडी असते. त्यामुळें त्यांना हें नांव पडलें आहे. ते एका बंद गुहेंत राहातात. गुहेमध्यें गवत पसरलेलें असतें. गेलीं अठ्ठावीस वर्षें आपण या गुहेंत कसे राहातों, आपल्या अगत्याच्या गरजा अनपेक्षितपणें कशा भागविल्या जातात, इतर थोर साधूच्या शिकवणुकीनें अंतःप्रेरणेनें बहुमोल ज्ञानाची आपल्याला कशी प्राप्ति झाली, याचें त्यांनीं आमच्या-




a cut above the average

With our long experience we know precisely how to appraise your individual requirements and add just that deft touch which can greatly enhance your personality.
★ A wide selection of materials in :
WOOLLEN, RAYON, DACRON, SHARKSKIN, COTTON HOSIERY & QUALITY READY-MADE GARMENTS.

Consult us about your new clothes

TRUEFIT & CO.

97/103, MAHATMA GANDHI ROAD
OPP. RAJABAI TOWER, BOMBAY 1

Tel. : 253565

पाशीं वर्णन केलें. इतर साधकांप्रमाणेंच यांनाहि वर्षातील ऋतूंची, स्थलकालाची, जनसमुदायाची अथवा निर्जनतेची, प्रकाशाची अथवा अंधाराची कसलीच तमा नव्हती. 'आत्मन्येवात्मना तुष्टः' हें भगवद्गीतेंतील स्थितप्रज्ञाचें लक्षण त्यांच्या ठायीं साकार झालेलें दिसून येत होतें.

## एक अजोड प्रसंग

बद्रीनाथ येथें एक अजोड घटना घडली. त्या ठिकाणच्या पंडितांनीं माझ्या सत्कारार्थ एक समारंभ घडवून आणला. समारंभाला सुमारें दोनशें व्यासंगी आणि विद्वान् पंडित हजर होते. या पंडितांची ज्ञानसंपदा आणि प्राचीन काळापासून आजतागायतपर्यंतच्या बद्रीनाथच्या इतिहासाचें त्यांनीं केलेलें मार्मिक विवेचन यांचा माझ्या मनावर मोठा प्रभाव पडला यांपैकीं कांहींनीं आधुनिक शिक्षण घेतलेले तेथील पंडित-वस्तींत शंभरएक पदवीधर आहेत असें मला सांगण्यांत आलें, तेव्हां मला सानंद आश्चर्य वाटलें. कांहींजण खालच्या मुलखांत मोठ्या हुद्यांच्या जागांवर अधिकारी होते. तरीहि यात्रेकरूंचें पोरोहित्य करण्याचें काम ते लीनतेनें करतात. शुद्ध आणि स्वच्छ शब्दोच्चार करून ते संस्कृत मंत्र आणि श्लोक म्हणतात, हें पाहून मला समाधान वाटलें. त्यांनीं म्हटलेलें शुद्ध वेदपठण ऐकून मला पश्चिम किनाऱ्यावरील आणि सर्वसामान्यतः दक्षिणेंत म्हटल्या जाणाऱ्या अचूक व शुद्ध वेदमंत्र पठणाचें स्मरण झालें.

## युगानुसारी धर्म

त्यांनीं केलेल्या अनेक स्वागतपर भाषणांना उत्तर देतांना खंबीर पण समजुतीच्या भाषेंत मला हें सांगावें लागलें कीं, आतां काळ बदलला आहे; लोकशाहीचें युग आतां आलें आहे हें लक्षांत घेऊन तुम्ही आपल्या मनोवृत्तींत योग्य तो बदल करून समाजांतील आपलें समुचित स्थान घेतलें पाहिजे. बुद्धिप्रधान किंवा अधिकार संपन्नवर्ग म्हणून नव्हे, तर जनतेचे सेवक ही भूमिका तुम्ही घेतली पाहिजे.' महाभागवतांतील एका वचनाची मी त्यांना आठवण दिली ऐहिक आणि पारमार्थिक जीवनांतील महान् उद्दिष्टांप्रीत्यर्थ सतत यत्न करीत राहाण्याचा आणि हीन सुखांचा अभिलाष सोडण्याचा उपदेश त्या वचनांत केलेला आहे. आधुनिक अर्थानें त्याग आणि तपस्या यांचा नियोजित क्रम आंखून घेऊन तदनुसार वागल्यानें हें उद्दिष्ट बौद्धिक दृष्ट्या पुढारलेल्या पंडितांना साध्य करतां येईल असें मत मी व्यक्त केलें. मी पुढें म्हणालों:—

## सामान्य माणसांत देव पहा

'कडक जातिभेद आणि उच्चनीचत्वाची कल्पना यागोष्टी आतां कटाक्षानें सोडून दिल्या पाहिजेत. उच्चत्वाचा आव न ठेवतां सामान्य माणसाची सेवा यापुढें आपण केली पाहिजे. सामाजिक संघटनेसाठीं जातिभेद निर्माण झाला. समाजांत फुटीरपणा आणण्यासाठीं तो निर्माण झाला नसून प्रत्येकानें आपल्या कुवतीला व परिसराला अनुसरून समाजाची सेवा करावी यासाठीं तो निर्माण करण्यांत आला होता. आतां सद्यः परिस्थितींत जातिभेदाची उपयुक्तता उरली नसून तो जितक लवकर नष्ट होईल तितका बरा. वरिष्ठ वर्गांच्या हक्कांची कल्पना आतां तुम्ही सोडून दिली

पाहिजे आणि महत्तर जीवनांतील कर्तव्यांची जाणीव बाळगली पाहिजे.

'आपल्या राज्यघटनेच्या प्रास्ताविक उद्दिष्ट–विभागांतील थोर आणि उदात्त तत्त्वांकडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. आपल्यासारख्या थोर देणगी लाभलेल्या लोकांनीं आधुनिक परिस्थितीशीं जुळतें घेऊन, आपल्या डोळ्यांसमोर उदित होणाऱ्या नवयुगाशीं मिळतें घेणें आपलें कर्तव्य आहे. केवळ भगवान् बद्रिनाथाची नित्य पूजा करणें हें आतां पुरेसें नसून सामान्य माणसांत बद्रीनाथ पाहाणें व त्याची सेवा करणें हें आवश्यक आहे, असें मला नम्रपणें म्हणावेसें वाटतें.' माझ्या भाषणाचा त्या पंडितांच्या मनावर चांगला प्रभाव पडला असावा असें मला वाटतें. त्यांच्या वतीनें माझे आभार मानतांना त्यांचा प्रवक्ता म्हणाला,

'आमच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य तसेंच आधुनिक चौकटींत येणारीं कर्तव्यें यांची आम्हांला जाणीव होत असून, आपण सांगितलेल्या अर्थानें समाजाचे उपयुक्त घटक बनण्याचा आम्ही कसोशीनें प्रयत्न करूं, असें मी आपल्याला आश्वासन देतों.'

## सत्संग–सभा

हृषीकेश येथें मला आढळलेल्या आध्यात्मिक वातावरणाचा मला येथें अखेरीस निर्देश करावासा वाटतो. या शहराच्या बाजूनें अथवा मधून गंगा वाहात असून त्याचें आसमंत मनोहर आहे. जीवनाच्या धक्काधक्कींतून निवृत्त झालेले अथवा प्रारंभापासूनच धर्मजीवन अनुसरणारे लोक येथें स्थायिक स्थायिक झाले असून अनेक लोक चातुर्मासासारख्या काळांत येथें येऊन राहातात. येथें दररोज दुपारीं सत्संग–सभा होत असतात. आश्रम अथवा मंदिरें यांच्या सभामंडपांत या सभा भरतात. त्यावेळीं होणाऱ्या प्रवचनांना भारतांतील सर्व भागांतून आलेल्या स्त्री–पुरुष श्रोत्यांची गर्दी असते. हिंदु धर्माच्या विविध अंगावर योगी आणि विद्वज्जन यांचीं प्रवचनें होतात. एके दिवशीं दुपारीं मी एका सत्संग–सभेला गेलों होतों. माझी ती दुपार उचितकार्यीं खर्च झाली असें मला वाटलें. अशाच एका सभेंत भाषण करण्याची मला संधी मिळाली. भगवद्गीतेची शिकवण या विषयावर मी बोललों. भगवद्गीतेचा पन्नास वर्षें अभ्यास केल्यानंतर या थोर व दैवी गीतेची माझ्या मतें कोणती शिकवण आहे व ती आधुनिक काळांतहि कशी समुचित आहे याचें मी विवेचन केलें......

माझी ही विनम्र आणि भक्तिपूर्ण लेखमाला, गिरिराज हिमालयाच्या पवित्र हिमाच्छादित उत्तुंग शिखरावर विराजमान् झालेल्या महान् मंदिरांतील भगवान् बद्रीनाथ आणि त्याचे दिव्य सहचर यांच्या चरण कमलीं समर्पण करतों.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ।।

---

# श्री ज्ञानेश्वर – जीवन

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

## प्रकरण ६ वें

### मातापितरांची ताटातूट

आपणाला व्रतबंधाची कांहींच जरूरी नाहीं असें निवृत्तिनाथांचें मत होतें. ज्ञानेश्वर त्यांच्या आज्ञेबाहेर जाणें शक्यच नव्हतें. सोपानदेवांनीं तर भक्ति हाच खरा उपनयनविधि असें मत दिलें. यामुळें ही भावंडें ब्रह्मवृंदाच्या निर्णयाची पर्वा करीत नव्हतीं. पण विठ्ठलपंत व रखुमाई यांना मात्र हे मुलांचे विचार ऐकून वाईट वाटे. रखुमाई तर साक्षात् त्यांची मातोश्री, तिनें तर निवृत्ति–ज्ञानदेव यांच्याकडून 'आपण ब्राह्मणांपासून शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न करूं' असें वचन घेतलें. बोलून चालून ती आईची माया. आपला वंशविस्तार व्हावा हा विचार स्वाभाविक असल्यामुळें त्याचा प्रभाव रखुमाईच्या मनावर जास्त होता. विठ्ठलपंतांना देखील हा विचार अस्वस्थ करीत होता. पण ब्रह्मवृंदाचा वाढता विरोध पाहन त्यांना आपल्या समोर निराशेचा काळोख दिसूं लागला. 'आशा बडी ठगडी' असें कवि वचन आहे, आणि आपल्या मुलांच्या भवितव्यतेच्या बाबतींत विठ्ठलपंत व रखुमाई यांना ठकवीत होती. जोपर्यंत आपण जिवंत आहोंत तोपर्यंत हे ब्राह्मण आपल्या मुलांना शुद्धिपत्र खात्रीनें देणार नाहींत असें त्यांचें मन त्यांना सांगत होतें. आपल्यामागें या ब्राह्मणांच्या विरोधाची तीव्रता कमी होऊन त्यांचा बुद्धिपालट होईल असाही विचार 'बुडत्यांला काडीचा आधार' या न्यायानें त्यांच्या मनांत आला. या गोष्टीवर विठ्ठलपंत व रखुमाई यांनीं अनेक दिवस खूप विचार केला. पण हा विचार कांहीं साधासुधा नव्हता. नाजूक व रेशमी वस्त्र कांटेरी कुंपणावरून फरफटत ओढून नेलें असतां तें जसें छिन्नविच्छिन्न होतें, त्याप्रमाणें आपल्या पंचप्राणरूपी आपल्या लाडक्या मुलांच्या ताटातुटीचा विचार त्यांचें हृदय अत्यंत व्यथित करीत होता. गुर्वाज्ञेनें कां होईना यतीचा पुन्हा पति झाल्याबद्दल ब्रह्मवृंदानें तर विठ्ठलपंतास 'देहांत प्रायश्चित्त ही शिक्षा सुनावली होती. आपल्या मुलांच्या भावी सुखासाठीं ब्रह्मवृंदानें फर्मावलेली आज्ञा लवकरच अंमलांत आणण्याची आवश्यकता आतां त्यांना वाटूं लागली. कारण मुलें मोठीं होऊं लागलीं. ह्याबाबतींत कालक्षेप करणें, हें आपल्या मुलांच्या हिताविरुद्ध जाईल, ही त्यांची भावना दृढ झाली.

पण हें हालाहल प्राशन करण्याचें काम म्हणजे एक भयंकर दिव्य होतें. विठ्ठलपंत आणि रखुमाई हीं मातापितरें मृत्यूला भीत नव्हतीं. पण आपल्या नक्षत्रासारख्या तेजस्वी, गुणी, प्रेमळ, कोमल आणि लडिवाळ लेंकरांची ताटातूट होणार हा एकच विचार त्यांचें काळीज करपत होता. रखुमाईसारख्या प्रेमळ मातेच्या व्यथित अंतःकरणाचें कोणीं वर्णन करावें ! रात्री मुलें झोंपली कीं त्यांच्याकडे पाहून बिचारीचें हृदय भडभडून यावें. नेत्रांवाटे खळखळा अश्रूंच्या धारा वहाव्यात. सत्त्यामळ नाथानें रखुमाई मातेच्या विव्हळ अंतःकरणाचें अत्यंत हृदय द्रावक वर्णन केले आहे.

कैसें वोडवलें अदृष्ट आडवें। बालकें हे दैवें अंतरिलीं ॥ रुदन करितां अश्रुपात पूर। लोटला दुस्तर माहिवरी ॥ मजन्म द्रुमाची हे चत्वारफळें। अमृताची काळे तुटलिया ॥ कोणातें निराऊ, कोणा हातीं देऊं। निवृत्ति ज्ञानदेवो सोपान हा ॥ स्वरूपें सुंदर वृत्तिलें प्रशांत। निवृत्ति हा आत्त केवि त्यागों ॥ माझा ज्ञानदेवो जिवाचा विसावा। लावण्याचा ठेवा केवि त्यागों ॥ परमसकुमार चिद्रत्नकलिका। मुक्ताई अंबिका केविंत्यागों ॥ घराउलोपाहे पडो पाहे नेत्र। उतो पाहे अंभ श्रीगंगेचें ॥

रखुमाईच्या अंतःकरणाचें हें करुण दृश्य सत्त्यामळनाथानें अत्यंत उत्कटतेनें वर्णिलें आहे. पण हें सर्व दुःख त्या माउलीनें आपल्या चार मुलांपासून दडवून ठेवलें होते, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं चार मुलें आपल्या माता पितरांस देहांतप्रायश्चित्त घेण्याची संमति देतील ही कल्पनाच अशक्य कोटींतील आहे. अशी कल्पना करणें म्हणजे त्या अवतारी मुलांच्या गुणांचें मूल्य कमी करण्यासारखें आहे. छे, छे, अशा घोर कृत्याला त्या दैवी मुलांनीं कधींहि कबुली दिली नसती. उलट आपल्या मातापितरांच्या प्राणांसाठीं त्यांनीं आपले स्वतःचें प्राण आनंदानें अर्पण केले असते, ही गोष्ट

**जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी** ॥ ज्ञानेश्वर ॥
ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून
अचुक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तरी दृष्टि स्वच्छ रहाते
हें सत्य आहे. याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४**
यांचा सल्ला घेऊन निर्धास्त राहा.
बाहेरगांवींही फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें
चष्मे बनवून ऑडरप्रमाणें पाठवूं.

विठ्ठलपंत आणि रखुमाई ह्यांना पूर्णपणें ठाऊक होती. म्हणून आपल्या स्वतःच्या 'देहांतप्रायश्चित्त'चे बेत अगदीं गुप्तपणें अमलांत आणले. ऐन मध्यरात्रीचा समय ! सर्वत्र भयाण अंधार आणि सामसूम आहे, मधून मधून कीटकांचे 'किर्रऽर' 'किर्रऽर' असे ध्वनि कानावर पडत आहेत, अशावेळीं विठ्ठलपंत आणि रखुमाई, ह्यांनीं गृहत्यागाची तयारी केली. निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता स्वस्थ झोंपलेलीं होतीं. जवळच जळत असलेल्या पणतीच्या सौम्य प्रकाशांत त्यांच्या रेखीव व सुंदर चेहेऱ्यावरील रेखा खुलून दिसत होत्या. मातापितरांचें आपल्या आवडत्या लेकरांचें तें अखेरचें दर्शन ! रखुमाई आंथरुणावर झोंपलेल्या आपल्या लेंकरांकडे आपल्या पंचप्राणांच्या दौलतीकडे डाळ भरून पाहूं लागली. तिचें अंतःकरण पिरगळलें ! रडण्याचा जबरदस्त हुंदका आला, देह अश्रूंनीं डबडबून गेला, पण मुलें जागीं होतील ह्या भीतीनें तिनें मोठ्या कष्टानें आपलें दुःख आंवरलें. विठ्ठलपंतानें आपल्या पत्नीची ही स्थिति पाहून चटकन हळूच तिचा हात धरून तिला बाहेर नेलें ! आपल्या लाडक्या लेकरांच्या कल्याणासाठीं ब्रह्मवृंदाच्या आज्ञेप्रमाणें 'देहांत प्रायश्चित' घेण्यासाठीं त्रिवेणींत उड्या टाकून आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या. तत्कालीन स्वार्थी व धर्माधिकारी ब्रह्मवृंदाच्या ब्राह्मणशाहीला दोन निरपराधी जीव बळी पडले. पण, क्रिया—प्रक्रिया ह्या न्यायानें ह्या शोकांतिकेची धार्मिक क्रांतींत लवकरच प्रक्रिया झाली.

★

# प्रकरण ७ वें

## पैठणच्या वाटेवर

विठ्ठलपंत आणि रखुमाई ह्यांनीं मुलांसमोर आपल्या स्वतःच्या दुःखाची वाच्यता कधींहि केली नव्हती. पण तरीसुद्धां त्या चार भावंडांना आपल्या आईबापांच्या चिंतेची व संकटांची अस्पष्ट कां होईना पण चांगलीच कल्पना होती. आपल्या मातापितरांवर व आपणांवर कांहींतरी अन्याय होत आहे, ह्याची त्यांना जाणीव होतीच.

चार भावंडें दुसऱ्या दिवशीं जागीं झाली. 'निवृत्ति ! ज्ञानेश ! सोपान ! मुक्ता ! उठा,' अशी रखुमा मातेची लडिवाळ हांक कानांवर पडताच आळोखे पिळोखे देत आईला जाऊन बिलगावयाचें हा त्या चार भावंडांचा रोजचा क्रम. पण आज नित्याची आपल्या ओळखीची ती गोड साद त्यांच्या कानांवर आली नाहीं. ह्यामुळें तीं अस्वस्थपणें आजुबाजूस पाहूं लागली. कधींतरी असें कांहींतरी होणार ही भीति त्यांच्या मनांत होतीच. आपल्या आईबापांशिवाय त्यांना घर अगदीं शून्य वाटूं लागलें. चाऱ्हीं भावंडें गांगरून जाऊन एकमेकांकडे पाहूं लागली. सर्वांचे नेत्र अश्रूंनी भरून आले. मुक्ताईनें तर 'आई ग !' म्हणून एकच आकांत केला ! सोपानाचें तर वडिलांवर अत्यंत प्रेम ! तोसुद्धां 'बाबा ! बाबा !' म्हणून हुंदके देत रडूं लागला. ज्ञानेश्वरांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वहात आहेत, अशा स्थितींत त्यांनीं मुक्ताला पोटाशीं घट्ट धरली. निवृत्तिनाथांनी स्वतःचें दुःख आवरून सोपानाला मिठी

मारली. अशा दुर्धर स्थितींत तीं भावंडें कांहीं वेळ तशींच पडून राहिलीं. मुक्ताबाईनें मधून मधून आंतील दालनांत आपली आई दिसेल ह्या आशेनें ज्ञानेश्वरांचा हात सोडून आंत पाहून यावें! इतक्यांत अलख म्हणून गंभीर शब्द त्यांच्या कानांवर पडले. दारांत तीं मुलें पहातात तो गहिनीनाथांची ती तेजस्वी व धिप्पाड मूर्ति दत्त म्हणून उभी! चुकलेल्या वत्साला ज्याप्रमाणें धेनूची भेट व्हावी किंवा थंडीनें गारठून गेलेल्याला ज्याप्रमाणें सूर्यकिरणांचा उबारा मिळावा त्याप्रमाणें गहिनीनाथांना पहातांच त्या चार भावंडांना समाधान वाटलें. गहिनीनाथांनी 'बेटा मुक्ता!' म्हणून लगेच मुक्ताईला कडेवर घेतलं. गहिनीनाथांनीं अत्यंत प्रेमळ व लडिवाळ शब्दांनीं त्या भावंडांचें सांत्वन करून त्यांना धीर दिला. 'सद्‌गुरूंना' माउली म्हणून कां हांका मारतात ह्याचा अनुभव त्या चारहि भावंडास गहिनीनाथांच्या सहवासांत त्यावेळीं आला. गहिनीनाथांनीं त्यांची समजूत घालून त्यांना पुढील मार्गाची दिशा आंखून दिली. गहिनीनाथांचें ऐनवेळीं आगमन हा योगायोग नसून ती सद्‌गुरु कृपाच होती. गहिनीनाथ गेल्यानंतर निवृत्ति—ज्ञानदेव पुढील मार्गास लागले. तीं सुखवस्तु मातापितरांचीं मुलें होती. त्यांना अन्नाची ददात कधींहि पडली नव्हती. खरोखर जर त्यांना अन्नाची यातायात पडली असती तर कोरान्न मागण्यापेक्षां अग्निकाष्टें भक्षण करून त्यांनीं प्राण सोडले असते. इतकीं तीं चार भावंडें तेजस्वी होतीं. त्या चार भावंडांनीं कोरान्न मागून आपला चरितार्थ चालविला ही कल्पना चुकीची आहे. समजा, कीं त्यांनीं कोरान्न मागण्याचा विचार केला असता तरी त्यांना कोरान्न देणार कोण? ब्राह्मणांनीं तर त्यांना वाळींत टाकलेलें! तिकडे त्यांच्या सावलीस उभे रहाण्यास कोणी तयार नाहीं तिकडे त्यांना कोरान्न कोण देणार? म्हणून ह्या चार भावंडांनी कोरान्न मागून आपला निर्वाह केला ही कल्पना शक्यच


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

## भास्कर लक्ष्मण नार्वेकर

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या—चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें—चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

नाहीं. विठ्ठलपंत चांगले संपन्न होते, अर्थात् निर्वाहाची विवंचना त्यांना केव्हांच नव्हती.

ब्रह्मवृंदाच्या अन्यायाची ह्या चार भावंडांना अत्यंत चीड आली होती, त्यांच्याबद्दलची आदर भावना त्यांच्या मनांतून पार उडून गेली होती. ह्याचे पडसाद ‘जळो जीणें लाजिरवाणें दीक्षितांचें’ इत्यादि उद्‌गारांत ज्ञानेश्वरींत स्पष्टपणें उमटलेले आहेत. मनुष्य कितीहि संत आणि अवतारी असला तरी उपाधींच्या गुणधर्माचे प्रहार त्याच्यावर थोडेफार झाल्यावाचून रहात नाहींत. दीक्षित वर्ग हा सत्ता व स्वार्थाच्या मोहानें धुंद झालेला आहे. त्या वर्गात भूतदयेचा अंश मुळींच नाहीं, हें कटु सत्य त्यांना आतां पूर्ण पटलें, रूढी म्हणजे फाजील वर्णाभिमान आणि सत्तेच्या पोटीं जन्मलेली राक्षसीण होय. ही रूढी म्हणजे धडधडीत अन्याय होय. ह्या अन्यायाचा प्रतिकार करणें हें प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याला टाळणें म्हणजे मानवतेला लाथाडण्यासारखें आहे. दुष्टांचा संहार आणि सज्जनांचें संरक्षण करण्यासाठीं प्रत्यक्ष परमेश्वरही अवतार घेत असतो, हें तत्त्व ते गीतेंत शिकले होते. निवृत्ति ज्ञानेश्वरांना वास्तवीक शुद्धिपत्राची कांहींच जरूरी नव्हती. गहिनीनाथांकडून निवृत्तिनाथांनी दीक्षा घेऊन ज्यावेळीं ती दीक्षा आपल्या भावंडांना दिली,त्याचवेळीं त्यांचें खरें उपनयन झालें होतें. अशा परिस्थितींत निवृत्ति–ज्ञानदेवांचें शुद्धिपत्रासाठीं पैठणच्या ब्रह्मवृंदाकडे जाणें, हें कृत्य विसंगत दिसतें, इतकेंच तर ह्यांत आत्मवंचनेचा आरोपहि निवृत्ति–ज्ञानदेवांवर येतो. कारण पैठणचे ब्राह्मण काय किंवा इतर कोठलेही ब्राह्मण झाले तरी तत्कालीन रूढीप्रमाणें आपणांला त्यांच्याकडून शुद्धिपत्र मिळणें शक्य नाहीं ही गोष्ट निवृत्ति–ज्ञानदेवांना ठाऊक होतीच, मग हीं भावंडें पैठणला कां गेलीं ? त्यांचें शुद्धिपत्राच्या याचनेसाठीं पैठणला जाणें हें लाचारीचें लक्षण होतें. त्यांच्या तेजस्वी चारित्र्यावर हें एक गालबोट होतें. अर्थात् असें हें उघडउघड अशक्य अशा कार्यास प्रवृत्त होण्यास त्यांना तसेंच कांहीं तरी सबळ कांहीं तरी कारण असलें पाहिजे. आणि तें कारण म्हणजे त्यांच्या रखुमाई मातोश्रींनें ह्याबाबतींत त्यांच्याकडून वचन घेतलें असलें पाहिजे. निसर्गतःच मातेच्या अंतःकरणांत वंशाविस्ताराची भावना अत्यंत अनिवारपणें वाढलेली असते. ही भावना इतकी प्रबळ असते कीं त्यापुढें इतर सर्व भावना निर्जीव होतात. अशा मानसिक परिस्थितींत रखुमाई मातेनें निवृत्ति–ज्ञानदेवांकडून शुद्धिपत्राचें वचन घेणें हें अगदीं स्वाभाविक होतें. ह्यादृष्टीनें विचार केला म्हणजे आपल्या स्वतःच्या इच्छेविरूद्ध किंबहुना उच्चारित ब्रीदाविरुद्ध आचरण करून शुद्धिपत्राचा व्यर्थ खटाटोप निवृत्ति–ज्ञानेश्वरांनीं कां केला, असें म्हणावें लागतें. ह्या प्रकरणाच्या ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार केला जाईल.

विठ्ठलपंतानें सद्गुरूंच्या अनुज्ञेनें संन्यास सोडून पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारणें ह्यांत धर्मबाह्य असें कांहींच नव्हतें. तसें असतें तर रामानंदांनीं त्यास अशी आज्ञा कधींही केली नसती. ही गोष्ट तत्कालीन सत्ताधारी ब्रह्मवृंदास देखील पूर्ण ठाऊक होती. पण श्रीपादयतीसारख्या एका बाहेरच्या

माणसानें ब्रह्मवृंदाच्या अधिकार क्षेत्रांत ढवळाढवळ करणें हें ब्रह्मवृंदाच्या दृष्टीनें घातक होतें. हा त्यांचा अधिकाराचा प्रश्न होता. पारंपरिक सत्तेवर पुष्ट झालेली आपली ब्रह्मवृंदाची संस्था ह्यामुळें खिळखिळी होईल, ही भीति तत्कालीन ब्राह्मणांना होती. आर्थिक दृष्टीनेंसुद्धां ही गोष्ट त्यांना मारक होती. पर्यायानें ब्राह्मणांच्या दक्षिणा, वृत्ति, चरितार्थ ह्या सर्व गोष्टींवर गदा येणारें हें कृत्य आहे, हें ब्रह्मवृंदास ठाऊक होतें. जवळ जवळ एकतर ब्रह्मवृंदाच्या संस्थेचे प्राण किंवा विठ्ठलपंत–रखुमाई ह्यांचे प्राण असा प्रश्न त्यांच्यापुढें असल्यामुळें 'जीवो जीवस्य जीवनम्' त्यांनीं विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांना देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावली. आजच्या २० व्या शतकांतहि हा धार्मिक ब्राह्मणशाहीचा सुंभ जरी जळला तरी त्याचा पीळ जळला नाहीं ह्याचे नमुने मधून मधून दृष्टीस पडतात. डॉ. आंबेडकरांनींसुद्धां 'Who were the shoulders' ह्या आपल्या ग्रंथांत, न्यायमूर्तींच्या उच्चपदावर बसलेल्या अगदीं निरपेक्ष व निस्पृह माणसांतहि ह्या धार्मिक ब्राह्मणशाहीच्या जळलेल्या सुंभाचे पीळ मधून मधून दिसून येतात अशी तक्रार केली आहे. वाङ्मयांतसुद्धां क्वचित् हा प्रकार दृष्टीस पडतो. 'ज्ञानेश्वरी' किंवा 'यथार्थ दीपिका' ह्या ग्रंथाच्या ब्राह्मणांनीं संपादित केलेल्या प्रतींत 'लोकसंग्रह' ह्या शब्दाचा खुशाल 'चातुर्वर्ण्य' म्हणून अर्थ ठोकून दिलेला असतो. हा सुद्धां सानुवंशिक पूर्व ग्रहांचा अज्ञात असा संस्कारच होय. प्रा. आळतेकरांनी वारकरी लोकांवर टीका करण्याच्या भरांत आपल्या 'ज्ञानदेव' ह्या ग्रंथांत 'ही काय गळ्यांत घालुनी तुळशीची लांकडें हीं काय भवाला दूर करितील माकडें' ह्या रामजोशाच्या वचनाचा उल्लेख केला आहे, रामजोशी कितीहि वहकलेला असला तरी अंतःकरणानें तो नखशिखांत पारंपरिक ब्राह्मण होता. त्यांच्या अंतःकरणांत वर्णाश्रम धर्माचा पीळ होताच. तो व्युत्पन्न होता. त्यानें छंद शास्त्रावर सुंदर ग्रंथ रचलेला आहे. त्याला उपरति होवून तो शिष्ट ब्राह्मणांत पुन्हा वावरूं लागल्याबरोबर त्याची पारंपरिक धार्मिक ब्राह्मणशाहीची वृत्ती इतके दिवस दबून राहिली होती तीं जोरानें उसळून वर आली. धार्मिक ब्राह्मणशाही आणि वारकऱ्यांची धार्मिक लोकशाही हा लढा ज्ञानेश्वरांनींच सुरू केला होता. धार्मिक ब्राह्मणशाहीचा विरोधीपक्ष भागवतांचा वारकरी पंथ होय. अशा परिस्थितींत रामजोशांनीं वारकऱ्यांना गळ्यांत तुळशीची लाकडें घालणारीं माकडें म्हटलें ह्यांत वारकऱ्यांना कमीपणा नसून उलट रामजोशाच्या अंतःकरणांतील धार्मिक ब्राह्मणशाहीचे पीळ जशाच्या


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
मे. कांचनलाल वाडीलाल कं.,
दवाबझार, मुंबई २

तसेच कायम होते, एवढेंच सिद्ध होतें. निवृत्ति–ज्ञानदेव ह्यांनीं पैठणला जावून तेथल्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र मागण्याचें ठरवेलें. ह्या प्रश्नांवरील वादांत आपण जिंकू, आणि आपल्या प्रेमळ मातेला दिलेल्या वचनांतून मुक्त होऊं ह्या स्वाभि मानी (संकल्पानें) ते पैठणाला जाण्यास तयार झाले. ह्या त्यांच्या कृतींत लाचारी किंवा याचनेचा अंश मुळींच नव्हता. उलट बाळपणापासून त्यांनीं अनुभविलेल्या ब्राह्मणांच्या द्वेष, छळ हेटाळणी आणि बहिष्काराविरुद्ध त्यांच्या उपजत बुद्धींत वाढलेल्या बंडखोर वृत्तींचे पहिले कोंभ होते. निवृत्ति ज्ञानदेव पैठणास कां गेले? ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करणें हें ऐतिहासिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आहे. म्हणून पुन्हा एकदां ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करणें जरूर आहे. निवृत्तिदेवांनीं पैठणास ब्राह्मणांकडे शुद्धिपत्राची याचना करण्यांस जाणें, हें त्यांच्या तेजस्वी स्वभावास मुळीच शोभण्यासारखे नव्हतें. उलट हें त्यांच्या मनोदौर्बल्याचें एक व्यंग होतें, असेंच इतिहासकारांस म्हणावें लागेल, हें त्यांच्या स्वभावांतील एक वैगुण्य होतें असें दिसतें. म्हणून इतकी तेजस्वी मुलें दरिद्र्यासारखीं पैठणला कां गेली, हा प्रश्न सोडविणें अवश्य आहे. ह्या अवतारी मुलांना त्यांच्या मातापितरांच्या बाबतींत ब्राह्मणांच्या कमाल दुष्टपणाचा चांगलाच अनुभव आला होता. ज्ञानेश्वरांना जगाचा चांगलाच अनुभव होता ह्याची साक्ष त्यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथांत भरपूर सांपडते. कोकशास्त्र, शृंगार आणि साहित्यादि प्रसंगाचे ज्ञानेश्वरींत त्यांनीं जागोजागीं जीं मार्मिक आणि वेंचक उदाहरणें दिलीं आहेत, त्यांवरून त्यांना जगाचें ज्ञान (परिपूर्ण होतें) असें म्हणता येईल. इतकें असूनही पैठणच्या ब्राह्मणांचा वादांत पराजय करणारीं अक्कलवान मुलें, लोचटपणें शुद्धिपत्रासाठीं जाणें अशक्य होतें. अशा परिस्थितींत हें कोडें मानवी स्वभावास धरून सोडणें, हें चरित्रकारांचें काम आहे. शक्याशक्यतेच्या कोटींत ह्याला एकच उत्तर आहे. निवृत्ति–ज्ञानदेवाच्या पैठणच्या प्रयाणास कारण त्यांची प्रेमळ आणि सत्वधीर माता! आपल्या मुलांचा वंशविस्तार वाढावा, ही त्या माउलीची प्रबल इच्छा! किंबहुना, मातृत्वाचें सारें रहस्य निसर्गानें ह्या वंशाविस्ताराच्या अनिवार इच्छेंतच सांठविलेले असतें. ह्या असीम इच्छेच्या जोरावरच त्या प्रेमळमातेनें आपल्या तेजस्वी मुलांकडून शुद्धिपत्र मिळविण्याचें वचन घेतलें असण्याचा संभव आहे. कारण शुद्धिपत्र मिळालें तर मुंजी लागतात आणि मुंजी लागल्या तर लग्नें होतात आणि लग्नें झालीं तरच वंशविस्तार वाढतो, हीं सारीं आपल्या मुलांच्या भवितव्यतेंतील सुख परंपरा रखुमाई सारख्या साध्वी मातेला सावण्याची प्रबळ इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे. एरव्हीं निवृत्ति ज्ञानदेवांसारखीं, गुरुपदेश मिळविलेलीं स्वाभिमानीव तेजस्वीमुलें शुद्धिपत्राच्या याचनेसाठीं भिकाऱ्यासारखीं जाणें शक्यच नव्हतें. अशा ह्या मानस शास्त्रीय दृष्टीनें हें ऐतिहासिक कोडें सोडविणें जरूर आहे. नाहींतर हीं सारीं भांवडें आत्मवंचक होतीं असेंच म्हणावें लागेल.

———

# भक्त मंडळाचे सभासद

डिसेंबर १९५७ मध्यें झालेल्या आश्रयदाते व आजीव सभासदांची नांवें पुढीलप्रमाणें.

## आश्रयदाते

| | |
|---|---|
| १. श्री. श्रीपतराव माधवराव जाधव | लोणावळा |

## आजीव सभासद

| | |
|---|---|
| १. श्री. बोबडे पांडुरंग बाबुराव | मुंबई २६ |
| २. ,, भलाकिया सुंदरलाल जेठालाल | मुंबई ४ |
| ३. डॉ. एम्. सी. कोठारी | मुंबई १ |
| ४. श्री. सुंदर विष्णु मुरुडकर | मुंबई ४ |
| ५. ,, वामन पांडुरंग नाडकर्णी | मुंबई २ |
| ६. ,, जयवंत बाळकृष्ण पाताडे | मुंबई १२ |
| ७. सौ. राधाबाई नारायण राज | मुंबई ४ |
| ८. श्री. चंद्रशेखर दिनानाथ रेळे | ,, |
| ९. ,, रामचंद्र केशरीनाथ राव | मुंबई २८ |
| १०. ,, आत्माराम गोविंद सावंत | मुंबई ४१ |
| ११. डॉ. शैलजा शैलेंद्रकुमार सिंह | ठाणा |
| १२. श्री. मुकी नानालाल धरंगधारिया | ग्वालेर |
| १३. ,, प्रविण जी. मेहता | जामनगर |
| १४. ,, नंदलाल नरसिंग शर्मा | नासिम |
| १५. ,, दोलतराय रणछोडजी वशी | प. बंगाल |
| १६. ,, व्ही. पल्लाराजू | कोकिनाडा |
| १७. ,, भलाभाई हरिभाई | पोरबंदर |

## एकंदर सभासदांची संख्या
## जानेवारी ते डिसेंबर १९५७

| | | |
|---|---|---|
| आश्रयदाते | मुंबई प्रांत | ४ |
| ,, | इतर प्रांत | ० |
| आजीव सभासद | मुंबई प्रांत | ९३ |
| ,, | इतर प्रांत | ३१ |
| साधारण सभासद | मुंबई प्रांत | ३९२५ |
| ,, | इतर प्रांत | १६० |
| | एकुण सभासद | ४२१३ |

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

माहे डिसेंबर १९५७ ते फेब्रुवारी १९५८ या अवधींत शिरडी व मुंबई येथें श्रीसाई संस्थानला पुढीलप्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत. रुपये पन्नास व त्याहून अधिक असलेल्या रकमांची यादी खालीलप्रमाणें :—

## इस्पितळ देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. व्ही. के. श्रॉफ | मुंबई १९ | रु. | १०१—०० |
| मे. के. बी. ठक्कर ॲ. कं. | मुंबई १ | ,, | ५७—२५ |
| श्री. आर. बी. पटेल | कविठा (व्हा. आनंद) | ,, | १०००—०० |
| ,, एम्. एल्. अमिन | मुंबई १ | ,, | ५०—०० |
| ,, बबन दगडु व्यवहारे | संगमनेर | ,, | १५०—०० |
| ,, आर. व्ही. क्षीरसागर | मुंबई | ,, | २१२—०० |
| ,, किशनचंद एन्. गजवानी | मुंबई | ,, | २५०—०० |
| ,, थाम लिंची | मुंबई १० | ,, | १००—०० |
| ,, एस्. एस्. मलिमट्टे | बंगलोर | ,, | ५००—०० |
| मे. शांतिशेट किर्ती वर्कस् | मुंबई १६ | ,, | ५१—०० |
| श्री. जे. आर. पोस्टवाला | पुणें | ,, | २६५—०० |
| एक साईभक्त | | ,, | १०१—०० |
| शेठ नानुभाई जव्हेरी | मुंबई | रु. | १५०—०० |
| सौ. हरहायनेस विजया राजे शिंदे महाराणी ऑफ | ग्वालेर | ,, | २०१—०० |
| श्री. एस. एफ. पोचा | नागपूर | ,, | २०१—०० |
| श्रीमती जानकिबाई घीके | उमरावती | ,, | ५१—०० |


## कायम फंड देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| कै. रमेश मदनलाल इंजिनिअर यांचें स्मरणार्थ (साईभक्त) | | ,, | १०१—०० |

## इमारत फंड देणगी

| | | |
|---|---|---|
| श्री. टी. एच. अडव्हानी | मुंबई नं. १ | ५०० |
| ,, आर. बी. पटेल | कविठा ( व्हा. आनंद ) | १००० |
| मे. गोल्ड सोप कं. | मुंबई नं. ८ | १११ |
| श्री. किशनचंद एन. गजवानी | मुंबई १ | ४०० |
| ,, एस. डी. सोमण | मुंबई २५ | ५६ |
| ,, वेलागापुडी चं. राव | आकुनुर | ११६ |

| | | |
|---|---|---|
| श्रीमती मथुराबाई देसाई | मुंबई २ | ५१ |
| श्री. मनोहर यशवंत देसाई | मुंबई २ | ५१ |
| ,, जे. एम. याज्ञीक | मुंबई | ५१ |
| एक साईभक्त | | ११११ |
| ,, सुंदरलाल भलाकिया | मुंबई | १०० |
| ,, आर. वासुदेव | मद्रास | ७५ |
| ,, बी. आर. उपाध्ये | मुंबई | १०० |
| ,, एस. व्ही. ओझा | मुबई | १०० |
| हिज हायनेस महाराजा प्रतापरावसिंह गायकवाड | बडोदा | १०१ |
| श्री. टी. आर. पोतवाला | पुणें | ५१ |
| ,, पी. राज लिंगम | बोलारूम | ३०५ |
| ,, ए. जी. आगास्कर | अंबरनाथ | ५१ |



# विलक्षण चोर !

नारायणो नाम नरो नराणाम् । प्रसिद्धचौरः कथितः पृथिव्याम् ।।
अनेक जन्मार्जितपापसंचयम् । हरत्यशेषं स्मृतमात्र एव ।।

या पृथ्वीतलावर नारायण नांवाचा एक मोठा चोर खूप प्रसिद्ध आहे. या चोराचें वैशिष्ट्य असें कीं याची नुसती आठवण केली तरी अनेक जन्मांत सांठविलेलीं पापाचीं पुंजी तो केव्हांच घेऊन जातो !

× × ×

## परहितदक्ष संत

धवलयति समग्रं चंद्रमा जीवलोकम् । किमिति निजकलंकं नात्मसंस्थं प्रमार्ष्टि ।
भवति विदितमेतत्प्रायशः सज्जनानां । परहितनिरतानामादरो नात्मकार्ये ।।

संपूर्ण जीवलोकाला शुभ्रता प्राप्त करून देणारा चंद्र हा स्वतःच्या अंगावरील डाग कां हो पुसून टाकीत नाहीं ? त्याचें असें आहे—दुसऱ्यांचें कल्याण करण्याच्या कामांत संतसज्जन गढून गेलेले असतात. त्यामुळें स्वतःचें हित करून घेण्याकडे त्यांचें काडीचेंहि लक्ष नसतें.




## डिसेंबर १९५७

या महिन्यांत नाताळचे सुट्टीमुळें बाहेरगांवचे भक्तांची श्रीचे दर्शनास अतिशय गर्दी झाली होती. कांहीं कलावंतांनीं श्रीपुढें हजेरी दिली.

**कीर्तन:**—श्री. ह. भ. प. भास्करबुवा कुळकर्णी, पंढरपूर. श्री. ह. भ. प. व्यासबुवा वेशिकर कोपरगांव, श्री. ह. भ. प. महादेव शिवराम काजरोळकर मुंबई. श्री. ह. भ. प. चिद्घनबुवा बोरीकर मु. बोरी. (मराठवाडा) श्री. बाबुराव देव, ठाणें श्री. मराठे. (सं. गवई)

**प्रवचन:**—श्री. वे. शा. सं. भास्करबुवा कुळकर्णी, पंढरपूर. श्री. वे. शा. सं. व्यासबुवा वेशिकर कोपरगांव, श्रीमती भागिरथीबाई शिवरकर मु. शिवर जि. उमरावती, श्री. वे. शा. सं. पद्मनाभ पालये शास्त्री मु. मुंबई.

**गायन :**—कु. सुलोचना सेजवलकर ठाणें. श्री. शंकर सदाशिव खांबेटे ठाणे. मे. सयदभाई बडोदेवाला श्री. जे. डी. मजुमदार नायगांव मुंबई, (व्हायोलिन वादन) श्री. जे. जी. सावंत मुंबई (व्हायोलियनवादन) श्री. पांडुरंग गमरे मुंबई, श्री. ठाणेदार, राहता. सौ. सुधा कुलकर्णी चेंबूर, श्री. विनायक काशिनाथ गुते, कर्जत, श्री. डी. एन्. माने, सांगली कुमार सदानंद दिनकर नायंपल्ली, मुंबई (तबलावादन) श्री. भालचंद्र सारंगधर मुंबई; प्रो. नवरंग नागपूरकर, मुंबई, श्री. भालचंद्र वाडेकर, मुंबई

**भजनी मंडळ:**—श्री ज्ञानेश्वर भजनी मंडळ भगूर, नाशिक श्री दोंदे भजनी मंडळ, औरंगाबाद.

**नृत्यकला:**—कु. पौर्णिमा मर्चंट कु. प्रतिभा मर्चंट पुणें. तबलावादनकार श्री. तात्यासाहेब पवार, पुणें. पेटीवादन श्री. अनंतराव रानडे, पुणें.

(श्रीदत्तजयंती) निमित्त ता. ६।१२।५७ शुक्रवार रोजीं सायंकाळी श्रीदत्तजन्माचें कीर्तन व रात्रौ गांवांतून श्रींचे रथाची मिरवणूक

संस्थानचे व्यवस्था।क अधिकारी मे. चिकटे साहेब यांची बदली झाल्यामुळें त्यांना निरोप देण्याचा सत्कार समारंभ मे. वेलकर साहेब यांचे अध्यक्षतेखालीं स. ना, कल्लणवाद झाला तसेच ह्यांचे जागीं नवीन व्यवस्थापक अधिकारी मे. मुळे साहेब हे आले म्हणून त्यांचाही सत्कार करण्यांत आला. ता. ३।१२।५७ रोजीं हा समारंभ झाला.

धर्मार्थ दवाखाना नेहमीं प्रमाणें चालू आहे.

# जानेवारी १९५८

या महिन्यांत श्रीसाई दर्शनास बाहेरगांवचे भक्तलोक बरेच आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ते कार्यक्रम पुढील प्रमाणें :—

**कीर्तन** :—श्री. ह. भ. प. सदाशिवबुवा पुराणिक आळंदीकर, श्री. ह. प. प. नागनाथबुवा चरोलीकर पुणें, श्री. ह. भ. प. अनंत गणपत वासुदेव, मुंबई. श्रीमती गंगुबाई धुमाळ, अहमदनगर. श्री. मराठे, सं. गवई.

**नृत्य** :—कु. हेमलता चाचरकर, मुंबई, श्री. मंगला राणे, मुंबई श्री. नारायणराव जाधव, मुंबई, (तबलावादन)

**गायन** :—श्री. कृष्णराव चोणकर, मुंबई. श्री. जानकीबाई अय्यर, पुणे. श्री. व्यासबुवा कोपरगांव, सौ. वासंतीबाई वैद्य चेंबूर. श्री. नयनाबाई कोल्हापूरकर, श्री. विठ्ठल सावंत मुंबई, श्री. ठाणेदार राहता. श्री. कमलम्मा-रायचूर, श्री. माणिकबाई रायचूर, कु. विलास कु. गंगाधर व्यास, कु. ललिता खानापुरे भुसावळ. श्री. नारायण वासुदेव इंगळे, अंधेरी, श्री. चंद्रकांत केशव इंगळे अंधेरी, श्री. कौसल्याबाई लाखे खेड(पुणें) श्री. मीनानाथ दिनकर लाखे, पुणें, श्री. सिताबाई जोशी, मुंबई

**तबलावादन** :—श्री. विनायक वासुदेव इंगळे, अंधेरी. श्री. दगडू दिनकर लाखे, खेड ( पुणें ) श्री. व्ही. जी. जोशी, पुणें.

**हार्मोनियमवादन** :—श्री. ए. का. ठाकुरदास, पुणें.

**भजनी मंडळें** :—श्री. पांडुरंग ढगे, धुळे. साईभजन मंडळ, धुळें. श्री. प्रभाकर राजुरकर, श्री. हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, मुंढवा, (पुणें.) श्री. धर्मराज प्रासादिक भजनी मंडळ, निरगुडकर ( पुणें. )

**कवाली पार्टी** :—गॉनीबाबु कबंदर कवाल पार्टी, मुंबई.

ता. २६ जानेवारी प्रजासत्ताकदिनानिमित्त. श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फें सकाळीं झेंडावंदन, श्री. सा. स. व्यवस्थापक अधिकारी श्री. मुळे साहेब यांचें हस्तें, झालें. शिर्डी येथील शाळेंतील मुलांमुलींना खाऊ वाटण्यांत आला.

या कार्यक्रमास साई संस्थान नोकर, सेवेकरी, शिर्डी शाळेतील शिक्षक, मुलेमुली व शिर्डीचे गांवकरी व पुढारी असे सर्व हजर होते; संस्थानचे व्यवस्थापक अधिकारी मे. मुळे साहेब व शाळेंतील हेड-मास्तर व इतर शिक्षक यांचीं या दिनानिमित्त भाषणें झालीं. नंतर प्रसाद म्हणून पेढे काजू असे वाटण्यांत आले. रात्रौ विजेच्या दिव्याची रोषनाई. संगीत गायन भजन झालें, न्यू प्रभात नाट्यमंडळ, शिर्डी यांनीं भगवा झेंडा हा नाट्यप्रयोग करून दाखविला.

या महिन्यांत श्रीसाईबाबांचे दर्शनास सर महाराजा जिवाजीराव शिंदे, ग्वाल्हेर, हे आले होते. त्यांनीं साईपूजा, सत्यनारायण, अन्नदान, द्रव्यदान वगैरे धर्मकृत्यें केलीं.

# फेब्रुवारी १९५८

या महिन्यांत बाहेरगांवची भक्तमंडळी नेहमीप्रमाणें. श्रीचे दर्शनास आली होती.

कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन** :—श्री. ह. भ. प. विष्णुबुवा शिखरे, कोल्हापूर. सौ. यशोदाबाई विष्णुबुवा शिखरे, कोल्हापूर. श्री. ह. भ. प. जगन्नाथ विष्णु जोशी महाराज अहमदाबाद.

**गायनः**—श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, साकोरी, श्री. नागेश शंकर खळीकर, पुणें, श्री. अविनाश त्रासी, मुंबई. श्री. दलाल एच्. राम, मुंबई. श्री. नारायण कृष्ण परब, मुंबई, श्री. रामचंद्र श्रीराम होमकर, चिपूळूण. श्री सूर्यकांत पंढरीनाथ मोहिले, मुंबई. सौ. शैला सूर्यकांत मोहिले, मुंबई, श्री. रामलिंगशास्त्री हातरस, अलीगड, कु. अरुणा मोहिले, मुंबई, कु. सुमती प्रभू नागपूर, श्री. गोपाळकृष्ण भागवत, केडगांवबेट, श्री. दिलीप कुमार धुलीया मुंबई, श्री. दत्तात्रय केशव खरवंडीकर नासिक.

**नृत्यः**—कु. एम्. रामाणम्मा आद्रा; मद्रास, कु. ज्योती गोपाळ त्रासी, मुंबई,

**तबलावादनः**—श्री. लक्ष्मण रामचंद्र दात्ये, बडोदा, श्री. एम्. विजापुरे बेळगांव, कु. रमेश गोपाळ त्रासी, मुंबई श्री. गुलाम रसूल, पुणें, श्री. गुरुदत्त, साकोरी, श्री. शंकर राघू गुरव, कोपरगांव.

**बांसरीवादन** :—श्री. एच. पी. चौधरी, मुंबई, श्री. जगन्नाथ पंढरीनाथ मोहिले, मुंबई.

**नकलाः**—श्री. एम. एस. नारायण, मुंबई, श्री. बिजाबा आंधळा, शिर्डी.

महाशिवरात्रपर्वणीनिमित्त श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक व कीर्तन.

श्री. हंसदेव सुरतकर महाराज व ग्वाल्हेर महाराणीसाहेब श्रीसाईंचे दर्शनास आले होते.

संस्थान धर्मार्थ दवाखाना तूर्त नवीन डॉक्टर येईपर्यंत बंद ठेवण्यांत आला आहे.

संयुक्त चिटणीस } **सी. बी. वेलकर**
**जी. जी. दाभोळकर**

---

# संतांचें थोरपण

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।
पापं तापं च दैन्यं च हन्ति सन्तो महाशयाः ।।

गंगा पाप नाहींसें करते, चंद्र ताप नष्ट करतो, कल्पतरु दैन्य घालवितो. पण महान् सन्त हे पाप, ताप आणि दैन्य हीं तिन्ही नाहींशी करतात.

× × ×

विकृतिं नैव गच्छान्ति संगदोषेण साधवः ।
आवेष्टितं महासर्पैश्चंदनं न विषायते ।।

साधुसंतांच्या सहवासांत वाईट माणसें आलीं तरी त्या वाईट माणसांच्या संगतीचा संतांवर कांहीं अनिष्ट परिणाम घडत नाहीं. मोठे मोठे साप चंदनाला विळखा घालून बसलेले असले तरी चंदन विषमय होत नाहीं.

—— ० ——



★

संगीताची मोहिनी
माणसाला मंत्रमुग्ध करते.
याचप्रमाणें कुठल्याहि
हृदयंगम चित्राची मुद्रणकृति
वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७१०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री. सगुण मेरु नाईक**
मुं. पो. शिर्डी, जि. अहमदनगर



मुद्रक: **कृ. ना. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : **ना. आ. सावंत** व **रा. म. राणे**, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.